नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

आज विजयादशमी!



* वर्ष ५५ * अंक १८२ * * नागपूर * | गुरुवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## चौकार योगाचा दिवस

आज २ ऑक्टोबर २०२५ या तारखेलाच विजयादशमी म्हणजेच दसरा आलेला आहे. इतिहासात आजच्या दिवसासारखा दुर्मिळ योग बहुधा कधीच आला नसेल. कारण आज अत्यंत महत्त्वाच्या चार बाबी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. त्या चार बाबींचा चौकार योग आपण आज पाहणार आहोत. आज विजयादशमी आहे म्हणजेच प्रभू श्रीरामचंद्रांनी अन्याय करणाऱ्या रावणाला संपवून आपल्या विजयाचा झेंडा आजच रोवला होता. आजच्या दिवशी हजारो दलित बांधवांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचे जोखड झटकून देण्यासाठी हिंदू धर्माचा त्याग करून परिमार्जन करण्यासाठी भारतातच जन्मलेल्या बौद्ध धर्माचे अनुकरण केले होते. या सर्वांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये बौद्ध धम्माला अंगीकारले. आजच्याच दिवशी ब्रिटिशांच्या अन्यायाचा प्रतिकार करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मोहनदास नावाच्या एका अपत्याचा जन्म झाला. त्यांना पुढे लोकांनी महात्मा गांधी म्हणून संबोधले. आजच्याच दिवशी भारतावर अकारण अन्याय करणाऱ्या पाकिस्तानचा चेंदामेंदा करणाऱ्या लाल बहादूर शास्त्रीजी यांचाही जन्म झाला. म्हणजे यंदाच्या २ ऑक्टोबर रोजी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या चार घटना आणि त्यामुळे घडलेले परिवर्तन याचा आपण विचार आणि अंगीकार करून अशा प्रवृत्तींसमोर नतमस्तक झालेच पाहिजे. आता आपण शेवटाकडून सुरुवात करूया, जेव्हा लालबहादूर शास्त्री पंतप्रधान होते एकदा त्यांच्या मुलाने त्यांची कार कोठेतरी जाण्यासाठी वापरली. तेव्हा शास्त्रीजी नामक देवतुल्य माणसाने त्यावेळी आपल्या पगारातून पेट्रोलची रक्कम तात्काळ अदा केली होती. एकदा हे शास्त्रीजी एका मोठ्या कापडाच्या दुकानात गेले सोबत त्यांच्या पत्नी ललितादेवी होत्या. त्यांच्यासाठी साडी खरेदी करावी म्हणून त्यांच्यासोबत शास्त्रीजी गेले होते. ललिता देवींना चार साड्या पसंत पडल्या आणि त्यानंतर दुकानदाराने अक्षरशा हात जोडून सांगितले की आम्ही या साड्यांचे पैसे अजिबात घेणार नाही. मग शास्त्रीजींनी आग्रह केल्यावर सहजच म्हणून त्याची किंमत विचारली आणि त्यानंतर तेवढे पैसे आपण देऊ शकत नाही म्हणून त्या माऊलीच्या साड्या त्यांनी दुकानदाराला परत घ्यायला लावल्या. असे हे देवतुल्य व्यक्तिमत्व जेव्हा वारले. तेव्हा त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये अक्षरशा ठणठणाट होता. लालबहादूर शास्त्रीजी यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे कुठलीच संपत्ती नव्हती. म्हणूनच त्यावेळचे काँग्रेसचे अध्यक्ष कामराज यांनी संसदेत ठराव पारित करून लालबहादूर शास्त्री यांच्या परिवाराला राहण्यासाठी घर दिले होते. लालबहादूर शास्त्रीजींच्या प्रामाणिकपणाचे आणि खऱ्या अर्थाने स्वतःच्या राष्ट्राला वाहून घेण्याचे एकापेक्षा एक असे अनेक किस्से आहेत. खरे तर आजच्या काळात यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही. आता महात्मा गांधीजींच्या लाख गोष्टींपैकी एखादे उदाहरण बघूया. महात्मा गांधी एका ठिकाणी लोकांना भेटण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी एका घरामध्ये केवळ एकच साडी असल्यामुळे आई आणि मुलगी दोघींना एकाच वेळी घराबाहेर येता येत नव्हते. अशा गोष्टी कळल्यावर सूटबूट धारक असलेल्या त्याकाळच्या या बॅरिस्टरने केवळ एका धोतरावर राहण्याचा निर्धार केला आणि तो जन्मभर पाळला. बाकी महात्माजींच्या जीवनात काय काय घडले, हे या एका अग्राग्र लेखामध्ये सांगणे अजिबात शक्य नाही. आता धम्मचक्र प्रवर्तन दिनाबाबत चर्चा करणे गरजेचे आहे. कारण महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही आपापल्या परीने हिंदू धर्मातील अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र हे होत नाही हे दिसून आल्यावर आपण हिंदू धर्मात जन्माला आलो. पण हिंदू धर्मात मरणार नाही असे आंबेडकरांनी निर्धारपूर्वक जाहीर केले. त्या निर्धाराचे नागपूर नगरीमध्ये त्यांनी पालन केल्यावरच त्यांच्यासोबत लाखो अनुयायी जमा झाले. त्यानंतर काही दिवसातच आपल्या लाखो अनुयायांना त्यांनी पोरके करून जगाचा निरोप घेतला. आता विजयादशमी सुद्धा अन्यायाच्या प्रतिकाराचेच उदाहरण आहे. कारण रावणासारखा महापराक्रमी, महाज्ञानी, राजकारण धुरंदर, संस्कृत पंडित यासह अनेक स्तोत्रांचा रचयिता केवळ परस्त्री मोहामुळे अनाचारग्रस्त झाला होता त्याला भगवान प्रभू श्रीरामचंद्रांनी अखेर मुक्ती दिली. अशाप्रकारे आजचा हा दिवस समसमा संयोगांचा दिवस आहे. कोणत्याही मनुष्याच्या जीवनात असे दिवस वारंवार येत नाहीत. आमच्या लिखाणालाही अशीच मर्यादा घालण्यात आल्यामुळे कमी शब्दांमध्ये सर्वांनी समजून घ्यावे. आजच्या दिवसाचे महत्त्व आमच्या वाचकांनी आत्मसात करावे, म्हणून हा लेखन प्रपंच करीत आहोत. बाकी जगरहाटी अशीच चालू राहणार आहे. तेव्हा निदान हा इतिहास सर्वांनी आत्मसात करावा, त्याचा अभ्यास करावा. एवढीच आमची विनंती आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# नागपूर ते चंद्रपूर द्रुतगती महामार्गाला राज्य शासनाची मान्यता!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :

नागपूर ते चंद्रपूर या २०४ किलोमीटर लांबी असलेल्या चार पदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच चंद्रपूर ते मूल दरम्यान महामार्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी, भविष्यामध्ये कुठलाही रस्ता बांधताना रस्त्याच्या परिसरात विकासाची 'इकोसिस्टीम' निर्माण करण्यात यावी. त्यासाठी आधीपासूनच भूसंपादन करून नियोजन करण्याचे निर्देशही दिले.



नागपूर ते चंद्रपूर महामार्ग नवेगाव मोरेपर्यंत करण्यात येत असल्याने पुढे सुरजागड लोह प्रकल्पापर्यंत या महामार्गाची लांबी वाढवण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विकासाचे प्रकल्प पूर्ण करताना कालमर्यादेचे बंधन असावे. प्रकल्प रेंगाळला किंवा विलंब झाल्यास किंमत वाढीमुळे विनाकारण राज्यावर आर्थिक भुर्दंड बसत असतो. सध्या राज्यात १० लाख कोटींच्या पायाभूत सोयी - सुविधा प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामांच्या प्रगतीची गती कुठेही कमी पडू देऊ नये. ही कामे पूर्ण झाल्यानंतर अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. त्यामुळे ही सर्व कामे नियोजनबद्ध विहित कालमर्यादेत पूर्ण करावी.

राज्यामध्ये यापुढे पायाभूत सुविधांची कामे घेताना ती आधी गतिशक्ती पोर्टलवर आणावी. गतिशक्ती पोर्टलवर घेतल्याशिवाय प्रकल्पाचे काम सुरू करू नये. यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याचे निर्देश देत फडणवीस म्हणाले, सिंचन प्रकल्पांची कामे घेतानाही भविष्यातीलअडचणी बघून सुरुवातीपासूनच नियोजन करावे. या प्रकल्पांचे भूसंपादन आधीच करून नंतर कामाला सुरुवात करावी.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने वेगवेगळे विभाग निर्माण करावे. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती मिळण्यासाठी बाह्य स्त्रोतांद्वारे संबंधित क्षेत्रातील तज्ञ मनुष्यबळ घ्यावे. पायाभूत सोयी सुविधा प्रकल्पांना दिलेल्या आयडीमुळे देयकातील अनियमिततेवर निर्बंध येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.






राष्ट्रपिता म. गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

### सुटीची सूचना

**विजयादशमीनिमित्त गुरूवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने शुक्रवार दि. ३ ऑक्टोबर २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

■ व्यवस्थापक

## खरगे रुग्णालयात

■ वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. १ :

काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे (८३) यांना मंगळवारी बंगळुरू येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.




त्यांचे पुत्र आणि कर्नाटकचे मंत्री प्रियांक खरगे यांनी सांगितले की, मल्लिकार्जुन खरगे यांना पेसमेकर बसवण्याचा सल्ला देण्यात आला आहे आणि नियोजनानुसार त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे आणि त्यांना बरे वाटत आहे. पक्षाच्या सूत्रांनी सांगितले की, मंगळवारी ताप आणि पाय दुखण्याची तक्रार केल्यानंतर खरगे यांना बंगळुरूमधील एमएस रमैया रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टर त्यांची काळजी घेत आहेत.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या बुधवारी रुग्णालयात खरगे यांची भेट घेतली. नंतर त्यांनी पत्रकारांना सांगितले की, त्यांना थोडे अस्वस्थ वाटत होते. ते आता ठीक आहेत. ते बोलत आहेत. त्यांना उद्या डिस्चार्ज दिला जाईल. गतवर्षी एका सभेला संबोधित करताना खरगे बेशुद्ध पडले होते.

## अमित शहांचा ५ ला अहिल्यानगर दौरा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी बुद्रुक येथील प्रवरा नगरमध्ये होणाऱ्या तीन प्रमुख कार्यक्रमांना हजेरी लावणार आहेत.



या कार्यक्रमांमध्ये पं. बाळसाहेब विखे पाटील आणि डॉ. विठोबा विखे पाटील यांच्या पुतळ्यांचे लोकार्पण, शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे उद्घाटन आणि शिव प्रतिष्ठानच्या दुर्ग दौड या कार्यक्रमांचा समावेश आहे.

## स्वयंसेवकांनी कटुता दाखवली नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी सांगितले की, आज आरएसएसशी संबंधित एक नाणे जारी करण्यात आले आहे.




नाण्याच्या एका बाजूला राष्ट्रीय चिन्ह आहे, तर दुसऱ्या बाजूला सिंहावर बसलेली भारतमाता आणि आरएसएस कार्यकर्त्यांची प्रतिमा आहे. संघाच्या शताब्दी समारंभात, पंतप्रधानांनी संघाच्या योगदानाचे स्मृतिचिन्ह असलेले टपाल तिकीट देखील प्रकाशित केले. ते म्हणाले की, संघाच्या स्वयंसेवकांनी कधीही कटुता दाखवली नाही. तत्पूर्वी, संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे यांचेही भाषण झाले.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

### ४९ लाख कर्मचारी व ६८ दशलक्ष पेन्शनधारकांना फायदा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :

दिवाळी आणि दसऱ्याच्या आधी, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३% वाढ करण्यात आली आहे. बुधवारी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

आता, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५५% वरून ५८% पर्यंत वाढेल. ही वाढ १ जुलै २०२५ पासून लागू होईल. हा फायदा ४९.२ दशलक्ष केंद्र कर्मचारी आणि ६८.७ दशलक्ष पेन्शनधारकांना मिळेल.

मार्चमध्ये महागाई भत्त्यात २% वाढ करण्यात आली. ही सात वर्षांतील सर्वात कमी वाढ होती. सहसा महागाई भत्त्यात वाढ ३% ते ४% दरम्यान असते, परंतु त्यावेळी ही वाढ फक्त २% होती.

वाढत्या महागाई असूनही सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांचे राहणीमान राखण्यासाठी महागाई भत्ता दिला जातो. महागाई भत्ता दर अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांकच्या आधारे निश्चित केले जातात आणि दर सहा महिन्यांनी अद्यतनित केले जातात. महागाई भत्त्यात वाढीच्या निर्णयाचे केंद्रीय कर्मचारी संघटनेने स्वागत केले आहे.

## दसऱ्याच्या पूर्वसंध्येला जरांगे रूग्णालयात


■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १ :

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची दसऱ्याच्या पूर्वसंध्येलाच तब्येत बिघडल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



तथापि, तब्येत बरी नसली तरी ते उद्याच्या दसरा मेळाव्याला नारायण गडावर जाण्यावर ठाम असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

दरम्यान, राज्यात सध्या सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४ ऑक्टोबर रोजी ओबीसी समाजाच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत सकल ओबीसी समाजाचे नेते उपस्थित राहणार आहेत. हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या निर्णयाला ओबीसी नेत्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी ओबीसी नेत्यांची बैठक बोलावली आहे.






## ही भिवंडी आहे, येथे मराठीची काय गरज?



■ **नाशिक :** समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांच्या विधानामुळे भिवंडीत पुन्हा एकदा मराठी-हिंदी वादाला तोंड फुटले आहे. हे भिवंडी आहे, इथे मराठीची काय गरज? असा सवाल करत अबू आझमी यांनी मराठीत बोलण्यास नकार दिला. त्यांच्या या भूमिकेमुळे 'भिवंडी महाराष्ट्रात असल्याचा अबू आझमींना विसर पडलाय का?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, अबू आझमी यांना मराठीची लाज वाटत असल्यास आपल्या स्टाईलने त्यांना उत्तर देणार, असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

मुंबईमध्ये मागील अनेक दिवसांपासून मराठी भाषिक लोकांना परप्रांतीय व्यापारी आणि बँकेतील काही कर्मचाऱ्यांकडून भाषेवरून वाद घालण्याचे प्रकार समोर आले आहेत. या प्रकरणांमध्ये मनसे तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेत संबंधितांना धडा शिकवल्याचे दिसून आले होते. आता अबू आझमी यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे हा मराठी-हिंदी वाद पुन्हा एकदा पेटण्याची चिन्हे आहेत.

## शिंदे गट चोरबाजारातील माल



**मुंबई :** एकनाथ शिंदे स्वतःला बाळासाहेब ठाकरे समजायला लागले आहेत. सकाळी ते उठतात तेव्हा ते बाळासाहेब ठाकरे म्हणून उठतात. बाळासाहेब ठाकरे हे सामान्यांचे पुढारी होते, बहुजन समाज आणि मराठी माणसांचे पुढारी होते. बाळासाहेब ठाकरे यांनी कधी निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दारात जाऊन उभे राहत नव्हते, असे म्हणत संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदेंचा पक्ष हा नरेंद्र मोदी यांची बेनामी कंपनी आहे. पावसाळ्यात जसे गांडूळ निर्माण होतात आणि पावसाळा संपला की नष्ट होतात. नरेंद्र मोदी आणि अमित शहा जेव्हा सत्तेतून जातील तेव्हा हे गांडूळ नष्ट होतील. यांच्याकडे कोणता विचार नाही, बाळासाहेबांचा विचार त्यांना माहिती नाही. नाहीतर दिल्लीची बुट चाटे गिरी त्यांनी केली नसती. बाळासाहेबांचे नाव घेण्याची त्यांची कुवत नाही.

# अतिवृष्टीमुळे पीक पाहणीला सलग दुसऱ्यांदा मुदतवाढ

## १०० टक्के पीक पाहणी होणार : महसूल मंत्री बावनकुळे यांचे आश्वासन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** राज्यातील पीक पाहणीला महिन्याभराची मुदत देण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भातला मोठा निर्णय घेतला आहे. अतिवृष्टीमुळे सलग दुसऱ्यांदा ही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान पाहणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत.

या संदर्भातील माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून दिली आहे. या आदेशानुसार सहाय्यकाने केलेल्या पीक पाहणीची शंभर टक्के तपासणी ग्राम महसूल अधिकारी यांनी करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. हा एक महिन्याचा कालावधी यथायोग्य वापरला जाईल याची दक्षता सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक असल्याचेही या आदेशात नमुद करण्यात आले आहे.

खरीप हंगाम २०२५ साठी सध्या शेतामध्ये पीक पाहणी होत असून दिनांक १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत शेतकऱ्यांकडून व त्यानंतर १५ सप्टेंबर २०२५ ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये सहाय्यक स्तरावरून पीक पाहणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. तथापि, शेतकऱ्यांना पीक पाहणीसाठीचा कालावधी दोन आठवडे वाढवून देण्यात आला आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी तसेच, दुबार पेरणी यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ही मुदतवाढ देणे आवश्यक होते.

आता दिनांक ३० सप्टेंबरला शेतकऱ्यांची पिक पाहणीची मुदत संपत आहे. यानंतर उर्वरित एका महिन्यामध्ये सहाय्यकांच्याद्वारे उर्वरित सर्व शेतांची पीक पाहणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

याबाबत कृषि विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, १४ ऑक्टोबर २०२४ मध्ये सहाय्यकांच्या भूमिका, जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याशिवाय जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाकडून प्रशिक्षणाद्वारे वेळोवेळी सहाय्यकांना, त्यांनी करावयाच्या कार्याबाबत माहिती देण्यात आलेली आहे. १ ऑक्टोबर



२०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये राहिलेल्या प्रत्येक गावातील पीक पाहणी न झालेल्या शेतांची पीक पाहणी सहाय्यकामार्फत पूर्ण करावयाची आहे.

त्यासाठी हा एक महिन्याचा कालावधी यथायोग्य वापरला जाईल याची दक्षता सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. यासाठी सर्व सहाय्यकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे का याची खात्री करणे, तसेच सर्व सहाय्यक हे प्रत्यक्ष क्षेत्र परिस्थितीमध्ये जाऊन उर्वरित पीक पाहणी करून घेत आहेत, याचा दैनंदिन आढावा घ्यावा.

जे शेतकरी गावातच आहेत परंतु त्यांची पीक पाहणी झालेली नाही अशा शेतकऱ्यांना त्यांची पीक पाहणी सहायकामार्फत करण्यात येत असल्याबाबत अवगत करावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये आपले अधिनस्त सर्वच्या सर्व गावातील शेतांची पिक पाहणी पूर्ण करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

सहाय्यकाने केलेल्या पीक पाहणीची शंभर टक्के तपासणी ग्राम महसूल अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे व ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच मंजूर पीक पाहणी ७/१२ वर प्रसिद्ध होते. कोणत्याही परिस्थितीमध्ये आपल्या जिल्ह्यातील सर्व गावांची पीक पाहणी शंभर टक्के होईल, याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश महसुल मंत्र्यांनी दिले आहेत. तथपि, विलंबामुळे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळेल का? हा प्रश्नच आहे.

# म्हाडाच्या घर विक्रीवरील निर्बंध शिथिल होणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** मुंबईसारख्या महानगरात घर घेणे ही सर्वसामान्यांची आयुष्यभराची धडपड असते. दररोज लाखो लोक नोकरी-धंदा करत कष्ट करतात, पण चौरस फुटाला सोन्याचा भाव असलेल्या या शहरात स्वतःचे घर घेणे बहुतेकांना परवडत नाही.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देते. प्रत्येक वर्षी काढण्यात येणाऱ्या म्हाडा लॉटरीकडे हजारो कुटुंबांचे डोळे लागलेले असतात. आतापर्यंत म्हाडाच्या घरांचा ताबा मिळाल्यानंतर पाच वर्षांपर्यंत ते विकता येत नव्हते.

मात्र, आता हा महत्त्वाचा नियम शिथिल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जर हा निर्णय झाला तर घर ताबा मिळाल्यानंतर लगेच विकण्यास




घरमालकांना मुभा मिळणार आहे.

या संभाव्य निर्णयाचा सर्वाधिक फायदा त्या विजेत्यांना होणार आहे ज्यांना घर तातडीने हवे नाही. कारण म्हाडाची घरे साधारणपणे बाजारभावापेक्षा २० ते ३० लाखांनी कमी किंमतीत मिळतात. त्यामुळे ताबा घेतल्यानंतर त्वरित विक्री करून अनेक जण मोठा नफा कमावू शकतील.

म्हाडाकडून लागू असलेली पाच वर्ष घर न विकण्याची अट हेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी घालण्यात आली होती. कारण, अनेकदा धनाढ्य लोक किंवा गुंतवणूकदार अशा योजनांमध्ये अर्ज करून घर घेतात आणि नंतर ते जास्त किंमतीत विकून नफा कमावतात.

पाच वर्षांचा कालावधी अनिवार्य केल्याने खरेदीदार घर वापरतो, स्थायिक होतो आणि गरजूंपर्यंत घरे पोहोचतात, असा विचार होता. मात्र, हा निर्बंध शिथिल केल्यास गुंतवणूकदारांची लॉबी अधिक सक्रीय होऊ शकते. घर मिळाल्यानंतर ते त्वरित विक्री करून बाजारात कृत्रिम दरवाढ निर्माण करू शकतात.

## पडळकरांची जीभ पुन्हा घसरली
## जयंत पाटलांवर विखारी टीका



■ **वृत्तसंस्था जत, दि. १ :** जतमध्ये आयोजित दसरा मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांच्यावर भाजप आमदार गोपीचंद पडळकरांनी जोरदार टीका केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आधीच समज दिल्यानंतरही पडळकरांनी पुन्हा वादग्रस्त वक्तव्य करत राजकीय वातावरण तापवले आहे. तुझ्या कुठल्या बायकोचं मंगळसूत्र चोरलं? असा सवाल करत त्यांनी जयंत पाटलांना थेट आव्हान दिलं. जातीवंत पाटील असाल तर वेळ, तारीख आणि ठिकाण सांगा, मी तिथे हजर राहतो, असेही पडळकर म्हणाले.

या भाषणात पडळकरांनी आक्षेपार्ह भाषा वापरत जयंत पाटलांसोबतच त्यांच्या निकटवर्तीय दिलीप पाटील यांच्यावरही टीका केली. त्यांनी दिलीप पाटील यांचा बाळव्याचा कुत्रा असा उल्लेख केला. या विधानामुळे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात तीव्र संतापाची लाट उसळली असून, पडळकरांच्या वक्तव्याचा जोरदार निषेध होण्याची शक्यता आहे.

गोपीचंद पडळकर म्हणाले, मी फकीर माणूस आहे. मला कुणाची भीती नाही. अनेक गावठी कुत्र्यांना तुडवत तुडवत मी आज इथंपर्यंत आलोय. मला बदनाम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, पण मी घाबरणार नाही. माझी लढाई प्रस्थापितांच्या विरोधातील आहे.

मी मंगळसूत्र चोर नाही, पण जयंतराव, तुझ्या कुठल्या बायकोचं मंगळसूत्र चोरलं, हे तरी सांगा.

**आरक्षणाच्या मुद्द्यावर ठाम**

आपल्या भाषणात पडळकरांनी आरक्षणाचा मुद्दाही उपस्थित केला. धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळालंच पाहिजे. मराठा आणि ओबीसींना एकमेकांविरोधात उभं केलं जात आहे.

माझी भूमिका पूर्वी होती तीच आज आहे आणि उद्याही राहील. जेव्हा देवेंद्र फडणवीसांचा विषय असेल तेव्हा मी बाजीप्रभूप्रमाणे त्यांच्या मागे उभा राहीन, असे त्यांनी स्पष्ट केलं.

**विरोधकांकडून निषेधाची तयारी**

पडळकरांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकीय वादळ उठण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे कार्यकर्ते आधीच पडळकरांच्या वक्तव्याविरोधात रस्त्यावर उतरले होते.

आता या नव्या विधानानंतर निषेध अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत आहेत. भाजपच्या गोटातही पडळकरांच्या वक्तव्यामुळे अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

# दसऱ्याला झेंडू खाणार भाव?

## पावसामुळे उत्पादनात घट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** नवरात्र उत्सवाची धूम सुरु आहे, पण यंदा झेंडूच्या फुलांवर सणाचा रंग कमी दिसतोय. महाराष्ट्रातल्या अनियमित पावसामुळे झेंडूची फुले कुजली, दर्जा गेला आणि बाजारात मागणीही कमी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता पसरली होती.

गेल्या आठवड्यात झेंडूचा भाव फक्त ३० ते ४० रुपये प्रति किलो होता, ज्यामुळे शेतकऱ्यांचा सणासुदीचा उत्साह दबला. ग्राहक देखील खराब दर्जाच्या फुलांमुळे खरेदीसाठी येत नव्हते. काही शेतकऱ्यांनी जिद्द दाखवत कष्टाने चांगले पीक उभे केले, पण भावाच्या कमतरतेमुळे चिंता कायम होती.

पण आता परिस्थितीत बदल दिसतोय. बाजारात झेंडूला ८० ते ९० रुपयांचा भाव मिळू लागला असून, दसऱ्याच्या दिवशी हा भाव शंभरी पार करून १०० ते १५० रुपयांपर्यंत



जाऊ शकतो, अशी व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे.

घाऊक व्यापारी आतापासूनच शेतकऱ्यांशी संपर्क साधून फुले खरेदीसाठी सज्ज झाले आहेत. यंदा झेंडूच्या या अचानक वाढलेल्या भावामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण तयार झाले आहे.

पावसाने नुकसान केले तरी शेतकऱ्यांनी मेहनतीतून झेंडूचे पीक उभे केले, आणि दसऱ्याला झेंडूला सोनेरी भाव मिळण्याची शक्यता आहे. यंदा बळीराजाला दोन पैसे हातात येण्याची संधी आहे!

## तरुणीला भररस्त्यात लाथाबुक्क्यांनी मारहाण

**पुण्यातील संतापजनक प्रकार**

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :** एका तरुणीला भररस्त्यात लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची संतापजनक घटना पुण्यात घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. ही घटना किरकोळ वादातून झाल्याची माहिती आहे.

सध्या महाराष्ट्रासह देशभरात नवरात्रीचा उत्सव सुरू आहे. या अंतर्गत सर्वत्र देवीचा जागर केला जात आहे. या पार्श्वभूमीवर विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुण्यात एका तरुणीला भररस्त्यात लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे.

यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. त्यात एक तरुण एका तरुणीला बेदम मारहाण करताना दिसून येत आहे. प्रथम हा तरुण त्या तरुणीच्या कानशिलात मारतो. त्यानंतर तिच्या कंबरेत लाथ घालतो. नंतर सदर तरुणी शांतपणे रस्त्याच्या शेजारी उभ्या असणाऱ्या ऑटोत जाऊन बसते. पोलिसांत अजूनही तक्रार दाखल नाही

त्यानंतर त्या ऑटोतून बाहेर पडते आणि रस्ता ओलांडते. त्यानंतर ती मध्येच तरत येते. त्यानंतर पुन्हा हा तरूण तिच्या पोटात लाथ घालतो. एका किरकोळ वादातून ही घटना घडल्याचा सांगण्यात येत आहे.

माहितीनुसार, पुणे - सातारा रस्त्यावरील केके मार्केट ते चव्हाण नगर मार्गावर रात्री ८ च्या सुमारास ही घटना घडली. पण पीडित तरुणी कोण? व तिला मारहाण करणारा तरुण कोण? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. विशेषतः या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत पोलिसांतही कोणती तक्रार दाखल झाली नाही. सहकार नगर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी याची पुष्टी केली. पण या घटनेवर सर्वसामान्य नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# समतेच्या नव्या पहाटेचा सूर्योदय : धम्मचक्र प्रवर्तन दिन

धम्म म्हणजे समतेचा दीप, प्रवर्तन दिन म्हणजे स्वाभिमानाचा उत्सव आणि धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे अन्यायाविरुद्ध बंड, पण हिंसेशिवाय. म्हणजेच, गुलामीतून स्वाभिमानाकडे प्रवास, अन्यायाविरुद्ध बंडाचे प्रतीक आणि समतेच्या नवा समाजव्यवस्थेचे बीजारोपण.

---------

१४ ऑक्टोबर १९५६ हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासात कायमस्वरूपी सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारून एका नवा युगाचा प्रारंभ केला आणि शतकानुशतकांची गुलामगिरी, शोषण, जातिभेद यांना छेद देत नवा युगारंभ केला.

हा क्षण केवळ धर्मांतराचा नव्हता, तर तो होता मनुष्याला मनुष्य म्हणून जगण्याचा, समतेने श्वास घेण्याचा आणि आत्मसन्मानाने उभं राहण्याचा क्रांतिकारी क्षण. हा दिवस भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी वळण आहे. हाच तो क्षण होता ज्याने दलित, शोषित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे १४ ऑक्टोबर हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून, तो आशेचा, स्वाभिमानाचा आणि क्रांतीचा दिवस आहे.

धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक संदेश, ते माणसाला माणसासमान जगण्याची शिकवण देते. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा अधिष्ठान आहे ज्यात कोणतीही जात नाही, उच्च-नीचपणाचा भेद नाही. त्यामुळे धम्म स्वीकारणे म्हणजे आत्मसन्मान स्वीकारणे.


बाबासाहेबांनी सारनाथच्या धम्मचक्र फिरवणाऱ्या बुद्धांच्या परंपरेशी संगती साधत, आश्विन पौर्णिमेला दीक्षाभूमीवर धर्मचक्र फिरवले. त्या एका कृतीने त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या दास्याच्या साखळ्या तुटल्या आणि समतेच्या धर्माचा नवा प्रवास सुरू झाला.

भारताच्या दीर्घ सामाजिक इतिहासात जातिव्यवस्था ही जखम होती. शेकडो वर्षे दलित समाजाला अपमान, अन्याय, अस्पृश्यतेच्या यातना सोसाव्या लागल्या. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यास, संघर्ष आणि त्यागातून या व्यवस्थेविरुद्ध आवाज उचलला. अखेर त्यांनी ठामपणे जाहीर केले की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही आणि आपल्या शब्दाला जागत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन लाखो जनतेला नवजीवन दिले. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

या दिवशी बाबासाहेबांनी जे धाडस केले, त्यातून दलित समाजाने आपली गुलाम मानसिकता झटकून टाकली, हा दिवस म्हणजे स्वाभिमान दिन आहे. भगवान बुद्धांनी दिलेला धम्म हा कोणत्याही देवधर्मांच्या अधीन नसून करुणा, प्रज्ञा आणि मैत्री यांवर आधारलेला आहे.

त्यांनी शोषण, अंधश्रद्धा आणि हिंसेला नाकारलं, अत्त दीपो भव हा त्यांचा संदेश मानवाला आत्मबळ देणारा ठरला. जातीपातीच्या अंधाऱ्या विळख्यात अडकलेल्या समाजाला त्यांनी समानतेचा आणि ज्ञानाचा दीप दाखवला.

बुद्ध धम्म हा कर्मकांडांचा मार्ग नाही, तर व्यवहाराचा आणि विचारांचा मार्ग आहे. माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणारा हा जीवनमार्ग आजही तितकाच सुसंगत आणि




आवश्यक आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ स्मरणोत्सव नसून तो आहे सतत जागवणारा चेतावणीचा नगारा. विषमता, दारिद्र्य, अन्याय अजूनही समाजात आहे, अशा परिस्थितीत आजच्या पिढीसाठी १४ ऑक्टोबरचा संदेश असा आहे की, समता, न्याय आणि करुणा अधिक सामर्थ्याने पसरवण्याची गरज आहे.

हा फक्त एका धर्मांतराचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या पुनर्जन्माचा दिवस आहे. ज्यांनी अस्पृश्यतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल केली, त्यांचा हा उत्सव आहे. म्हणूनच आपण हा दिवस केवळ साजरा करावा असे नाही, तर जीवनपद्धतीत उतरवावा.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

तो होता मनुष्यत्वाचा उत्सव, तो होता अस्मितेचा पुनर्जन्म, तो होता न्याय, समता आणि बंधुत्वाच्या नव्या वाटचालीचा आरंभ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचा शपथविधी होता. त्या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र जमलेला जनसागर पाहताना असे वाटले. जणू अंधाराने त्रस्त झालेले लाखो तारे एका सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाले.

लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण ते दुःखाचे नव्हते; ते होते आनंदमुक्तीचे अश्रू. शतकानुशतके अपमान सहन केलेल्या समाजाने पहिल्यांदाच उंच मान करून मोकळा श्वास घेतला. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या शिवाय मानवतेला अर्थ नाही.

तसेच, हा दिवस आपल्याला शिकवतो की खरी ताकद ही संघटनेत, शिक्षणात आणि विचारांत आहे. बाबासाहेबांनी या दिवशी केवळ धर्मबदल केला नाही, तर त्यांनी समाजबदलाचा पाया घातला. त्यांनी दाखवलेला मार्ग हा विज्ञाननिष्ठ, तार्किक आणि मानवी अस्मिता जपणारा होता.

आज, जेव्हा समाजात अजूनही असमानता, द्वेष आणि भेदभावाचे काटे टोचतात, तेव्हा धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला पुन्हा पुन्हा जागं करतो. त्याकरिता आपण बुद्धधम्माचे वारसदार म्हणून करुणा आणि मैत्रीची बीजे रुजवली पाहिजेत. जात, धर्म, पंथ यांच्या भिंती मोडून प्रबुद्ध समाज निर्माण केला पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे, हीच खरी बाबासाहेबांना आणि बुद्धांना खरी वंदना ठरते.

नागपूरची भूमी, लाखोंचा सागर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तेजोमय संकल्प! तो फक्त एक दिवस नव्हता; तो पिढ्यान् पिढ्यांच्या अश्रूंचा शेवट आणि मानवतेच्या नव्या पहाटेचा उदय होता. या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र आलेल्या जनसमुदायाची अवस्था डोळ्यांसमोर आणली, तर अंगावर शहारे येतात. शतकानुशतकांच्या अन्यायाचे ओझे त्या दिवशी हलके झाले. आता आपणही माणूस आहोत, समान हक्काचे आहोत, ही भावना आणि भावनिक दृष्टीकोन त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती.

तो केवळ धर्मांतर नव्हता; ती मानवी स्वातंत्र्याची घोषणा होती. आज आपल्याला १४ ऑक्टोबरचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. कारण जातिव्यवस्था आजही वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ उत्सव नाही, तर तो आहे आपल्या अस्तित्वाची ओळख. हा दिवस आपल्याला सांगतो, भूतकाळातील बेड्या आपण तोडल्या आहेत, आता भविष्याच्या प्रगतीचे दार आपण स्वतः उघडायचे आहे.

म्हणूनच या दिवशी आपण सर्वांनी करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या मार्गावर चालत प्रबुद्ध भारत घडवण्याची प्रतिज्ञा करूया. १४ ऑक्टोबरच्या त्या ऐतिहासिक दिवशी सुरू झालेल्या प्रबुद्धतेच्या प्रवासाला आजही नवी ऊर्जा मिळो. सर्वांना ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मंगलमय शुभेच्छा!

## भारत मातेचे थोर सुपुत्र
# लाल बहादूर शास्त्री



भारत मातेचे थोर सुपुत्र, देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले.

पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वमार्चे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला.

लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले.

महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले.

ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता.

देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली.

९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले.

१९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले.

जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

# पुसदला आरक्षण बचाव मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी

**पुसद , दि. १ :** आदिवासी समाजाच्या आरक्षण हक्कांच्या संरक्षणासाठी पुसदमध्ये मोर्चाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. हजारोंच्या संख्येने पारंपरिक वेशभूषेत गगनभेदी घोषणाबाजी करीत काढण्यात आलेल्या या मोर्चातून उपविभागीय अधिकारी पुसद यांच्यामार्फत महामहीम राज्यपालांना निवेदन देण्यात आले. सदरचा मोर्चा हा उपजिल्हा रुग्णालयापासून निघाला होता. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, सुभाष चंद्र बोस चौक,आंबेडकर चौक, गांधी चौक मार्गे यशवंत रंगमंदिरामध्ये आदिवासी समाज बांधव जमले होते. त्यानंतर यशवंतराव मंदिरात जमलेल्या समाजाला आदिवासी नेत्यांची संबोधने झाली होती.



हैदराबाद गॅझेटचा आधार घेत बंजारा, धनगर, हटकर, बडगा, कैकाडी, वडार आणि तत्सम भटक्या जातींना अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी असंवैधानिक असून मुळ आदिवासींच्या आरक्षणावर गदा आणणारी आहे, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला. तसेच स्वतः बंजारा समाजातील असूनही आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे एसटी आरक्षणासाठी राजकीय दबाव आणत असल्याने त्यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. मोर्चामध्ये विविध घोषणांचे बॅनर हे महिला, पुरुष, तरुण-तरुणीच लहानग्यांनी हाती घेतले होते. सोबतच आंदोलकांनी पिवळ्या व निळ्या रंगाचे झेंडे, संविधान हातात घेतले होते. या मोर्चामध्ये देविदास डाखोरे, माधवराव वैद्य, मोतीराम बोडखे, पांडुरंग व्यवहारे, सचिन आत्राम, वाघोजी खिल्लारे, नारायण कन्हाळे, रंगराव काळे, गणपत गव्हाळे यांच्यासह अनेक हजारो आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरचा मोर्चा हा उपजिल्हा रुग्णालयापासून निघाला होता.

याशिवाय टीआरटीआय, आयटीडीपी, आदिवासी विकास विभाग यामध्ये पारदर्शकता आणावी एफआरए व पेसा अंतर्गत जल-जंगल-जमीन हक्क अबाधित ठेवावेत, आदिवासी युवकांना शिक्षण, नोकरी, उद्योग, शेती, आरोग्य क्षेत्रात स्वतंत्र योजना लागू कराव्यात; धर्मांतर व सांस्कृतिक आक्रमण थांबवून परंपरा-संस्कृतीचे संरक्षण करावे, आरक्षणातील टक्केवारीत कोणताही बदल न करण्याची हमी द्यावी. ८५ हजार पदांवर भरती प्रक्रिया सुरू करावी यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने अधिसंख्य घोषित केलेली १२,५२० पदे त्वरित भरावीत, आजवर रिक्त असलेल्या ८५ हजार पदांवर भरती प्रक्रिया सुरू करावी, छोटा संवर्ग बिंदू क्रमांक दोन वरून आठवर नेण्याचा निर्णय रद्द करावा, आरक्षणावर गदा आणणारे शासनादेश, गॅझेट, शिफारसी कायम रद्द कराव्यात, आरक्षणाविरुद्ध काम करणाऱ्यांवर एससी, बोगस जातींच्या व्यक्तींचे दाखले कायमस्वरूपी रद्द करावेत अशा मागण्या नोंदवण्यात आल्या.

# 'मोबाइल ॲडिक्शन अवेअरनेस' कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी

**अकोला, दि. १ :** 'मोबाइल वापराचे केवळ दुष्परिणाम न सांगता या व्यसनापासून मुक्त होण्यासाठी व्यवहार्य उपाययोजना देखील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. त्यामध्ये 'मोबाइल पार्किंग झोन' ही संकल्पना विशेषत्वाने विद्यार्थ्यांना भावली. तसेच जेवताना मोबाइल किंवा टीव्हीचा वापर न करणे आणि झोपण्यापूर्वी किमान एक तास स्क्रीनपासून दूर राहणे यासारख्या आरोग्यदायी सवयी आत्मसात करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाचा योग्य व संयमित वापर व्हावा, तसेच त्यांच्यात आरोग्यदायी सवयी निर्माण व्हाव्यात, या उद्देशाने गोदावरी बहुउद्देशीय संस्था संचालित सन्मित्र पब्लिक स्कूल, अकोला येथे मोबाइल ॲडिक्शन अवेअरनेस कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास अकोल्यातील



प्रसिद्ध हॅप्पीनेस फाउंडेशन ग्रुपचे सहकार्य लाभले. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून रविंद्र पोतदार, संजय पिंपरकर आणि डॉ. सुनीता लढ्ढा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या ओघवत्या भाषेत त्यांनी मोबाइलचा अतिरेकी वापर विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर, स्मरणशक्तीवर, मेंदूवर व अभ्यासावर कसा नकारात्मक परिणाम करतो, हे स्पष्ट केले. अतिवापरामुळे मेंदूत होणारे बदल व त्याचे गंभीर परिणाम विद्यार्थ्यांना पटवून दिले. संपूर्ण सत्र अत्यंत परस्परसंवादी व विचारप्रवर्तक ठरले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वतःच्या दैनंदिन जीवनात मोबाइलच्या अतिवापराचे परिणाम मान्य केले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या मनावर ठसा उमटवून गेले व त्यांनी डिजिटल शिस्त अंगीकारण्याचा निर्धार केला. कार्यशाळेच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे मोबाइलचा वापर कमी करणे व केवळ आवश्यक तेव्हाच करणे या संकल्पनेला मान्यता देत शपथ घेतली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांच्या तसेच शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शाळा व्यवस्थापनाने हॅप्पीनेस फाउंडेशन ग्रुप व मान्यवर वक्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# उमरखेड येथे काँग्रेसची आढावा बैठक

**उमरखेड :** शेतकऱ्यांच्या वर्षभराची मेहनत अतिवृष्टी व पुरात वाहून गेली. उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या वेदनेची हाक राहुलगांधी प्रमाणे रस्त्यावर उतरून, आंधळ्या, मुक्या, बहिऱ्या सरकारच्या कानापर्यंत मोर्चा काढून पोहोचवू, त्यांना पुरेपूर मदत मिळवून देण्याची जबाबदारी आता काँग्रेसच्या खांद्यावर असल्याचे मत राम देवसरकर यांनी व्यक्त केले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी तातू देशमुख, विधानसभा निरीक्षक चंद्रकांत साठे, सचिन नाईक, नंदकिशोर अग्रवाल, दत्तराव शिंदे, शिवाजी देशमुख, गोपाल अग्रवाल, बाळासाहेब चंद्रे, महेंद्र कावळे, अनिल राठोड, प्रेमराव वानखेडे, शैलेश कोपरकर, सूर्यकांत डिंडाळकर, खाजाभाई कुरेशी, सुधाकर लाहेवार, अजय माहेश्वरी, विवेक मुडे, अंबादास धुळे, तालीम शेख आदि मंचावर उपस्थित होते. देवसरकर पुढे बोलताना म्हणाले, संवेदना बोथट झालेले सत्ताधारी सध्या धर्माच्या आणि जाती, जातींमध्ये भांडणे लावून, जन मानसांना पेटवून आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# दीडशे शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करणार

■ महासागर प्रतिनिधी

**चोहोट्टा , दि. १ :** चोहोट्टा बाजार येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान सेवा पंधरवडा अंतर्गत समाधान शिबिर व जनसंवाद कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या शिबिरात फेरफार अदालत, रस्ता अदालत व जिवंत सातबारा मोहीम राबवण्यात आली. यामध्ये देवर्डा येथील शेतामधील पाण्याचा बांध मोकळा करून आपसी समझोत्याने मोकळा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन शेतकऱ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.



तसेच १५ सातबारे, २० जातीचे प्रमाणपत्र, १० उत्पन्न दाखला, १० आठ 'अ' ग्रामपंचायत इत्यादी दाखले वाटप करण्यात आले. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना चोहोट्टा बाजार मंडळ मधील १५० शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करणार, असे यावेळी उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान नागरिकांना जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलिअर, अधिवास व उत्पन्न दाखले मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

यासोबतच आरोग्य, पुरवठा, भूमी अभिलेख, पंचायत समिती, आरोग्य विभाग, पशूसंवर्धन विभाग, रजिस्ट्र ऑफिस विभाग आदी योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण, सहदुय्यम निबंधक श्रेणी १ अकोट नितीन कुलकर्णी, ए. यु. खान नायब तहसीलदार मनोज मानकर, सुधीर थिटे, गटविकास अधिकारी माया वानखडे, भूमिअभिलेख अधीक्षक सोनलाल पालवे, तालुका कृषी अधिकारी यांच्यासह मंडळातील सर्व सरपंच भाजप कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार सुधीर थेटे यांनी केले, आभार प्रदर्शन ग्राम महसूल अधिकारी अतुल वानखडे यांनी मानले. चोहोट्टा बाजार मंडळ अधिकारी विशाल शेरेकर, ग्राम महसूल अधिकारी महेश सरकटे, अतुल वानखडे गणेश धात्रक, सचिन चिकार, शिवराज दाभाडे, दिपाली तेलगोटे, महसूलमित्र किशोर राठोड आदींची उपस्थिती होती.

सीमांकन मोहिमेत मोठी गती तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण यांनी सांगितले की, चोहोट्टा बाजार मंडळातील तब्बल १५० शेतरस्त्यांचे सीमांकन करून ते अतिक्रमणमुक्त करण्याची व्यापक मोहिम सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शेतमाल वाहतूक सुलभ होईल आणि रस्त्यांचे कायमस्वरूपी रक्षण होईल. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर होते.

# शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख आणि राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष यांच्यात राडा

**गोंदिया:** संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात नवरात्र उत्सव शांततापूर्ण साजरा होत असताना गोंदिया जिल्हा शिवसेना (उबाठा) प्रमुख आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे शहर अध्यक्ष यांच्यात सार्वजनिक दुर्गा मंदिर मंडपात प्रवेश करण्यावरून राडा झाला. सोमवारी २९ सप्टेंबर रोजी रात्री ११:३० वाजता च्या सुमारास गोंदिया शहरातील मामा चौक सार्वजनिक दुर्गा उत्सव समिती मंडपात घडली. याप्रकरणी मामा चौक सार्वजनिक दुर्गा उत्सव समितीचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहर अध्यक्ष नानू मुदलियार यांनी गोंदिया शहर पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार गोंदिया जिल्हा शिवसेना (उबाठा) प्रमुख माजी नगरसेवक पंकज यादव आणि त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका ललिता यादव आणि इतर सहा-सात लोक यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती गोंदिया शहर पोलीस निरीक्षक किशोर पर्वते यांनी दिली आहे. गोंदिया जिल्हा शिवसेना (उबाठा) प्रमुख, माजी नगरसेवक पंकज यादव हे पत्नी व माजी नगरसेविका ललिता यादव यांच्यासह सार्वजनिक मंडळात दुर्गा मातेचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. मंडपात प्रवेश करीत असताना त्यांना हवनकुंड निर्माण करण्याचे कार्य सुरू असल्याचे कारण सांगून त्यांना मूर्तीपर्यंत जाण्यास अडवण्यात आले.

## दर्यापूर बाजार समितीची वार्षिक सभेत ठराव

# डॉ. पंजाबराव देशमुख यांना 'भारतरत्न' द्या

■ महासागर प्रतिनिधी

**दर्यापूर , दि. १ :** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी अत्यंत उत्साहात कृषी भवनात पार पडली. सभेत मागील सभेचे कार्यवृत्त वाचन करून मंजूर करण्यात आले. तसेच मागील आर्थिक वर्षाचा आर्थिक अहवाल सादर करण्यात आला. महत्त्वपूर्ण ठरावांमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख यांना 'भारतरत्न' पुरस्कार जाहीर करण्याची मागणी, पूरग्रस्त बांधवांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला रुपये २५ हजारांची आर्थिक मदत, सोयाबीन शासकीय खरेदी त्वरित सुरू करणे, तसेच ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे या ठरावांचा समावेश आहे. सभेचे अध्यक्षपद कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल गावंडे यांनी भूषवले. या सभेला प्रमुख उपस्थिती



म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी अध्यक्ष व तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर भारसाकडे, आमदार गजानन लवटे, माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह परिहार, बाजार समितीचे उपसभापती श्रीकृष्ण कराळे, जि.प.माजी सभापती व भाज्या समीती संचालक बाळासाहेब हिंगणिकर, संचालक बाळासाहेब वानखडे, संचालिका कांचनमाला गावंडे, संचालक राजेंद्र वढाळ, संचालिका मनीषा अरबट, संचालक साहेबराव भदे, संचालक गजानन देवतळे, संचालक सुनिल डिके, संचालक राजेश खेडकर, संचालक अभय गावंडे, संचालक प्रभाकर तराळ, संचालक राजेश राठी, संचालक अनिल भारसाकडे, संचालक असिफ खान, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजानन जाधव, उपाध्यक्ष प्रभाकर कोरपे, संजय बेलोकार, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव नितेश वानखडे तसेच बाजार समितीचे सहसचिव सुनिल कोकाटे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन संचालक अनिल भारसाकडे यांनी केले, तर आभार डॉ. मनीषा अरबट यांनी मानले. सभेला खरेदी विक्री संघाचे सर्व संचालक तसेच तालुक्यातील सेवा सहकारी सोसायट्यांचे अध्यक्ष-उपाध्यक्ष, सरपंच- उपसरपंच, सदस्य, विविध संस्थांचे मान्यवर संचालक संख्येने उपस्थित होते.


## MAHAVITARAN — Tender Notice

Super scribed and sealed offers in Two Bid system are invited from reputed Firms/Company/Agencies for tender refloated for Procurement of 66KV, 33KV & 11KV Cable Jointing Kits for various cable sizes for Nagpur Urban Circle **tender no. SE/NUC/Cable Jointing Kit /25-26/R/T-14 Amt:Rs. 20.00 lakhs** excluding GST. The Tender details/documents for above Tender are available on website url **etender.mahadiscom.in/eatApp.** The Tender documents can be downloaded from aforesaid website from **Dt.02.10.2025.** Submit tender duly filled in on or before **Dt.10.10.2025,15.00 Hrs .** If any change in the tender Documents/Schedule, the same will be displayed on MSEDCL website only. So respective bidders are requested to regularly check the website.

**Superintending Engineer (NUC)**
**NZ/PR No. 118 Dt.01.10.2025** **MSEDCL, Nagpur**

## MAHAGENCO — E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | BM-III / Rfx No. 3000062212 / Annual work contract of Maintenance of APH, Fans, Burners, Ducts, Dampers, Soot Blowers, oil guns etc including electrical and C&I related works at 2X500 MW CSTPS for 2 years / Rs.15700215.84/- |
| 2 | WTP-II / Rfx No. 3000062199 / Procurement of Laboratory Glass wares, PVC wares and Various consumables for WTP-II, CSTPS / Rs.1129074/- |
| 3 | TM-III / Rfx No. 3000062201 / Procurement of gear box assembly for boiler feed pump suction valve installed at Unit-8&9, CSTPS, Chandrapur / Rs.675000/- |
| 4 | IC-II / Rfx No. 3000062224 (Refloated) / Procurement of Various types of Pressure Gauges for Unit-5, 6, 7 & WTP-II at CSTPS, Chandrapur / Rs.466353/- |
| 5 | BM-II / Rfx No. 3000062248 (Refloated) / Procurement of HP Tubes for Platen Superheater & Reheaters in Boiler Unit 5,6 & 7 at CSTPS, Chandrapur / Rs.3854580/- |
| 6 | BM-II / Rfx No. 3000062249 / Work of Radiography of HP weld joints during AOH in boiler Unit-5 (500 MW) at CSTPS, Chandrapur / Rs.2079686/- |
| 7 | BM-II / Rfx No. 3000062251 (Refloated) / Work of Reconditioning of puppet valves with stellited machining flange for wall soot blower & LRSB in U-5, 6 & 7 at CSTPS, Chandrapur / Rs.1172880/- |
| 8 | CHP-A / Rfx No. 3000062259 (Refloated) / Procurement of spares for Aerial ropeway and Belt conveyor system at CHP-A, CSTPS, Chandrapur / Rs.1015395.26/- |
| 9 | BM-II / Rfx No. 3000062256 / Work of replacement of worn-out Fuel pipes, Coal mill Bends, Mill outlet elbows and couplings of BBD coal mill fuel pipe in unit - 7 during unit AOH / short shutdown / mill individual shutdown / Rs. 1689080.16/- |
| 10 | CHP-A / Rfx No. 3000062260 (Refloated) / Supply of various types of Idler Frames for 1000 / 1200mm wide belt conveyors at CHP-A, CSTPS / Rs.1235225/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 10)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### Offline Tender Notice

Commissioner NMC invite Offline tenders for the following works. This Offline tender can be Submitted by the registered contractor of NMC. The terms and conditions of tender are available in tender form the sale and purchase of Offline tender form at E.E. Zone 02 Office, Harne Marg Gokulpeth Market Dharampeth Zone Office NMC.

| Sr. No. | Name of Work | Tender Cost | EMD |
|---|---|---|---|
| 1 | Repairing of Construction of Manhole Chambers at various places in Prabhag No. 15 | 831371 | 8400 |
| 2 | Providing and Fixing Barricading and Sand Bags at various Places in Dharampeth Zone 02 | 838463 | 8400 |
| 3 | Construction of C.C. Road near H/O Gopal Navghare Kailash Sahu to Mahant at Anupam Society in Prabhag No. 12 | 414886 | 4200 |

**Note : (1)** Time Period (In Days) : 4 Months **(2)** Cost of Blank Tender form (Rs.) 590/- **(3)** Class of Contractor : I to VII **(4)** Tender Sale & Submission Start Date : **01.10.2025. (5)** Tender Sale & Submission End Date : **09.10.2025 at 4:00 pm. (6)** Date of Opening of Tender (if Possible) : **09.10.2025 at 5:00 pm**

**Advt No. 522 PR**
**Date 01.10.2025**

**Executive Engineer Zone 02**
**Nagpur Municipal Corporation**

PN/25/632

## कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी (जिल्हा नागपूर)

न.प.वा./वि.वि/२७४३/२०२५ दिनांक:-३०/०९/२०२५

### निविदा सूचना

वानाडोंगरी नगर परिषदेला नगरपरिषद निधीमधून खालील काम करण्याकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करायची आहे. त्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सिलबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. इच्छुक कंत्राटदारांनी निविदा दिनांक-१०/०२/२०२५ चे दुपारी ४ वाजेपर्यंत न. प. कार्यालयात पोहोचता करावी.

| अ. क्र | कामाचे विवरण | अंदाजीत किंमत | निविदा अनामत | निविदा प्रपत्र किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supplying, Erecting and Commissioning 12.5 mtr Highmast at Padole Layout Open Space (Opp to Nagpure House) Under Municipal Council Wanadongari Dist Nagpur. | ५,०३,७२२/- | ५०३७/- | ५००/- | ६० दिवस |
| 2 | Supplying, Erecting and Commissioning 16 mtr Highmast at Taluka Krida Sankul Under Municipal Council Wanadongari Dist Nagpur. | ६,५०,८१७/- | ६५०८/- | ५००/- | ६० दिवस |
| 3 | Supply and erection of 7 mtr octagonal pole at Sangam Road (Jack and Jill Convent) to Radhika Vihar Prabhag 10 under Municipal Council Wanadongri Dist-Nagpur. | ६,३६,८३४/- | ६३६८/- | ५००/- | ६० दिवस |

अटी व शर्ती :
१) कोरी निविदा प्रपत्र विक्री दि ०९/०२/२०२५ चे दु - ४.०० वाजेपर्यंत शुल्काची रक्कम रोखीने जमा करून मिळेल.
२) कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
३) इतर अटी व शर्ती निविदा प्रपत्रात पहावयास मिळेल.
४) अधिक माहिती न. प. चे विद्युत विभागांमध्ये कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
नगरपरिषद वानाडोंगरी

## महानिर्मिती — भु. औ. वि. कें.
### ई-निविदा सूचना क्र. १४/२०२५-२६

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा/कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र./विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत/बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ३०००६०९७४ / कोळसा हाताळणी विभाग २ X ५०० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे कोळसा हाताळणी विभाग २ X ५०० मे. वॅ मध्ये ॲप्रॉन फीडर रिसीव्हिंग हॉपरच्या पुनर्संचयनाचे काम. | रु. २,१२,५४,७६३/- / रु. २,१६,०००/- |
| २ | ३००००६१८२९ / कोळसा हाताळणी विभाग २ X २१० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, कोळसा हाताळणी विभाग २ X २१० मे. वॅ येथे केमिकल फ्लोअर फिल कंपाऊंडद्वारे बंकर हॉपर मजबूत करण्याचे काम. | रु. १,९४,४३,०००/- / रु.१,९७,९०० /- |
| ३ | ३००००६१९९३ / बाष्पक संधारण विभाग २ X ५०० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, येथे आवश्यकतेनुसार आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा एच.पी. वेल्डिंग आणि अलाइड वर्क्स शॉर्ट शटडाउन असताना बॉयलर ट्यूब गळती पाहण्यासाठी कामाचा करार. | रु.१,०६,६७,८०२/- / रु.१,१०,२००/- |
| ४ | ३००००६१६३४ / राख हाताळणी विभाग २ X ५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर ,येथील पंपाच्या विविध सुटे भागांच्या पूर्ण पुनर्बांधणी आणि नूतनीकरणाच्या कामाचा करार. | रु.५७,९१,९४५/- / रु.६१,४००/- |
| ५ | ३००००६१७५० / विद्युत परिरक्षण २१० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर ,येथे 110V DC बॅटरी आणि बॅटरी चार्जिंग, 110V DC, 150AH प्लांट टाइप लीड ॲसिड बॅटरीसाठी योग्य उपकरणे यांचा पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वित करणे. | रु.५०,८८,६००/- / रु.५४,४००/- |
| ६ | ३००००६१९५१ / अग्निशमण विभाग २X५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, येथे आयएसची खरेदी: १६०१८ ची खरेदी मार्क डीसीपी गन प्रकारातील ट्रॉली माउंटेड ५० किलो क्षमतेचे चाके असलेले अग्निशामक यंत्र (फायर रेटिंगसह: टाइप-I बी, ईएन स्टँडर्डनुसार) ज्यामध्ये हॉरिझोनटल टीजी फ्लोअर्स अग्निशामक आहेत. | रु.४९,५०,०००/- / रु.५३,०००/- |
| ७ | ३००००६१७२४ / स्थापत्य विभाग २X५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर , वसाहतीतील परिसरात विविध ठिकाणी विद्यमान बिटुमिनस रस्त्याची दुरुस्ती करणे. | रु.४६,६६,०४१ - / रु.५०,२००/- |
| ८ | ३००००६२२१० / बाष्पक संधारण विभाग २X५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, २X५०० मेगावॅट, येथे एच.पी. वेल्डिंग आणि रेडिओग्राफीसाठी वार्षिक करार. | रु.४८,७५,९०३ /- / रु.५२,३००/- |
| ९ | ३००००६२२१९ / बाष्पक संधारण विभाग २X५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे २X५०० मेगावॅट क्षमतेच्या बीटीपीएस युनिट-५ मधील बॉयलर टॉप ते एपीएच इनलेट पर्यंत इन्सुलेशन पुरवण्याच्या कामाचा करार. | रु.३५,४२,४००/- / रु.३८,९००/- |
| १० | ३००००६२१५१ / जल संधारण विभाग २X२१०मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर,२१० मेगावॅट क्षमतेच्या डब्ल्यू.टी. प्लांटमधील पिण्याच्या पाण्याच्या प्रणाली आणि जी.एस. तलावांना द्रव क्लोरीन वायूचा पुरवठा आणि डोस देण्यासाठी द्विवार्षिक करार. | रु.३३,४१,९६७/- / रु.३६,९००/- |
| ११ | ३००००६१००३ / पर्यावरण विभाग २X५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे संबंधित एएक्यू पॅरामीटर्ससाठी संवेदनशील ठिकाणी, २० किमी त्रिज्यापर्यंतच्या परिसरात मोबाईल मॉनिटरिंग व्हॅनद्वारे पर्यावरणीय देखरेखीसाठी वार्षिक करार. | रु.३२,९०,०४०/- / रु.३६,४००/- |
| १२ | ३००००६१५१८ / विद्युत परिरक्षण व चाचणी विभाग २X५००मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर २X५०० मेगावॅट क्षमतेच्या एलटी पॉवर केबल टाकणे, काढणे, स्ट्रेट-थ्रू जॉइंटिंग आणि एंड टर्मिनेशनचे द्विवार्षिक करार. | रु.३१,६८,९०५/- / रु.३५,२००/- |

निविदा खर्च १ ,१८०/ - (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या.
htt{s://e{rocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.),
भु. औ. वि. कें, दीपनगर.

# अहिंसा : भारतीय तत्त्वज्ञानाची मानवतेला दिलेली शाश्वत देणगी

मानवजातीच्या उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर त्यात वैचारिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय अशा विविध प्रवाहांची सतत धारा वाहताना दिसते. या प्रवाहांनी मानवाला कधी संघर्ष दिला, कधी विकासाची संधी दिली, तर कधी त्याला अधःपतनाच्या मार्गावर नेले. परंतु या साऱ्या गोंधळातही काही शाश्वत मूल्ये अशी आहेत की त्यांनी मानवतेला टिकवून ठेवले, जीवनाला अर्थ दिला आणि समाजाला योग्य दिशा दिली. या मूल्यांमध्ये अहिंसा हे भारतीय तत्त्वज्ञानाने जगाला आणि मानवतेला दिलेली सर्वांत मोठी शाश्वत देणगी आहे. हिंसेच्या आगीमध्ये जळणाऱ्या मानवतेला अहिंसा हा शीतल झरा आहे. म्हणूनच २ ऑक्टोबर हा दिवस, जो महात्मा गांधीजींच्या जन्मदिनानिमित्त ह्यआंतरराष्ट्रीय अहिंसा दिनह्न म्हणून साजरा केला जातो, तो केवळ गांधीजींच्या स्मृतीपुरता मर्यादित नसून भारतीय विचारसंपदेच्या गौरवाचे प्रतीक आहे.

------------

अहिंसेची कल्पना भारतात नवी नाही. अहिंसा परमो धर्मः हा विचार लोकांच्या आचार-विचारात रूजलेला होता. पण अहिंसेला सर्वाधिक सुस्पष्ट रूप आणि दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनविले ते बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानाने. या दोन परंपरांनी अहिंसेला केवळ धार्मिक उपदेश न ठेवता ती सामाजिक, नैतिक आणि वैयक्तिक जीवनाच्या प्रत्येक पातळीवर आचरणात आणली आहे.

भगवान बुद्धांनी करुणा, मैत्रीभावना आणि समत्व यांच्या माध्यमातून अहिंसेला मानवी जीवनाचा पाया बनविला, तर भगवान महावीरांनी अहिंसेला सर्वोच्च व्रत मानले. त्यामुळे भारताची ही देणगी केवळ एका देशापुरती मर्यादित राहिली नाही, तर तिने संपूर्ण जगाच्या वैचारिक इतिहासाला घडविले.

भगवान गौतम बुद्धांच्या शिकवणीत अहिंसेला करुणा आणि मैत्रीभावनेच्या माध्यमातून केंद्रस्थानी ठेवण्यात आले. बुद्धांनी मानवी जीवनातील दुःखाचे मूळ अज्ञान, लोभ आणि द्वेषात शोधले. त्यांनी सांगितले की प्रत्येक जीव दुःख टाळण्याची इच्छा करतो; त्यामुळे कोणत्याही जीवाला दुःख देणे ही सर्वांत मोठी हिंसा आहे.

बुद्धांच्या पंचशीलांमध्ये पहिला नियम किंवा शील आहे ते म्हणजे प्राण्यांचा जीव घेणार नाही. हा नियम केवळ हत्या न करण्यापुरता मर्यादित नाही, तर इतरांना त्रास देणार नाही, शोषण करणार नाही, दास्य स्वीकारणार नाही, असेही त्याचे व्यापक स्वरूप आहे.

बुद्धांच्या अष्टांगिक मार्गात सम्यक दृष्टी, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका ही सर्व अंग अहिंसेशी थेट जोडलेली आहेत. खोटे बोलणे, कटु वाणी वापरणे, परनिंदा करणे, लोभ, मत्सर, क्रोध या सर्व मानसिक हिंसा आहेत. त्यामुळे बुद्धांनी मन, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर करुणा आणि मैत्री विकसित करण्यावर भर दिला. बौद्ध परंपरेतील मैत्रीभावना ध्यान म्हणजे अहिंसेचेच एक सुंदर व्यावहारिक रूप आहे.

या ध्यानात साधक स्वतःसाठी आणि सर्व प्राणिमात्रांसाठी शुभेच्छा व्यक्त करतो ह्यसर्व प्राणी सुखी होवोत, सर्व प्राणी निरोगी राहोत, सर्व प्राणी शांततेत नांदोतह्न. या प्रक्रियेतून मनातील द्वेष, राग, मत्सर नाहीसे होऊन करुणा, प्रेम आणि सहजीवनभाव निर्माण होतो.

बुद्धांच्या शिकवणीचा समाजावर फार मोठा परिणाम झाला. त्याकाळी प्रचलित असलेल्या प्राण्यांच्या बलिदानांच्या प्रथा, जातीभेद, दास्यप्रथा यावर मोठ्या प्रमाणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. आशियातील चीन, जपान, श्रीलंका, थायलंड, कोरिया या देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला आणि त्यासोबतच अहिंसेचा विचारही सर्वत्र रुजला. त्यामुळे अहिंसा ही केवळ भारतीय मूल्य न राहता संपूर्ण आशियाई संस्कृतीचा आधारस्तंभ ठरली.

तसेच जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांनी अहिंसेला जीवनाचा केंद्रबिंदू मानला. त्यांच्या मते प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येक आत्मा शुद्ध, शाश्वत व समान आहे. त्यामुळे कोणत्याही जीवाला दुखविणे म्हणजे स्वतःच्या आत्म्यावरच आघात करणे होय.

महावीरांनी पाच महान व्रते सांगितली झ अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. यामध्ये अहिंसा हे सर्वोच्च व्रत मानले जाते, कारण त्याशिवाय इतर व्रतांचे अस्तित्वच अशक्य आहे. जैन आचारसंहितेनुसार अहिंसा केवळ हत्या टाळणे एवढीच मर्यादित नाही, तर ती विचार, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर आचरली जाणारी संपूर्ण जीवनपद्धती आहे.

जैन साधू-साध्वींनी आचरलेली अहिंसा इतकी सूक्ष्म आहे की ती पाहून जग थक्क होते. चालताना एखादा कीटक चिरडला जाणार नाही याची दक्षता घेणे, पाणी गाळून पिणे, रात्री न चालणे, जमिनीवर बसताना सूक्ष्म जीवांना इजा होणार नाही यासाठी पायाखाली कापड पसरवणे ही त्यांच्या जीवनातील वास्तव उदाहरणे आहेत.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

इतकेच नव्हे तर ते वाणीतील कटुता, विचारांतील वैरभाव यांनाही हिंसा मानतात. गृहस्थांसाठीही महावीरांनी अहिंसेचा उपदेश केला. जाणूनबुजून कोणत्याही सजीवाला त्रास न देणे, व्यापारात फसवणूक न करणे, इतरांच्या संपत्तीवर डोळा न ठेवणे, कुटुंबात संयम व करुणा पाळणे ही गृहस्थांची अहिंसा ठरते.

जैन तत्त्वज्ञानाद्वारे अहिंसेच्या वैचारिक विस्ताराचे दर्शन घडवतात. सत्य एकांगी नसते; ते विविध दृष्टीकोनांतून समजावे लागते. त्यामुळे इतरांचा विचार नाकारणे, त्यांना चुकीचे ठरविणे, आपलेच सत्य अंतिम मानणे ही एक प्रकारची मानसिक हिंसा ठरते. तसेच प्रत्येक विधान सापेक्ष आहे, ते अमुकदृष्ट्या सत्य असते. त्यामुळे वादविवादात अडेलतट्टूपणा टाळून संवाद साधणे, परस्पर सहिष्णुता बाळगणे हेही अहिंसेचेच रूप आहे. अशा प्रकारे जैन परंपरेने अहिंसेला जीवनाच्या प्रत्येक अंगात विस्तार दिला.

या दीर्घ परंपरेला आधुनिक काळात नवे परिमाण दिले ते महात्मा गांधींनी. गांधीजींनी अहिंसेला केवळ वैयक्तिक चारित्र्याची गोष्ट न मानता सामाजिक व राजकीय संघर्षाचे प्रभावी साधन बनवले. त्यांनी सांगितले की सत्यासाठी लढताना अहिंसा हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढताना महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून अहिंसेचा उपयोग केला. त्यांनी दाखवून दिले की शस्त्र न उचलता देखील साम्राज्याला गुडघे टेकवता येतात. महात्मा गांधीजींच्या या प्रयोगाने जगातील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली.

मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला, दलाई लामा यांसारख्या नेत्यांनी अहिंसेच्या मार्गाने सामाजिक परिवर्तन घडवून आणले. संयुक्त राष्ट्रसंघाने महात्मा गांधीजींच्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी, आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन घोषित करून अहिंसा विचारधारेचे जागतिक महत्त्व अधोरेखित केले.

आजच्या युगात अहिंसेचे महत्त्व अधिकच वाढले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाला अवकाशाचा वेध घेता आला, संगणक व कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण करता आली, पण त्याचबरोबर युद्ध, दहशतवाद, अण्वस्त्रांची शर्यत, पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक असमानता यांसारख्या समस्या अधिकच तीव्र झाल्या. मानवी लोभामुळे पृथ्वीचे संतुलन धोक्यात आले आहे.

हिंसा केवळ रणांगणावर नव्हे तर विचारांमध्ये, वाणीमध्ये आणि समाजरचनेतही वाढताना दिसते. अशा वेळी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाची देणगी असलेली अहिंसा हीच मानवतेचा खरा आधार ठरते.

अहिंसा म्हणजे केवळ युद्ध टाळणे नाही, तर अहिंसा म्हणजे पर्यावरणाचा विध्वंस न करणे, प्राण्यांवर अनावश्यक अत्याचार न करणे, महिलांवर व दुर्बलांवर होणारी हिंसा थांबवणे, जातीय, धार्मिक वा वांशिक भेदभाव दूर करणे, सामाजिक व आर्थिक अन्यायाला अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणे. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात विचार, वाणी आणि कृती या तिन्ही स्तरांवर अहिंसा पाळली, तर समाजात शांतता, प्रेम व सहजीवनाचे वातावरण निर्माण होईल.

अहिंसा ही केवळ उपदेशाची गोष्ट न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. बौद्ध आणि जैन परंपरांनी दिलेली करुणा व मैत्रीभावना, गांधीजींनी दिलेला सत्याग्रहाचा मार्ग आणि संयुक्त राष्ट्रसंघाने अहिंसेला दिलेली जागतिक मान्यता या सर्व गोष्टी आपल्याला आठवण करून देतात की अहिंसा हीच भविष्यातील मानवतेची तारणहार आहे.

हिंसा विध्वंस घडवते, तर अहिंसा सृजन करते. हिंसा द्वेष वाढवते, तर अहिंसा मैत्री निर्माण करते. हिंसा मृत्यू पसरवते, तर अहिंसा जीवनाचा उत्सव साजरा करते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त आपण सर्वांनी हे स्मरण केले पाहिजे की, जर मानवतेचे भविष्य सुरक्षित, उज्ज्वल आणि शांततामय करायचे असेल, तर अहिंसा हीच जीवनपद्धती म्हणून स्वीकारावी लागेल. हे केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे कर्तव्य आहे. अहिंसा ही भारतीय तत्त्वज्ञानाची मानवतेला दिलेली शाश्वत देणगी आहे आणि हीच देणगी आपल्याला उज्ज्वल उद्याच्या दिशेने नेणारी आहे.

---

# : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ :
## समाज जागरणाचा युग प्रवर्तक प्रवास

सन १९२५... नागपूरचा महल परिसर... विजयादशमीचा पवित्र दिवस... या दिवशी डॉ. केशव बलिराम हेडगेवार या युगप्रवर्तकाने एक असे बीज पेरले ज्याने पुढील काळात भारतीय समाज व राष्ट्रजीवनाला खोलवर स्पर्श केला. ते बीज होते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे.

डॉ. हेडगेवार हे केवळ क्रांतिकारक नव्हते तर समाजमनाचा वेध घेणारे चिंतक होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला, तुरुंगवास भोगला; पण त्यांना प्रकर्षाने जाणवले की फक्त राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी राष्ट्र महान होणार नाही. जोपर्यंत समाज संघटित व आत्मविश्वासी होत नाही, तोपर्यंत भारत आपले प्राचीन वैभव गाठू शकणार नाही. हाच त्यांचा युगप्रवर्तक दृष्टिकोन होता.


**संघटनेची सुरुवात**

संघाची कार्यपद्धती वेगळीच होती. मोठे कार्यालय नाही, चमकदार प्रचार नाही. फक्त रोज भेटण्याची एक साधी पद्धत झ शाखा. खेळ, व्यायाम, गीत, प्रार्थना आणि संवाद यामधून स्वयंसेवक घडू लागले. हीच शाखा पुढे समाजनिष्ठ, अनुशासित आणि चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांची शाळा ठरली.

**समाजविश्वासाची कमाई**

डॉ. हेडगेवार आणि त्यानंतर गुरुजी माधव सदाशिव गोलवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली संघ वाढत गेला. १९४० मध्ये नागपूर प्रशिक्षण वर्गात हेडगेवार म्हणाले, आज माझ्या डोळ्यासमोर हिंदू राष्ट्राची प्रतिकृती उभी आहे.

आज भारतातील ९८ टक्के जिल्ह्यांत व ९२ टक्के तालुक्यांत संघशाखा सुरू आहेत. ८३,१२९ दैनिक आणि ३२,१४७ साप्ताहिक शाखा ही त्याची साक्ष आहे.



डॉ. प्रवीण डबली
वरिष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६
७०२०३४३४२८

**सत्याग्रहाची ताकद**

१९४८ मध्ये संघावर बंदी आली. मात्र स्वयंसेवकांनी अहिंसक सत्याग्रह केला आणि सरकारला ती बंदी उठवावी लागली. हे दाखवून दिले की संघ हा केवळ संघटना नाही तर लोकशाही व सत्यशक्तीवर विश्वास ठेवणारे आंदोलन आहे.

**समाजकार्याचा विस्तार**

बंदी उठल्यानंतर संघाने शिक्षण, विद्यार्थी, कामगार, शेतकरी, वनवासी, सेवा व कला अशा अनेक क्षेत्रांत स्वतंत्र संघटनांची निर्मिती केली. विद्या भारती, विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, सेवा भारती, संस्कार भारती अशा ३२ हून अधिक संघटनांनी समाजकार्याची पायाभरणी केली.

**सेवा ही संघटनेची ओळख**

डॉ. हेडगेवार यांच्या जन्मशताब्दी वर्षी (१९८८-८९) सेवा कार्य हे संघाच्या तिसऱ्या टप्प्याचे केंद्र ठरले. १९९० मध्ये सेवा विभाग सुरू झाला. आज देशभरात १,२९,००० हून अधिक सेवा प्रकल्प सुरू आहेत. आपत्ती, भूकंप, पूर, महामारी कुठलीही परिस्थिती असो स्वयंसेवक तत्काळ मदतीसाठी धावून जातात.

**ग्रामविकास व गोसंवर्धन**

संघ ग्रामीण जीवनाशीही घट्ट जोडलेला आहे. जैविक शेती, भारतीय गाईंचे संवर्धन, ग्रामविकास व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण या क्षेत्रांत स्वयंसेवक कार्यरत आहेत. गाव बदलले तर राष्ट्र बदलेल हा हेडगेवारांचा दृष्टिकोन आजही संघाच्या कार्याला दिशा देतो.

**पंचपरिवर्तन व समाजजागरण**

शतकाच्या या टप्प्यावर संघाने पंचपरिवर्तनाचे आवाहन केले आहे. व्यक्तिगत, पारिवारिक आणि सामाजिक जीवनातील पाच महत्त्वाचे बदल करून व्यापक समाजजागरण घडवण्याची ही जीवनशैली आहे.

**नागपूर ते वटवृक्ष**

नागपूरच्या मातीतले ते छोटे बीज आज वटवृक्ष बनले आहे. कोट्यवधी स्वयंसेवक या छायेखाली राष्ट्रनिर्माणात कार्यरत आहेत. कुणी शेतकरी, कुणी मजूर, कुणी डॉक्टर, कुणी शिक्षक. पण उद्दिष्ट एकच, भारताला परमवैभवाच्या शिखरावर नेणे.

**अमृतकाल व विश्वगुरु**

आज भारत अमृतकाळात आहे. हा काळ मतभेद विसरून राष्ट्राला पुन्हा विश्वगुरु बनवण्याचा आहे. संघाचा संदेश स्पष्ट आहे झ समाजातील सज्जनशक्ती एकत्र आल्यावरच राष्ट्र आपल्या खऱ्या रूपात उभे राहील.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची १९२५ ते २०२५ ही शतकयात्रा ही केवळ संघटनेची गोष्ट नाही, तर भारतीय समाजाच्या आत्म्याची कहाणी आहे.


नागपूरच्या भूमीवर युगप्रवर्तक हेडगेवारांनी पेरलेले ते बीज आज वटवृक्ष बनले आहे आणि येणाऱ्या शतकांमध्येही समाजजीवनात मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही.

---

# बाप्पूंची स्वच्छता दशसूत्री!

आज २ ऑक्टोबर महात्मा गांधींची जयंती. जेव्हा जेव्हा गांधी जयंती जवळ येते, तेव्हा गांधीजींनी स्वीकारलेला सत्य, अहिंसा, सेवा, स्वदेशीचा मंत्र, मौलिक विचारांचे स्मरण होत असते हे गांधीजींच्या विचारांचे मोठेपण आणि आपल्या वैचारिक मागासलेपणाचे लक्षण मानले पाहिजे.

तन- मन-धनाच्या स्वच्छतेबाबत महात्मा गांधींची भूमिका ज्याप्रमाणे होती, तशी आजपावतो कुठल्याही राजकीय पुढाऱ्यांची झाली नसेल असे वाटते. ज्यावेळेस देशात स्वच्छतेचा अभाव होता. तेव्हा मोठ्या प्रमाणात रोगराईचा प्रादुर्भाव असायचा. अनेक साथींचे आजार दीर्घ काळापर्यंत कायम राहायचे. त्यात अनेकांचे प्राण जायचे. मनाला अस्वस्थ व विचलित करणारी दृश्य बघून महात्मा गांधींनी स्वच्छते संबंधी दशसुत्रींचा अवलंब केला.



**त्या दशसूत्री क्रमाने पाहूया:**

जर एखादी व्यक्ती स्वच्छ नसेल, तर ती निरोगी राहू शकत नाहीर महात्मा गांधीच्या या विचारावर कोण बरे असमत होऊ शकेल. हा विचार ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत पातळीवर असला तरी, त्याचे दुष्परिणाम व्यक्तिगतरित्या कुटुंबावर आणि समाजावर होत असतात.

**आपल्या ड्रॉइंग रूम प्रमाणे स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवावे हे महत्त्वाचे आहे.**

हे विधान ज्यावेळेसचे आहे, तेव्हा स्वच्छतागृहाची संख्या ही देशात मोजकीच होती.जी आज मोठ्या संख्येने आहे, परंतु हल्लीच्या काळात स्वच्छतागृह ही स्वच्छ असावी, अशी जाहिरात व्यावसायिक हेतूने सिने अभिनेता करताना दिसतात.

**नद्या स्वच्छ ठेवून आपण आपली सभ्यता जिवंत ठेवू शकतो.**

परंतु आज दुर्दैवाने प्रदूषित नद्यांच्या यादीत जगभराच्या दृष्टिकोनातून आपला देश प्रथम दहा क्रमांकात आहे. ज्या देशात नदीला माता मानले जाते, पूजन करतो त्याआज गटारगंगा झाल्याचे दिसतात.

**आंतरिक स्वच्छता ही पहिली गोष्ट आहे जी शिकविली पाहिजे.**

आज समाजात शारीरिक स्वच्छतेबाबत बहुतांशी सुधारणा झालेली दिसते आणि तीही' उपर से टामटूम, अंदर से राम जाने' या म्हणीप्रमाणे. पाच कर्मेंद्रिय एक वेळ स्वच्छ करू शकू! परंतु एक सूक्ष्म इंद्रिय आहे, ते म्हणजे मन. त्याची स्वच्छता होणे ही अत्यंत गरजेचे आहे. मन स्वच्छ झाले तर काया, वाचा,मने हिंसा होऊ होणार नाही, असे बापूजींना वाटायचे.

**मी कोणालाही माझ्या मनात घाणेरड्या पायांनी जाऊ देणार नाही.**

मानवाच्या मनातील विकारांची क्षालन होत नाही. तोपर्यंत कुठलीही कृती पवित्र होणारच नाही. मन करा रे प्रसन्न ' सर्व सिद्धीचे कारण " किंवा मनचंगा तो कटोरी मे गंगा हे संत वचनही कदापि विसरता कामा नये. शरीराच्या स्वच्छते सोबतच मनाची आंतरिक स्वच्छता ही तेवढीच महत्त्वाची नाही का?

**एखाद्याची चूक मान्य करणे म्हणजे झाडू लावण्यासारखे आहे, त्यामुळे पृष्ठभाग चमकदार आणि स्वच्छ होतो.**

परंतु बाप्पू आज तुमच्या विचारांना मूठ माती दिल्यासारखे वाटते. 'चुकीला माफी नाही' अशा विचारांचे स्टेटस ठेवणारे आजही कमी नाहीत इथे. खरं चुकतंय कोणाचं? याचे सुद्धा अवलोकन होत नाही. या उलट चूक दाखविणाऱ्या दोषी ठरविले जातं आणि ते सुद्धा मुठभर चुकीच्या लोकांमुळे. त्यामुळे औदार्याची आता हिंसा होते.

**प्रत्येकाने स्वत:चा कचरा स्वच्छ करावा.**

किती सोप्प वाक्य आहे बाप्पू, परंतु आम्ही अवघड करून टाकलंय. केळी खाल्ली की त्याची सालपट आहे तिथेच टाकून देणार. मावा, तंबाखू खाऊन तिथेच थुंकून घाण करणार. स्वतःच केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट न लावता उघड्यावर फेकून देणाऱ्यांना बापूंचा सल्ला अत्यंत मोलाचाआहे.

**आपल्या आचरणात स्वच्छता अशा प्रकारे स्वीकारा की ती आपली सवय बनेल!**

बापूंनी दर्शविलेली स्वच्छतेची दशसूत्री च्या पालनाने जीवनात सवयींच्या रूपांतरित व्हायला अजून तरी फार मोठा अवकाश दिसतो, हेच फार मोठे दुर्भाग्य आहे.

**राजकीय स्वातंत्र्यांपेक्षा स्वच्छता महत्त्वाची.**

बापूंची शेवटचे स्वच्छते बाबत सूत्र फार मनाला विचलित आणि अस्वस्थ करते. आज स्वच्छता दुय्यम स्थानी आली बाप्पू. राजकीय स्वातंत्र्याचा जिकडे तिकडे बोलबला आहे. पुढारी मोठे आणि वैचारिक, नीती, मूल्यें छोटी झाली आज. तुमच्या विचारांच्या आचरण नव्हे, तर भांडवल होत आहे बापू.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

तुमच्या वैचारिक स्वप्नांची पूर्तता करण्यास अद्याप तरी अवकाशात दिसतो. तुमची वैचारीक मूल्य, आदर्श, शाश्वत आहेत. त्या मार्गाने चालणाऱ्यांचा प्रवास मात्र आज कासव गतीने आहे बरं का?

■ ■ ■

---

## वाचक लिहितात

### विजयादशमी : दुर्गुणांवर मात करण्याचा संकल्प !

नवरात्रीच्या दहाव्या दिवशी, म्हणजेच आश्विन शुद्ध दशमीला दसरा साजरा केला जातो. या दिवशी श्रीरामांनी रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला. या अभूतपूर्व विजयामुळे या दिवसाला विजयादशमी असे म्हटले जाते. सत्याचा असत्यावर विजय यांचे प्रतीक म्हणजे विजयादशमी !

श्रीरामांनी रावणाच्या दहा शिरांचा वध केला. ही दहा शिरे म्हणजे दहा दुर्गुणांचे प्रतीक आहेत–काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, अन्याय, स्वार्थ, असत्य आणि क्रौर्य. हे दुर्गुण प्रत्येक व्यक्तीत कमी-अधिक प्रमाणात असतात. हेच दुर्गुण आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात अडथळे निर्माण करतात. म्हणूनच त्यांचे निर्मूलन करणे आवश्यक आहे.

विजयादशमी म्हणजे या दुर्गुणांवर विजय मिळवण्याची संधी ! रावणदहनासोबतच आपल्यातील दुर्गुणांचे दहन करून सद्गुणांची वृद्धी व्हावी, याकरिता कटिबद्ध होणे हा विजयादशमी साजरी करण्यामागचा खरा उद्देश असावा. समाजात सद्गुणांची वृद्धी झाली तर सर्वत्र शांती आणि सौहादार्चे वातावरण निर्माण होईल. विजयादशमीचा हा संदेश जीवनाला आध्यात्मिक दिशेकडे घेऊन जाणारा आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.



### दसरा आणि दानाचे महत्व!

दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. सत्याचा असत्यावर विजय यांचे प्रतीक मानून हा दिवस साजरा केला जातो. साधारणपणे त्रेतायुगापासून साजरा केल्या जाणाऱ्या या सणाला हिंदु धर्मामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा दिवस नवीन कार्याचा प्रारंभ करण्यासाठी अत्यंत शुभ मानला जातो.

या दिवशी इष्टमित्रांना आपट्याची पाने ह्यसोनेह्न म्हणून वाटण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. सोने वाटण्याच्या प्रथेचा संबंध एका कथेशी आहे. राजा कौत्स यांनी आपले गुरु वरतंतू यांच्याकडून विद्या प्राप्त केली. कौत्स राजाने आग्रह केल्यानंतर त्यांनी १४ कोटी सोन्याच्या नाण्यांची मागणी दक्षिणेत केली; परंतु कौत्स राजाकडे एवढी नाणी नसल्यामुळे त्याने अयोध्येतील रघुराजाकडे धाव घेतली. मात्र, रघुराजाने नुकताच यज्ञ करून सर्व संपत्ती दान केली होती, त्यामुळे त्यांनी कौत्साला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले.

रघुराजाने कुबेरावर विश्वास ठेवून त्यांना हवी तेवढी संपत्ती देण्याचे मान्य केले. त्यानुसार कुबेराने रात्री धनवर्षाव केले. तरीही कौत्साने त्याच्या आवश्यकतेइतक्या म्हणजे केवळ १४ कोटी सुवर्णमुद्राच घेतल्या आणि त्या आपल्या गुरूंना, म्हणजे वरतंतू ऋषींना, गुरुदक्षिणा म्हणून दिल्या.

दरिद्री असूनही स्वतःसाठी एकही सुवर्णमुद्रा घेतली नाही. बाकीच्या मुद्रांना लोकांनी घेऊन जाव्यात, असे त्यांनी सांगितले. तेव्हापासून आपण दसऱ्याला आपट्याची पाने एकमेकांना सोने म्हणून देतो.

या कथेच्या माध्यमातून दानाचे महत्व लक्षात येते. आपल्या जीवनातील समस्यांचे मूळ कारण शोधले तर बरेचदा आपली लोभी आणि संग्रही वृत्ती असते. म्हणूनच दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर राजा कौत्साप्रमाणे दानी होण्याचा संकल्प करू या.

■ सौ. वर्षा आवदे, नागपूर.

---

# नवरात्रोत्सव : शक्तीच्या उपासनेतून संस्कृतीचे संवर्धन आणि दिशादर्शन

आपला देश हा सण-उत्सवांचा देश आहे. ऋतुमानाप्रमाणे बदलणाऱ्या प्रत्येक सणाला येथे भक्तीचा, आपल्या संस्कृतीचा आणि आध्यात्मिकतेचा अनोखा स्पर्श, त्याचा रंग आणि गंध लाभलेला दिसतो. यामध्ये नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीचा गौरव करणारा, सामाजिक एकोपा जपणारा आणि भारतीय परंपरेचा झगमगता उत्सव म्हणून ओळखला जातो.

नवरात्र म्हणजे नऊ रात्री. या नऊ दिवसांत देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. ही पूजा केवळ धार्मिक विधीपुरती मर्यादित नसून, यात मनुष्याला आत्मचिंतनातून अंतर्मुखतेच्या सकारात्मक परिवर्तनाचा प्रवास घडवते. श्रद्धा, भक्ती, कला, नृत्य, संगीत, सामाजिक समरसता आणि आध्यात्मिक उन्नती यांचा सुंदर संगम या काळात अनुभवायला मिळतो.

या सणाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेतले, तर देवी दुर्गेच्या महिषासुरमर्दिनी रूपातून असुरी प्रवृत्तींवर विजयाचे प्रतीक आपल्याला दिसते. शैलपुत्रीपासून सिद्धिदात्रीपर्यंतच्या या नवरूपांत कोमलता, साधना, शक्ती, ज्ञान आणि मोक्षदायिनी शक्तीची विविध रूपे साकार होतात. त्यामुळे नवरात्रिचे हे दिवस आत्मसंयम, उपासना आणि आत्मबळ वाढवणारे पवित्र दिवस मानले जातात.

हा उत्सव विविध प्रांतांत वेगवेगळ्या परंपरेने साजरा होताना दिसतो. गुजरातमध्ये गरबा-डांडियाचा रंगीबेरंगी महोत्सव, महाराष्ट्रात घटस्थापना, जागरण आणि भजन, बंगालमध्ये दुर्गापूजेचा भव्य जल्लोष, तर दक्षिणेत गोलू मांडणी आणि सांस्कृतिक कार्यक्रम. यातून नवरात्र केवळ धार्मिक नव्हे, तर कला, संगीत, नृत्य, पोशाख, खाद्यसंस्कृती आणि स्त्रीशक्तीचा उत्सव म्हणूनही ओळखला जातो.

असे असले तरीही, या सणाचे स्वरूप दिवसेंदिवस बदलते आहे, ही एक आव्हानात्मक बाब आहे. पूर्वी या उत्सवातून भक्ती, साधना आणि समाजसेवेवर भर दिला जात होता; आज मात्र काही मंडळांत बडेजाव, ढोल-ताशांचा अतिरेक, खर्चिक देखावे आणि स्पर्धात्मकतेचे वातावरण दिसते. परिणामी, सणाचा गाभा हा भक्ती, साधेपणा आणि शुद्धता हरवताना दिसून येत आहे.

वर्तमान स्थितीत ध्वनी व वायुप्रदूषण, कचरा व्यवस्थापनाचा अभाव, वाहतूक कोंडी, अन्न व वस्त्रांचा अपव्यय या समस्या प्रकर्षाने जाणवतात. त्यामुळे सामाजिक व पर्यावरणपूरक नवरात्र साजरा करावयाचा असेल तर प्रत्येक नागरिकाने ही जबाबदारी आपली म्हणून घेतली पाहिजे .

नवरात्र हा स्त्रीशक्तीच्या सन्मानाचा उत्सव असल्याने कन्यापूजन, हळदीकुंकू यांसारखे उपक्रम महिलांना सामाजिक एकात्मतेचा अनुभव देतात. म्हणूनच अशा उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. नवरात्रीची खरी पूजा म्हणजे स्त्रियांना निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबनासाठी प्रोत्साहन आणि समानतेचा आदर देणे होय.

मंडळांनी केवळ सजावट व देखावे न करता काही उपक्रम राबवणे आवश्यक आहे, जसे की, पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धनावरील उपक्रम,स्थानिक कारागीर व महिलांना रोजगाराच्या संधी, स्वच्छता, रक्तदान व अन्नदान शिबिरांचे आयोजन असे कार्यक्रम व्हायला पाहिजेत.

आजची तरुण पिढी सणांकडे केवळ सेल्फी आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहते आहे. त्यामुळे पुढच्या पिढीसाठी योग्य संदेश देण्यासाठी, सणांचा गाभा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी शाळा-कॉलेजांमध्ये कार्यशाळा, लोककला संगीताचे कार्यक्रम व तंत्रज्ञानाच्या मदतीने देवीकथांचे सादरीकरण करणे गरजेचे आहे.



प्रफुल्ल क. दाते
वर्धा
8149913142

सण केवळ मौजमजेसाठी किंवा दिखाव्यासाठी नसून, मूल्यशिक्षण, समाजप्रबोधन आणि संस्कृतीची परंपरा पुढच्या पिढीकडे सुपूर्त करण्याचे माध्यम आहेत, हे विसरून चालणार नाही.

नवरात्रोत्सव हा धर्म, संस्कृती आणि समाजाभिमुखतेचा संगम आहे. देवीची आराधना म्हणजे केवळ मंदिरातील पूजा नाही, तर स्त्रियांना समान सन्मान, समाजासाठी सेवा आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग आहे.

आपण हा उत्सव केवळ दिखावा म्हणून नव्हे, तर संस्कारांची जपणूक म्हणून साजरा केला पाहिजे. म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करूनही धार्मिकता, संस्कृती आणि पर्यावरणपूरकतेची गंगा अखंड वाहती ठेवणे हीच खरी शक्तीपूजा आहे.

भारतीय सण हे केवळ धार्मिक विधी नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक अधिष्ठान लाभलेले उत्सव आहेत. त्यात नवरात्रोत्सव म्हणजे स्त्रीशक्तीचा उत्सव, भक्तीचा पर्व आणि समाजसमरसतेचा संगम आहे.

नऊ रात्री... नऊ रूपं...
नऊ दिवसांची आराधना.

देवी दुर्गेच्या रूपांतून आपल्याला फक्त विजयाची कथा नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीच्या आतंरिक संघर्षांवर मात करण्याची प्रेरणा मिळते.

गरबा आणि डांडियामधील चैतन्य असो, दुगार्पूजेतील भव्यता असो, किंवा महाराष्ट्रातील साधेपणातील भक्तिभाव असो यातून नवरात्रोत्सव आपल्याला विविध रूपांतून अनुभवायला मिळतो. या सर्व अनुभवांमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे शक्तीचा जागर. सध्या सणाचे स्वरूप बदलते आहे, यात शंका नाही. मात्र त्या बदलांना विधायक दिशा देणे आपल्या हाती आहे. आवाजाच्या मर्यादा सांभाळत, पर्यावरणपूरक साधनांचा वापर करत, आणि स्त्रियांना समान सन्मान देत आपण सण अधिक अर्थपूर्ण करू शकतो.

नवरात्रोत्सवाची खरी पूजा म्हणजे स्त्रीला आदराने स्थान देणे, समाजात सकारात्मक बदल घडवणे, आणि संस्कृती जपत पुढे जाणे.

जग कितीही आधुनिक झालं, तरी आपल्या मूळ मूल्यांना विसरून चालणार नाही. सणांचा खरा अर्थ म्हणजे समाजासाठी मूल्य निर्माण करणं. कारण सण म्हणजे संस्कृतीचं जतन, आणि संस्कृती म्हणजे आपली ओळख.

■ ■ ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### प्रश्नचिन्ह?

**मातृ शक्तिचे आम्ही उपासक**
**नवरात्रीत करतो गुणगाण**
**विनयभंग विटंबना पाहता**
**कसं म्हणावं बरं**
**भारताची संस्कृती महान?**

**उदो उदो आहे**
**मातृशक्तिचा देशात**
**महिला कां येती**
**सातच्या आत घरात?**

**खरेच का आमची**
**बेगडी आहे भक्ति**
**की विसरलो आम्ही**
**भारताची संस्कृती?**

# सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५ ने ग्रँड फिनालेसाठी २० अंतिम संघांची घोषणा केली

**मुंबई, १ ऑक्टोबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांची संपूर्ण भारतातील नाविन्यता स्पर्धा 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५'च्या चौथ्या पर्वाच्या अव्वल २० अंतिम संघांची घोषणा केली.
अंतिम स्पर्धकांमध्ये भारतातील ग्रामीण भागांमधील, तसेच १२ राज्यांतील द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधील तरुण गुणवंतांचा समावेश आहे, यामधून तरुण परिवर्तनकर्त्यांना त्यांच्या समुदायामधील व्यापक समस्यांचे निराकरण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रेरित करण्याप्रती या उपक्रमाचा दृष्टिकोन दिसून येतो. यंदा, १४ वर्षीय तरुण अंतिम स्पर्धक म्हणून पात्र ठरला, सर्व मुली असलेल्या संघाने अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला आणि ईशान्येकडील दोन संघांनी अव्वल २० मध्ये स्थान मिळवले.
ते नाविन्यतांवर काम करत आहेत, जसे दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींना स्वतंत्रपणे बुद्धिबळ खेळण्यास सक्षम करण्यासाठी एआय-समर्थित सोल्यूशन, प्रदूषणाबाबत माहिती मिळण्यासाठी आणि वोक्सेल मॅप्स तयार करण्यासाठी इमेजिंग सेन्सर्स माऊंटेड ड्रोन्स. याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय सीमेवरील घुसखोरी आणि सुरक्षा उल्लंघनांचा इशारा देण्यासाठी ड्रोन-सक्षम एआय मॉनिटरिंग सिस्टमचा देखील विचार केला जात आहे.
निवडलेल्या संघांनी चार प्रमुख थीम्स अंतर्गत संकल्पना सादर केल्या: सुरक्षित, स्मार्ट व सर्वसमावेशक भारतासाठी एआय; भारतातील आरोग्य, स्वच्छता व स्वास्थ्याचे भविष्य; तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणीय स्थिरता; आणि शिक्षण व उज्ज्वल भविष्याकरिता क्रीडा व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन.
''सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो दरवर्षाला अधिक मोठी, अधिक आकर्षक व अधिक सर्जनशील बनत आहे, तसेच भारतातील ग्रामीण व दुर्गम भागांपर्यंत पोहोचत आहे आणि स्मार्ट भारतासाठी नाविन्यतेचे लोकशाहीकरण करण्याच्या सॅमसंगच्या दृष्टिकोनासह पुढे वाटचाल करत आहे. अव्वल २० अंतिम स्पर्धकांमधून दिसून येते की, सहानुभूती व संदर्भासह तंत्रज्ञानाचा वापर केल्यास आरोग्यसेवा, शाश्वतता किंवा सर्वसमावेशक क्रीडा असो व्यक्तींच्या जीवनात परिवर्तन घडून येऊ शकते. आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे की विद्यार्थी एआयचा वापर करत काही सर्वात प्रचलित आरोग्यसेवा आव्हानांचे निराकरण करत आहेत, तसेच आयओटी व इतर उदयोन्मुख तंत्रज्ञानांचा वापर करत वृद्धांना व विकलांग व्यक्तींना साह्य करत आहेत, ज्यामुळे यंदाची स्पर्धा अधिक सर्वसमावेशक ठरली आहे,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे कॉर्पोरेट उपाध्यक्ष एसपी चुन म्हणाले.
२०२५च्या पर्वामध्ये भारताच्या कानाकोपऱ्यातून अर्ज आले होते, ज्यामध्ये काचर (आसाम), बनगणपल्ली (आंध्र प्रदेश), बागपत (उत्तर प्रदेश), महबूबनगर (तेलंगणा) आणि सुंदरगड (ओडिशा) यांसारख्या ठिकाणांमधून प्रबळ प्रादेशिक प्रतिनिधीत्वाचा समावेश होता.
आयआयटी दिल्लीच्या अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये अनुभवात्मक, प्रत्यक्ष प्रोटोटाइपिंग उपक्रमात सहभागी झालेल्या ४० संघांसह नुकतेच संपलेल्या उपांत्य फेरीतून अव्वल २० संघांची निवड करण्यात आली. हा टप्पा सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये रेसिडेन्शियल इनोव्हेशन बूटकॅम्प होते. त्यानंतर राष्ट्रीय पिच इव्हेंटमध्ये सॅमसंग ज्युरीने सॅमसंग आरअँडडी आणि नैऋत्य आशियातील तज्ञांचा समावेश करून अव्वल २० अंतिम संघांची निवड केली (प्रत्येक थीममधील पाच अंतिम संघ).
आता, पुढील फेरीकडे वाटचाल करत असताना अव्वल २० संघांना सॅमसंग तज्ञ, एफआयटीटी आणि आयआयटी दिल्लीच्या प्राध्यापकांकडून प्रत्यक्ष ऑनलाइन मार्गदर्शन मिळेल.
अंतिम स्पर्धक कोण आहेत?
थीम सुरक्षित, स्मार्ट व सर्वसमावेशक भारतासाठी एआय अंतर्गत चक्रव्यूह, एरर ४०४, पेशंट प्रॉब्लेम सॉल्व्हर, प्रीसीवियाआ आणि सिकारीयो यांसारखे संघ सुरक्षितता आणि उपलब्धततेला नवीन आकार देत आहेत. त्यांच्या सोल्यूशन्समध्ये एआय-आधारित सर्व्हायलन्स नेटवर्क्स व महिलांसाठी रिअल-टाइम सेफ्टी अॅप्स, तसेच दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी डिझाइन करण्यात आलेले वीअरेबल नेव्हिगेशन एड्स (उपकरण) आणि चेहरा ओळखण्याचे डिवाईसेस यांचा समावेश आहे.
भारतातील आरोग्य, स्वच्छता व स्वास्थ्याचे भविष्य या श्रेणीमध्ये संकल्पना तितक्याच आकर्षक व मानवी-केंद्रित आहेत. अॅल्केमिस्ट, बीआरएएचएम, हीअर ब्राइट, पॅरासाइट आणि पिंग ब्रिगेडियर्स यासारखे संघ उत्पादनांमध्ये अग्रणी आहेत, जसे लवकर सिलिकोसिस निदानासाठी नॉन-इन्व्हेसिव्ह टूल्स, किफायतशीर मल्टी-अॅक्टिव्हलेटेड बायोनिक हँड्स, एआय-पॉवर्ड स्पीचरेकग्निशन टूल्स आणि प्रिडिक्टिव्ह ब्रेस्ट हेल्थ अॅप्लीकेशन्स, जे महिलांना लवकर निदान व जागरूकतेचे महत्त्व जाणून घेण्यास मदत करतात.
थीम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणीय स्थिरता प्रभावाचे प्रमाण अधिक वाढवते. पृथ्वी रक्षक, इर्षेप ऑफ होप, रिन्यूएबल डिसॅलिनेशन, स्मॉलब्लू आणि वॉक्सिमॅप्स यांसारखे संघ सोल्यूशन्स शेअर करत आहेत, ज्यामध्ये सौरऊर्जेच्या माध्यमातून जल निष्कर्षण (पाणी काढणे), स्वयंचलित गाळ्ड्यखत, मॉड्यूलर डिसॅलिनेशन, एआय-चालित कार्बन व प्रदूषण मॅपिंग यांचा समावेश आहे.
अव्वल २० अंतिम संघांना (प्रतिथीम पाच) एकूण २० लाख रुपये बक्षीस मिळेल (प्रति संघाला १ लाख रुपये) आणि प्रत्येक सहभागीला (एकूण ३७) नवीन सॅमसंग गॅलेक्सी झेड फ्लिप स्मार्टफोन मिळेल.
पुढील वाटचाल
हा प्रवास आता २८ ऑक्टोबर व २९ ऑक्टोबर २०२५ रोजी नवी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ग्रँड फिनालेकडे वाटचाल करत आहे. या दोन अॅक्शनने भरलेल्या दिवसांपूर्वी अव्वल २० संघांना एफआयआयटी आयआयटी दिल्ली येथे प्रोटोटाइपिंगसाठी समर्पित दिवस मिळेल. यानंतर दुसऱ्या दिवशी ग्रँड फिनालेचे पिच प्रेझेन्टेशन केले जाईल. तिसऱ्या दिवशी सर्व २० संघांसाठी इन्व्हेस्टर मीट या सहभागींना त्यांच्या उद्योजकता प्रवासाच्या जवळ आणेल आणि शेवटी २९ ऑक्टोबर रोजी विजेत्यांची घोषणा व पुरस्कार सोहळ्यासह या पर्वाची सांगता होईल.
ग्रँड फिनालेमध्ये चार विजेत्या संघांना (प्रत्येक थीममधून एक) आयआयटी दिल्ली येथील सॅमसंग फॉर इन्क्यूबेशनकडून एकत्रित १ कोटी रूपयांचे अनुदान मिळेल, ज्यामुळे ते त्यांच्या संकल्पनांना बाजारपेठेसाठी सुसज्ज सोल्यूशन्समध्ये रूपांतरित करण्यास सक्षम होतील.



## वुईवर्क इंडिया मॅनेजमेंट लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री ३ ऑक्टोबरपासून

**नागपूर, १ ऑक्टोबर :** वुईवर्क इंडिया मॅनेजमेंट लिमिटेड (कंपनी) च्या प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरसाठी (इक्विटी शेअर्स) प्राथमिक समभाग विक्री शुक्रवार ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी खुली करण्याचा प्रस्ताव आहे. प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीचा दिनांक त्याआधी एक दिवस म्हणजेच बुधवार, ०१ ऑक्टोबर २०२५ आहे. बोली/ऑफर मंगळवार, ०७ऑक्टोबर २०२५ रोजी बंद होईल.
प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरसाठी ६१५ रुपये ते प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरसाठी (इक्विटी शेअर्स) ६४८ रुपये पर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या किमान २३ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या २३ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.
कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्री ऑफरमध्ये ४६,२९६,२९६ पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल आहे. ऑफर फॉर सेल मध्ये ३५,४०२,७९० पर्यंतचे इक्विटी शेअर्स एम्बसी बिल्डकॉन एलएलपी (प्रवर्तक विक्री समभागधारक) आणि १०,८९३,५०६ पर्यंतचे इक्विटी शेअर्स १ एरियल वे टेनंट लिमिटेड (गुंतवणूकदार विक्री समभागधारक) याचे आहेत.
येथून पुढे, पात्र कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या कर्मचारी आरक्षण भागांतर्गत अर्ज करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना त्यांची वैध बोली ऑफर किंमती एवढी किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास इक्विटी शेअर्सचे प्रमाणात वाटप केले जाईल. प्रमुख गुंतवणूकदारांखेरीज सर्व संभाव्य गुंतवणूकदारांनी आपापल्या एएसबीए खात्यांचा तपशील आणि यूपीआय अर्जदारासाठी यूपीआय आयडीसह जाहीर करून अर्जाची विहित रक्कम अॅप्लीकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक अमाउंट (एएसबीए) प्रक्रियेद्वारे करून ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार योजनेत सहभागी करून घेण्यासाठी सर्व बोली रकमा या सेल्फ सर्टिफाइड सिंडिकेट बँक्स एससीएसबीतर्फे किंवा यूपीआय यंत्रणे अंतर्गत स्पॉन्सर बँकेतर्फे ब्लॉक करून ठेवण्यात येतील. प्रमुख गुंतवणूकदारांना त्यांच्यासाठीच्या हिश्शात एएसबीए प्रक्रीयेनुसार सहभागी होण्याची परवानगी नाही.
कंपनीचे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचीबद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.
जेएम फायनान्शीयल लिमिटेड, आयसीआयसीआय सिक्युरिटीज लिमिटेड, जेफरीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी लिमिटेड आणि ३६० ONE WAM लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.
येथे वापरल्या गेलेल्या परंतु परिभाषित न केलेल्या सर्व कॅपिटलाइज्ड शब्दांचा अर्थ आरएचपी मध्ये नमूद केल्यासारखाच असेल.

## होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया ने नागपूरमध्ये रोड सेफ्टी कन्वेन्शनचं आयोजन केलं

**नागपूर, १ ऑक्टोबर :** होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया ने नागपूर, महाराष्ट्रमध्ये रोड सेफ्टी कन्वेन्शनचं आयोजन केलं, ज्यामध्ये २०० पेक्षा अधिक शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक सहभागी झाले. ही उपक्रम एचएमएसआईच्या आपल्या भावी पिढीसाठी मानसिकता विकास या चालू प्रकल्पाचा भाग आहे, ज्याचा उद्देश लहान वयातच मुलांमध्ये सुरक्षित रस्ते वापरण्याच्या सवयी विकसित करणे आहे.
हा कन्वेन्शन श्री गौतम गेडाम (शिक्षण अधिकारी, माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर; श्री प्रविण कांबळे (उप शिक्षण अधिकारी, माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर; श्री नरेंद्र गोरखेडे (सहायक पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण); आणि श्री प्रभू नागराज (ऑपरेटिंग ऑफिसर, कॉर्पोरेट अफेयर्स, होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया) यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला




सत्रादरम्यान शिक्षकांना किड्स माइंडसेट चेंज अवेअरनेस मॉड्यूल्सची ओळख करून देण्यात आली, जे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित रस्ते वापरण्याच्या सवयी रुजवण्यासाठी मार्गदर्शक म्हणून तयार करण्यात आले आहेत. या कन्वेन्शनचा उद्देश शाळांनी हे मॉड्यूल्स त्यांच्या अध्यापनात समाविष्ट करावेत आणि रस्ते सुरक्षेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावा, असा आहे. ही उपक्रम एकदाच होणारी क्रिया नसून शाळांशी सातत्यपूर्ण सहभागाची सुरुवात आहे. एका समर्पित पोर्टलद्वारे शाळा हे मॉड्यूल्स नियमितपणे वापरू शकतील. विद्यार्थ्यांना सातत्याने रस्ते सुरक्षेच्या सवयी शिकवता याव्यात यासाठी कंटेंट नियमितपणे अपडेट केला जाईल. शाळांना सत्रांचे लाईव्ह-स्ट्रीमिंग किंवा कंटेंट डाउनलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे, आणि हे मॉड्यूल्स अनेक भाषांमध्ये उपलब्ध आहेत जे त्यांच्या सोयीसाठी उपयुक्त ठरतील.
आतापर्यंत एचएमएसआईने भारतभरात १५ रोड सेफ्टी कन्वेन्शन्स यशस्वीपणे आयोजित केले आहेत, ज्याद्वारे १९०० हून अधिक शाळांपर्यंत पोहोचता आलं आणि ७ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेबाबत जागरूक करण्यात आलं. या व्यापक पोहोचवर आधारित, एचएमएसआईचा उद्देश आहे की यावर्षी हा कार्यक्रम अधिक शाळा आणि समुदायांपर्यंत विस्तारावा. मुख्याध्यापक आणि शिक्षकांना थेट सहभागी करून, कंपनी रस्ते सुरक्षेचा संदेश वर्गखोल्यांमधून अनेक पटींनी पसरवते, ज्याचा परिणाम अखेरीस कुटुंबांवर आणि संपूर्ण समाजावर सकारात्मकपणे होतो.
एचएमएसआईच्या जागतिक सुरक्षा घोषवाक्य सेफ्टी फॉर एव्हरीवनच्या मार्गदर्शनाखाली, होंडा जबाबदार रस्ते वापरणाऱ्या पिढीच्या विकासावर लक्ष केंद्रित करत आहे. या कन्वेन्शनचा उद्देश रस्ते सुरक्षा शिक्षणाच्या उपक्रमाचा विस्तार करणे आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच सुरक्षित वर्तनाची संस्कृती निर्माण होईल. शिक्षक, प्रशासक आणि स्थानिक अधिकाऱ्यांसोबत सातत्यपूर्ण सहकार्याच्या माध्यमातून, कंपनी आपले ध्येय अधिक बळकट करत आहे ज्यामध्ये रस्ते सुरक्षा ही एक सामायिक जबाबदारी आणि जीवनशैली बनवण्याचा प्रयत्न.



## पीएनजी ज्वेलर्सकडून नागपूरमध्ये लाईटस्टाईल शॉप-इन-शॉपचे उद्घाटन

**नागपूर, १ ऑक्टोबर :** पीएनजी ज्वेलर्सने नागपूर स्टोअरमध्ये लाईटस्टाईल शॉप-इन-शॉप सुरू करत आपल्या विस्तारयोजनेत एक महत्त्वाचा टप्पा गाठला. या उपक्रमातून ग्राहकांना हलक्या वजनाचे, आकर्षक आणि दैनंदिन वापरासाठी योग्य तसेच आजच्या पिढीची पसंती लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आले आहे.
लाईटस्टाईल या उपब्रँडद्वारे पीएनजी ज्वेलर्सने रोजच्या वापरासाठी योग्य दागिन्यांवर लक्ष केंद्रित केले आहे, जे ऑफिस, सामाजिक गेट-टुगेदर किंवा खास प्रसंगांमध्ये सहज परिधान करता येतात. प्रत्येक निर्मिती पीएनजीच्या विश्वासार्हता, शुद्धता आणि उत्कृष्ट डिझाइनची ओळख जपते.
उद्घाटनावेळी अभिनेत्री सई ताम्हणकर म्हणाल्या, लाईटस्टाईलची संकल्पना मला खूप आवडली कारण ती त्या महिलांचा सन्मान करते ज्या दागिन्यांना आपल्या दैनंदिन जीवनशैलीशी सहज जुळवतात. हे दागिने फॅशनेबल असून आत्मविश्वास आणि सशक्ततेची भावना वाढवतात.
उद्घाटनानिमित्त, ग्राहकांना लाईटस्टाईलच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५०% पर्यंत सूट मिळेल, ज्यामुळे या सणासुदीच्या काळात नव्या शैलीतील दागिने अनुभवण्याची ही सुवर्णसंधी आहे.

## कैलाश खेर यांनी आपल्या भावपूर्ण आवाजाने गायले झी टीव्हीच्या गंगा माई की बेटियाँ या मालिकेचे शीर्षकगीत!



**मुंबई, १ ऑक्टोबर :** मुंबई, १ ऑक्टोबर : देशभरातील प्रेक्षकांची मने जिंकणारी झी टीव्हीची नवीन मालिका गंगा माई की बेटियाँ ही गंगा माई (शुभांगी लाटकर) यांच्या भावनिक प्रवासाची कहाणी सांगते. मुलगा न झाल्यामुळे पतीने त्यांना सोडून दिल्यानंतर त्या आपल्या तीन मुलींना सहाना (सृष्टी जैन), स्नेहा (अमनदीप सिधू) आणि सोनी (वैष्णवी प्रजापती) सामर्थ्य, स्वाभिमान आणि मायेने वाढवण्याचा निर्णय घेतात. वाराणसीच्या पार्श्वभूमीवर घडणारी ही कथा स्त्रियांची जिद्द आणि आई-मुलींचे अतूट नाते साजरे करते.
आपला अनुभव सांगताना कैलाश खेर म्हणाले, या गाण्याशी माझा अत्यंत सखोल आणि भावनिक असा संबंध जुळला कारण यात आई आणि मुलींचे शाश्वत नाते अप्रतिमरीत्या व्यक्त केले आहे. झी टीव्हीच्या गंगा माई की बेटियाँसाठी हे गाणे गाणे हा माझ्यासाठी खूपच खास अनुभव ठरला. या गाण्यात प्रचंड प्रेम आणि भक्तीची भावना आहे आणि तीच भावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल अशी मला आशा आहे.
कैलाश खेर यांच्या भावपूर्ण आवाजासोबत आणि मालिकेच्या हृदयस्पर्शी कथाकथनासह, गंगा माई की बेटियाँ प्रेक्षकांच्या भावनांना नक्कीच स्पर्श करेल. गंगा माई की बेटियाँ दररोज रात्री ९ वाजता फक्त झी टीव्हीवर प्रसारित होत आहे.

## 'गणेश कार्तिकेय' मालिका सुरू होण्याअगोदर मोहित मलिक आणि श्रेनु परीख यांनी तिरुत्तनी मुरूगन मंदिरात जाऊन देवाचा आशीर्वाद घेतला

**मुंबई, १ ऑक्टोबर :** सोनी सबवर लवकरच एक भव्य दिव्य मालिका सुरू होत आहे गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय. शिव परिवारातील सदस्यांच्या परस्पर नात्यांची आणि गणेश व कार्तिकेय यांच्या प्रेरणादायक प्रवासाची कहाणी या मालिकेत आहे. ही मालिका सोमवार, ६ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता सुरू होणार आहे. त्या पूर्वी मालिकेचे कलाकार मोहित मलिक (शंकर), श्रेनु परीख (पार्वती), एकांश कथरोटिया (गणेश) आणि सुभान खान (कार्तिकेय) यांनी तामिळनाडू मधील पवित्र तिरुत्तनी मुरूगन मंदिरात जाऊन देवाचा आशीर्वाद मिळवला. या मंदिरात जाऊन दर्शन घेणे हा या कलाकारांसाठी एक आध्यात्मिक क्षण होता. त्यांनी मालिकेच्या यशासाठी प्रार्थना केली. हे मंदिर कार्तिकेयाच्या सहा स्थानांपैकी एक असून कर्तिकेयाच्या काहणीशी निगडीत आहे. त्यामुळे हा प्रसंग विशेष लक्षणीय ठरला. या मालिकेत पराक्रम, सुजाणता, भक्ती आणि कौटुंबिक प्रेमाच्या मूल्यांचा पुरस्कार केला आहे, ज्यामुळे सर्व वयोगटातील प्रेक्षकांना ही मालिका आकर्षित करेल.
शंकराची भूमिका करणारा मोहित मलिक म्हणाला, तिरुत्तनी मंदिरात जाण्याचा अनुभव खरोखर नतमस्तक आणि भावुक करणारा होता. शंकराची भूमिका करत असताना अशा पवित्र ठिकाणी ध्यान धरल्यानंतर परम शांतीचा अनुभव मिळाला. आम्ही देवाची पूजा केली आणि आमच्या प्रवासासाठी देवाचे आशीर्वाद घेतले. आम्हाला वाटले की, या अध्यायासाठी ही अगदी योग्य सुरुवात होती. गंमत म्हणजे माझी पादत्राणे मंदिरातून गहाळ झाली, जो मला नेहमी शुभ शकुन वाटतो! देवाने जणू आम्हाला कौल दिला! आम्हाला वाटले की गणेश कार्तिकेय मालिकेच्या रूपाने आम्ही योग्य मार्गावर प्रवास करत आहोत. हा अनुभव माझ्या मनावर जणू कोरला गेला आहे. येथे मिळालेली ऊर्जा माझ्या अभिनयातून प्रेक्षकांना दिसेल अशी आशा आहे.

## आगामी मालिका गणेश कार्तिकेयच्या गीतासाठी जावेद अलीने आपला सुमधुर आवाज दिला

**मुंबई, १ ऑक्टोबर :** सोनी सबवर ६ ऑक्टोबर रोजी एक भव्य दिव्य मालिका सुरू होणार आहे गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय. या मालिकेत देवांच्या सर्वात शक्तिशाली कुटुंबाची म्हणजे भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेनु परीख) आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय यांची फारशी ज्ञात नसलेली कथा सांगते. या महान कथेची भव्यता वाढवण्यासाठी प्रसिद्ध गायक जावेद अली याने आपला सुमधुर आवाज मालिकेच्या गीतासाठी दिला आहे.
भक्ती आणि भव्यतेने भारलेल्या या गीतात शिव परिवाराची दिव्य शक्ती, मूल्ये आणि भाव-भावना यांचे वर्णन आहे. ज्यामधून मालिकेच्या दिव्य कथानकाचा अंदाज येतो. आपल्या अष्टपैलूत्वाबद्दल आणि हृदयस्पर्शी गायकीबद्दल ओळखल्या जाणाऱ्या जावेद अलीच्या आवाजाने या मालिकेसाठी अपेक्षित असलेली श्रद्धा आणि दिव्यता गीतातून जिवंत केली आहे.
या गीताबद्दल बोलताना जावेद अली म्हणतो, हे गीत खूपच सुंदर आहे. आदी जी (आदिल-प्रशांत जोडीमधील) यांनी मला कॉल करून असे सांगितले की, हे गीत तयार करताना त्यांनी गायक म्हणून माझीच कल्पना केली होती. आणि मी जेव्हा हे गीत ऐकले, तेव्हाच मला त्यातील भक्ती जाणवली. या गीतात शब्द आणि सूर यांची गुंफण इतकी सुंदर प्रकारे केली आहे, की त्यातील भाव थेट ऐकणाऱ्याच्या हृदयात उतरतो. या गीतात एक प्रार्थना आहे, आळवणी आहे, जी मला भिडली. त्यामुळेच मी हे गीत गाण्यास होकार दिला.

## शब्दकोडे क्रमांक २२३०



**आडवे शब्द :-**
१) -- --- -- --- - - ---, होते कुरुप वेडे पिल्लू तळ्यात एक एक गीत
११) कापणारा(इं.)
१२) सोन्याचा धागा
१३) व्रत
१४) मोजणी
१५) पांढुरका रंग
१७) कबर
१९) सहकार्य न करणे
२१) पाप
२२) तल्लिन, तादाम्य
२३) ऊंट हाकणारा
२४) प्रेत
२५) माया, प्रेम
२६) खण, रकाना
२७) अथवा, किंवा
२८) पिकांवर पडणारा एक रोग
३०) सुट्टीचा वार
३३) रसाळ
३६) धोका
३८) चेष्टेत नर्तक
४०) पहारेकरी
४३) मत्स्य,
४५) पाहिले, अवलोकिलेले
४६) गोमाता
४८) आरक्षित
५०) माल साठविण्याची जागा
५२) मित्र
५४) निष्णांत, वाकबगार
५५) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५६) कहाणीतील गाव
५९) बडबड, त्रास
६१) घट्ट मारलेला विळखा
६३) पाक तयार करताना साखरेतून निघणारा मळ
६४) जन्म
६६) पत्त्यातील जोडपे
६७) दुष्ट
६९) अंगाची होणारी आग
७०) गजवदन
७१) वंदनाचा एक शब्द
७२) मंत्रीमंडळ
७३) सगळीकडे
७४) पर्ण

**उभे शब्द :-**
१) पहिला आकडा
२) खर्चात कपात
३) होडी
४) डेरेदार वृक्ष
५) तृतीया
६) भरभराट
७) सुगंधी काटेरी पिवळसर पान
८) वेडा
९) चंद्र
१०) बैलगाडी
१४) घर
१६) दागदागिने
१७) माझा
१८) सतरंजी
१९) असामान्य
२०) नगरपाल
२१) अग्नी
२२) एक तारवाद्य
२९) रूक्ष
३१) च्या शिवाय
३२) बडबड्या, फुशारक्या मारणारा
३४) अतिशय रूक्षता, अतिशय भूक
३५) आजच्या आधीचा दिवस
३७) मुंबईचा घरगडी
३९) वर वधू मधील पडदा
४१) मुक्काम
४२) बायको
४४) शिकारीचा प्राणी
४९) वरवरचे
५१) दोन नद्यांमधील प्रदेश
५२) जोरदारपणे
५३) उपकार
५५) पुष्पदल
५७) व्यापारी फायदा
५८) मुसलमानांचा उपवासाचा महिना
६०) घोडागाडी
६२) फणसातील खाद्यभाग
६४) विष
६५) एक फूल
६६) वन्य
६७) केरसुणी
६८) आयुष्य
६९) सेवक
७१) रजनी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




## आज का अंदाज

गुरूवार २ ऑक्टोबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | २४० | ८९० | १९० | ४५५ | ३६६ | १७० | ४७८ |
| ४९० | ३६७ | २५० | २८० | ६९९ | ४४७ | ३७८ | २२५ |
| ५८० | १६९ | ३४० | ३७० | २२० | १५९ | ४५९ | ३६० |
| ३८ | ६८ | ७२ | ०२ | ४१ | ५१ | ८० | ९० |
| ३९ | ६९ | ७५ | ०५ | ४७ | ५७ | ८६ | ९६ |
| ३१ | ६१ | ७४ | ०४ | ४३ | ५३ | ८२ | ९२ |

**२ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५३ | ८३ |
| १९ | २९ | ५६ | ८६ |
| १७ | २७ | ५४ | ८४ |
| २९० | १४७ | २४९ | १७० |
| ३८० | ३९० | ४५६ | ३६९ |
| ४७० | २०० | ३५७ | २६० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

२ १ ७ ९ ०

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## पंचायत राज प्रशिक्षण केंद्र

हनुमान नगर नागपूर - २४

E.mail - prtcnagpur@gmail.com Mob : 9423485665

**निविदा सूचना**

पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, हनुमान नगर नागपूर या करिता राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत (RGSA) या विषयी प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा निहाय बाबी नुसार नागपूर, वर्धा, गोंदिया, व भंडारा जिल्ह्या मध्ये सन २०२५-२६ ह्या आर्थिक वर्षाकरिता राबविण्या येणार आहे.
सदर प्रशिक्षण निवडक ग्रामपंचायत स्तरावर व पंचायत समितीच्या स्तरावर आयोजित केले जातील. करिता विविध विषयाचे १) शाश्वत विकासाचे ध्येय पुस्तिका भाग १, भाग २ (२) ग्राम पंचायत श्रमता बांधणी पुस्तिका भाग १ , भाग २ (३) ग्राम पंचायत डायरी ई. (३) भोजन व्यवस्था (४) हॉल व निवास व्यवस्था (५) पॅन, पॅड (६) बॅग / फोल्डर (७) साहित्य वाटप वाहतुकीच्या दृष्टीने प्रवासी वाहनाची आवश्यकता आहे. इत्यादी बाबी करिता पुरवठा धारकांनी आपली निविदा दि. ०२/१०/२०२५ ते ०८/१०/२०२५ पर्यंत इच्छुक पुरवठाधारक यांचे कडून मागविण्यात येत आहे. सात दिवसाच्या आत सादर करावे. व तसेच मंजूरधारकास मंजुरी प्रदान करण्यात येईल. दिनांक ०८/१०/२०२५ नंतर चे निविदा ग्राह्य धरले जाणार नाही.

जिल्हानिहाय उद्दिष्टे:-
१) गोंदिया ग्रा.प. सदस्य 192 व SDG 1644
२) भंडारा ग्रा.प. सदस्य 269 व SDG 1623
३) नागपूर ग्रा.प. सदस्य 1023 व SDG 2277
४) वर्धा ग्रा.प. सदस्य 1150 व SDG 1563
टीप : वरील उद्दिष्टमध्ये जी.प सुचणे नुसार बदल करण्यात येईल.
व सदर निविदा जिल्हानिहाय मागविण्यात येत आहे.

प्राचार्य
पंचायत राज प्रशिक्षण केंद्र
हनुमान नगर नागपूर

## राशीभविष्य

**मेष :** आज, तुम्ही तुमच्या आयुष्यात एक नवीन टप्पा गाठाल. फॅशन डिझायनर्सकडे सकारात्मक आणि सर्जनशील कल्पना असतील, ज्यामुळे प्रगती होईल. तुमच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले जाईल.
**वृषभ :** दिवसभर तुम्हाला आनंद वाटेल. जर तुम्हाला नवीन व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला तुमच्या कुटुंबाकडून पूर्ण पाठिंबा मिळेल. आज तुमचे लक्ष घरातील कामे पूर्ण करण्यावर असेल.
**मिथुन :** तुमच्या वाहतूक व्यवसायातून लक्षणीय नफा होईल. तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील. तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असेल, परंतु विचार न करता पैसे उधार देणे टाळा.
**कर्क :** तुम्हाला नोकरीच्या अनेक उत्तम संधी मिळतील, ज्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. व्यवसायातील समस्या देखील सोडवल्या जातील. तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील.
**सिंह :** कुटुंबातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. व्यवसायासाठी दुसऱ्या शहरात जावे लागू शकते.
**कन्या :** राजकारणात सहभागी असलेल्यांना आज महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मिळतील आणि समाजात तुमची लोकप्रियता वाढेल. तुमचे रखडलेले काम आज मार्गी लागेल, ज्यामुळे आर्थिक समस्या सुटतील.
**तुळ :** आर्थिक समस्या कमी होतील. अविवाहित व्यक्तींना आज लग्नाचे प्रस्ताव येऊ शकतात आणि सर्वजण या नात्याला सहमती देतील. ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. मुलांसोबत चांगला वेळ घालवाल.
**वृश्चिक :** आर्थिक आणि नातेसंबंधांच्या बाबतीत घाई करू नका. व्यावसायिक प्रकल्पांचा सखोल आढावा घ्या. भावनिक संतुलन आणि जागरूकता वैयक्तिक आणि सामाजिक संबंधांमध्ये यश मिळवून देईल.
**धनु :** तुम्ही तुमच्या मुलांच्या भविष्याबाबत काही महत्त्वाचे निर्णय देखील घेऊ शकता. आर्थिक परिस्थितीकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. स्थिर आणि संतुलित वाढीवर लक्ष केंद्रित करा.
**मकर :** आज तरुणांसाठी यशाचे नवे दरवाजे उघडतील. तुम्हाला तुमच्या मुलांसोबत काही वेळ घालवण्याची संधी मिळेल, ज्यामुळे ते खूप आनंदी होतील. तुम्ही तुमच्या वडिलांसोबत दिवस घालवाल.
**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. तुमची बहुतेक कामे यशस्वी होतील, ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणखी मजबूत होईल. तुम्ही एखाद्या गरजू व्यक्तीला मदत कराल.
**मीन :** मन आनंदी राहील. आज, तुमच्या स्टेशनरी व्यवसायात तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल. तुमचे वडील तुम्हाला आवश्यक वस्तू भेट देतील. तुम्हाला आरोग्याच्या समस्यांपासून मुक्तता मिळेल.

# रोहणा गावच्या पुनर्वसनासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करू

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे आश्वासन, ग्रामस्थांशी चर्चा



■ महासागर प्रतिनिधी
मूर्तिजापूर, दि. १ :
तालुक्यातील प्रकल्पग्रस्त गाव रोहणा येथे ३० सप्टेंबरला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गावाला भेट देऊन गावाच्या पुनर्वसनाबद्दल आणि ग्रामपंचायतच्या कामा बद्दल ग्रामस्तमंडळी सोबत चर्चा केली. तसेच ग्रामपंचायत स्तरावर रोहना गावातील विकास कामांचा आढावा घेतला. प्रकल्पग्रस्त रोहणा गावाच्या पुनर्वसनाकरता गावकऱ्यांनी नदीच्या पात्रात बसून बेमुदत उपोषण सुरू केले होते. त्यामुळे शासकीय स्तरावर मोठी खळबळ उडाली होती. अधिकाऱ्यांनी धावपळ करून लेखी स्वरूपात मागण्या मान्य केल्याचे पत्र दिल्यानंतर रात्री ११ वाजेच्या सुमारास या उपोषणाची सांगता झाली होती. त्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी यांनी गावाला भेट देऊन पाहणी केली. भेटीदरम्यान रोहणा गावाची संपूर्ण परिस्थिती त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहून परिस्थिती गंभीर असल्याचे गावकऱ्यांसोबत चर्चा करताना मान्य केले. यासाठी प्रशासनस्तरावर लवकरात लवकर प्रयत्न करून पाठपुरावा करण्याचे आश्वासन गावकऱ्यांसमोर दिले. तालुक्यातील उमा बॅरेज प्रकल्प अंतर्गत बाधित रोहनाणा गावाचा विकास गेल्या १२-१३वर्षापासून खुंटलेला असून, अनेक त्रास आणि यातना स्नान करून गावकरी गावात राहत आहेत. अनेकांच्या शेतजमिनी प्रकल्पात अधिग्रहित करण्यात आल्याने रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. एकीकडे प्रकल्पही पूर्ण झाला नाही आणि दुसरीकडे गावाचे पुनर्वसनही झाले नाही आणि सोबतच रोजगाराचा प्रश्न देखील उपस्थित होत असल्याने तिहेरी कैचीत गावकरी सापडले आहेत. तालुक्यातील रोहणा आणि पोही ही गावे पुनर्वसनापासून अद्यापही वंचित असून, पोही गावाच्या पुनर्वसनाकरिता खरेदी करण्यात आलेल्या शेत जमिनी बाबत देखील मोठ्या प्रमाणात उलटसुलट चर्चा चालू सुरू असून यामध्ये देखील मोठा भ्रष्टाचार झाल्याचे म्हटल्या जात आहे. न्याय हक्कासाठी रोहना गावच्या नागरिकांनी उमा नदीच्या पात्रात उपोषणाला सर्व गावकरी मंडळी बसले होते. सकाळपासूनच अधिकारी आणि माना पोलिस स्टेशनचे ठाणेदार हे तिथे तळ ठोकून होते. जिल्हाधिकारी यांच्यासोबत उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, गट विकास अधिकारी माने, माना पोलिस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावका,सरपंच पाटबंधारे विभागाचे अधिकारी, ग्रामसेवक, माजी सरपंच पोही, पोलिस पाटिल रोहना गावातील महिला व गावकरी उपस्थित होते.

# विद्यापीठातील एम.बी.ए. विभागात आर्थिक गुंतवणूक जागरुकता कार्यक्रम संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १ :
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील व्यवसाय प्रशासन व प्रबंधन विभागात (एम.बी.ए.) राष्ट्रीय शेअर बाजार यांच्या सहकार्याने नुकताच विद्यार्थ्यांसाठी आर्थिक गुंतवणूक जागरुकता कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांना व्यावहारिक आर्थिक साक्षरता, कौशल्यासह सज्ज करणे, जेणेकरुन विद्यार्थी आर्थिक गुंतवणुकीचे निर्णय घेऊ शकतील आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जावू शकतील, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री शशांक मिश्रा, प्रा. विरेंद्र ऑगस्टीन प्रामुख्याने उपस्थित होते.
शशांक मिश्रा यांनी यावेळी गुंतवणूक, आर्थिक नियोजन, बाजारातील चढउतार यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना शेअर बाजार आणि व्यापार, म्युचुअल फंड, डेरिव्हेटिव्हजब, तांत्रिक विश्लेषण, आर्थिक शिक्षणासाठी प्रगत एक्सेल, मूलभूत विश्लेषण यावर सविस्तरपणे मार्गदर्शन केले. तर प्रा. विरेंद्र ऑगस्टीन यांनी विभागामधील ४४ विद्यार्थी सध्या विविध प्रतिष्ठीत कंपन्यांमध्ये दाखल झाले असल्याचे सांगून आर्थिक साक्षरता, करिअर, आणि मुलाखतीमधील संबंध विद्यार्थ्यांना सांगितला.
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी सदर उपक्रमाचे भरभरुन कौतुक केले. तर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी उपक्रमाचे कौतुक करतांना एम.बी.ए. विभागाकडून गुंतवणूक दक्षता कार्यक्रम एक उत्कृष्ट सुरुवात असल्याचे सांगितले. विभागप्रमुख डॉ. दिपक चाचरकर यांनी आर्थिक शिस्त, धोरणात्मक नियोजन आणि दिर्घकालीन दृष्टिकोन यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. सूत्रसंचालन कु. ममता पाससकर यांनी केले.

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 निर्देशीत वाणिज्य अभ्यासक्रमांच्या पुस्तकांचे विमोचन



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १ :
अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ॾएनईपी २०२० : उपलब्धी, आव्हाने आणि भविष्यवेधॾ या विषयावर शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या भव्य उद्घाटन सोहळ्यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू व बीजभाषक मा. डॉ. मुरलीधरजी चांदेकर, प्रमुख अतिथी मा. श्रीकांतजी काळीकर (संचालक व सिनेट सदस्य, श्रीमती नरसम्मा हिर्या शैक्षणिक ट्रस्ट), कार्यक्रम अध्यक्ष मा. डॉ. मीनलताई भोंडे (अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ अमरावती विद्यापीठ उ.शि.), मा. डॉ. राजेश एस. चंदनपाट (प्राचार्य, नरसम्मा महाविद्यालय), मा. दिनेशजी निचित (अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा, एसजीबी अमरावती विद्यापीठ), तसेच प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.
या प्रसंगी प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव यांच्या माध्यमातून प्रकाशित बी.कॉम. भाग १ व २ अंतर्गत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अन्वये बदल झालेल्या नविन अभ्यासक्रमावर आधारित फायनान्शिअल अकाऊंटिंग, ॲडव्हान्स्ड अकाऊंटिंग, इंट्रोडकशन टु अकाऊंटिंग, अकाऊंटिंग फॉर जॉईन्ट स्टॉक कंपनी, कंपनी अकाऊंटिंग, इन्कम टॅक्स-ख, डायरेक्ट टॅक्स-ख, कॉम्प्युटर स्किल्स-खख कॉम्प्युटर स्किल्स-खख या वाणिज्य विषयांच्या पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते उत्साहात विमोचन करण्यात आले.
प्रशांत पब्लिकेशन्सचे संचालक श्री रंगराव पाटील साहेब
याप्रसंगी सर्व मान्यवरांनी प्रशांत पब्लिकेशनस जळगाव चे मुख्य प्रकाशक श्री रंगराव पाटील साहेब यांचे व सर्व लेखकांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. वासुदेव गोलाईत यांनी सर्व लेखकांच्या वतीने राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे मा. राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र प्रदेश सचिव (उ. शी.) प्रा. प्रदिपजी खेडकर
अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू व बीजभाषक मा. डॉ. मुरलीधरजी चांदेकर, प्रमुख अतिथी मा. श्रीकांतजी काळीकर (संचालक व सिनेट सदस्य, श्रीमती नरसम्मा हिर्या शैक्षणिक ट्रस्ट), कार्यक्रम अध्यक्ष मा. डॉ. मीनलताई भोंडे (अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ अमरावती विद्यापीठ उ.शि.), मा. डॉ. राजेश एस. चंदनपाट (प्राचार्य, नरसम्मा महाविद्यालय), मा. दिनेशजी निचित (अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा, एसजीबी अमरावती विद्यापीठ), तसेच प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे (अध्यक्ष, ABRSM अमरावती विद्यापीठ, उ.शि.) कोषाध्यक्ष प्रा. दिनेशजी खेडकर, विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेशजी अडगोकर यांसह सर्व सन्मानीय पाधिकारी व उपस्थितांचे आभार मानले.

# 'न समजलेला बाप' व्याख्यान व पुरस्कार वितरण




■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १ : कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर वाचनाला पर्याय नाही. माझे वडील मला नेहमी सांगायचे की वाचत रहा; जोपर्यंत काही सापडत नाही तोपर्यंत वाचत रहा. भाषेला ट्रान्सलेटर असतो; पण कर्तृत्वाला ट्रान्सलेटर नसतो. कर्तृत्व सिद्ध करावे लागते. त्यासाठी महापुरुषांच्या चरित्राचे वाचन व मनन करणे आवश्यक आहे. नम्रतेने जग जिंकता येते. वडील हेच आद्य दैवत आहेत, त्यांना कधीही दुःख देऊ नका, असे प्रतिपादन लेखक, विचारवंत शरद तांदळे यांनी येथे केले. ते डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या डॉ. ठाकरे सभागृहात आयोजित 'न समजलेला बाप' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. शंभुराजे प्रतिष्ठानतर्फे स्मृतिशेष रामकृष्ण आप्पाजी मिटकरी यांच्या ७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित बाप महोत्सवात शरद तांदळे यांना राज्यस्तरीय रामकृष्ण स्मृती ज्ञानोबा-तुकोबापुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुढे ते म्हणाले कि, न समजलेला बाप' ही एक सामाजिक शोकांतिका आहे. आईला मान देताना वडिलांच्या त्यागाचे विस्मरण होऊ नये. बाप फक्त कर्ता नसतो; तो मार्गदर्शक आणि छायेसारखा आधार असतो. समाजाने वडिलांना समजून घेतले तर नाती अधिक दृढ होतील, असा विश्वासही तांदळे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा कविता अमोल मिटकरी होत्या. यावेळी विचारपीठावर ज्येष्ठ समाजसेवक भाई प्रदीप देशमुख, सेवानिवृत्त शिक्षक श्रीपतराव अवारे, डॉ. सतीश ठाकरे, कुटासा येथील प्रकाशसेठ सोनी, रामनाथ हरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गझलकार गोपाल मापारी यांनी केले. आभार तुळशिदास खिरोडकार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शंभूराजे प्रतिष्ठानच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.
संवेदनशील संवाद नसल्यामुळे गैरसमज : बाप कधी कधी आपले विचार स्पष्ट करत नाही. त्यामुळे मुलांना त्यांच्या कृती किंवा निर्णयांचा अर्थ लगेच कळत नाही. बापाचे कठीण निर्णय किंवा आयुष्यातील संघर्ष मुलांना लगेच दिसत नसतात; त्यातून 'न समजलेला बाप' समोर येतो. खुला आणि संवेदनशील संवाद नसल्यामुळे गैरसमज वाढतात. 'न समजलेला बाप' हा अनुभव आणि मार्गदर्शनाचे अप्रत्यक्ष साधन असतो; मुलांना जीवनाचे मूल्य आणि संघर्ष समजून घेण्याची संधी मिळते, असे विचार आमदार मिटकरी यांनी प्रास्ताविकाद्वारे मांडले.

# पोलिस जवान कमलेश शिंदे यांनी वाचवले तरुणाचे प्राण



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १ :
गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारी एक २१ वर्षीय तरुणी तिच्याच परिचित तरुणाविरुद्ध तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात गेली. दोन वर्षे मैत्रीचे संबध ठेवून आता तिने बोलचाल बंद केली. ती आता दुसऱ्या तरुणासोबत बोलते आणि तीच तक्रार देत आहे, ही बाब २४ वर्षीय तरुणाला कळताच त्याने पुंडलिकबाबा नगरातील एका सहा माळ्याच्या इमारतीवर चढून उडी टाकली. मात्र त्याचवेळी या परिसरातीलच शहर पोलिस दलात बीडीडीएसला कार्यरत जवान कमलेश शिंदे यांनी या तरुणाला उडी टाकल्यावर पकडले. त्यामुळे त्याचे प्राण वाचले.
मूळचा मोर्शी येथील २४ वर्षीय तरुण शिक्षणासाठी शहरात भाड्याने खोली करून राहतो. दोन वर्षांपूर्वी शहरातील एका तरुणीसोबत त्याची मैत्री व नंतर प्रेमसूत जुळले. त्या काळात ते दोघे सोबत फिरायचे, बोलायचे सर्व काही सुरळीत सुरू होते. मात्र मागील काही दिवसांपासून ती तरुणी 'इग्नोर' करू लागली. तरुण बोलण्यासाठी आग्रह करतो, तो त्रास देतो असे म्हणून तरुणी त्याच्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी सोमवारी सायंकाळी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गेली.
तरुण इमारतीवर उडी मारण्यासाठी गेल्यानंतर त्याने तरुणीला व्हिडीओ कॉल करून उडी मारणार असल्याचे सांगितले. त्यावेळी तरुणी पोलिस ठाण्यातच होती. तिने तत्काळ हा प्रकार पोलिसांना सांगितला. त्यामुळे पोलिस तातडीने तरुण चढलेल्या इमारतीजवळ पोहोचले होते. तो तरुण उडी मारण्यासाठी सहा माळ्याच्या इमारतीवर चढला. त्यावेळी पोलिस जवान शिंदे यांनी त्याला पकडल्यामुळे अनर्थ टळला. या प्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल होणार आहे.

# चार हजार भाविकांना महाप्रसादाचे वितरण



■ महासागर प्रतिनिधी, खामगाव , दि. १ :
अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. त्यामुळे अन्न दानाच्या कार्यात आज समाजातील अनेक दान दात्यांचे हात पुढे येत असल्याचे दिसून येत आहे. अशा दान दात्यांच्या माध्यमातून केवळ सेवा आणि समर्पण या भावनेतून मागील दोन दशकापासून शहरापासून जवळच असलेल्या घाटपुरी येथील जगदंबा देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या व महाप्रसादाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांना येथील स्वामी विवेकानंद नवयुवक मंडळ, जय मातादी सेवा समिती व रामदास मंडळातर्फे दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या मिष्टांनासह महाप्रसादाचे वितरण करण्यात येत आहे. येथील समाजसेवक चंद्रकांत मोहता यांच्या मार्गदर्शनाखाली रवी शर्मा यांच्या नेतृत्वात आणि विनोद डिडवाणीया यांच्या देखरेखीखाली यंदा महाप्रसादाचे वितरण नवरात्रीच्या ९ दिवस करण्यात येत आहे.
देवीच्या दर्शनासाठी बुलडाणा जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातील हजारो भाविक दररोज नवरात्रीच्या काळात येत आहे. खेडे गावापासून ते मोठमोठ्या शहरातून आलेले भक्त या महाप्रसादाचा लाभ घेत आहेत. महाप्रसाद ग्रहण करून समाधान व्यक्त करीत आहे. महाप्रसादासाठी महिला व पुरुषांच्या रांगा लागलेल्या दिसून येतात. शिस्तबद्ध पद्धतीने घाटपुरीच्या श्री जगदंबा संस्थांच्या मंगल कार्यालयात महाप्रसादाचे वितरण करण्यात येत आहे. महाप्रसादासाठी घाटपुरीच्या जगदंबा संस्थानतर्फे नि:शुल्क मंगल कार्यालय उपलब्ध करून देण्यात आले आहे.
महाप्रसादासाठी दररोज साडेतीन क्विंटल गव्हाच्या पिठापासून पोळ्या तयार करण्यात येत आहेत. पोळ्या सोबत कधी काशीफळाची, कधी मिक्स भाजी यासह दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या तयार करून त्याचे वितरण करण्यात येते .
पोळी भाजीसोबत कधी बेसन चक्की, कधी बुंदी, कधी रवा बेसनाचे लाडू, शिरा तर कधी खोबऱ्याचे लाडू या मिष्टान्यासह देण्यात येत आहे. महाप्रसादाचे वितरण दररोज १२ ते ५ या वेळात करण्यात येते.
काहीजण परिवारातील लोकांना हा महाप्रसाद मिळावा या उद्देशाने महाप्रसाद घरी घेऊन जात आहेत. तर काही भाविक ज्या ठिकाणी महाप्रसादाचे वितरण करण्यात येते, त्या ठिकाणीच बसून त्याचे ग्रहण करीत आहेत. त्यांच्यासाठी मंगल कार्यालयात व्यवस्था करण्यात आली.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मुंबई, पुणे, नागपूर विशेष रेल्वे



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १ :
धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त रेल्वे प्रशासनाच्या वतीने मुंबई, पुणे, नाशिक ते नागपूर विशेष रेल्वे गाड्या सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. . त्यामुळे अकोलेकर प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात हजारोंच्या संख्येने भीम अनुयायी सहभागी होत असतात. त्यामुळे नागपूरकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळते. अनेकांना बसण्यासाठी गाडीत जागा मिळत नसल्याने गैरसोय होते. ही बाब लक्षात घेवून रेल्वे प्रशासनाच्या वतीने विशेष रेल्वे गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान नागपूरसाठी विशेष गाड्या सोडल्याबाबत खासदार अनुप धोत्रे यांनी आभार व्यक्त केले आहे. मध्य रेल्वे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पुणे ते नागपूर, नाशिक ते नागपूर, मुंबई ते नागपूर, नागपुर ते अकोला, नागपूर ते भुसावळ, सोलापूर ते नागपूर दरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे. १६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ लगेज कम गार्ड ब्रेक व्हॅनचा समावेश आहे. नाशिकरोड ते नागपूर मेमो : ०१२१७ विशेष गाडी १ ते ३ ऑक्टोबर रोजी पुणे नाशिकरोड १८.०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०८.०० वाजता नागपूर येथे पोहचेल. ०१२२४ विशेष गाडी २ ऑक्टोबर रोजी नागपूर येथून १६.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०४.१५ वाजता नाशिकरोड येथे पोहचेल. ०१२२६ विशेष गाडी ३ ऑक्टोबर व ४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथून १२.०० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २३.१५ वाजता नाशिकरोड येथे पोहचेल. मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव, पुलगांव, वर्धा, अजनी या स्थानकांवर ही रेल्वे थांबेल. पुणे - नागपूर विशेष गाडी ०१२१५ विशेष गाडी १ ऑक्टोबर रोजी पुणे येथून १४.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०७.३० वाजता नागपूर येथे पोहचेल. ०१२१६ विशेष गाडी २ ऑक्टोबर रोजी नागपूर येथून २३.०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १६.२० वाजता पुणे येथे पोहचेल. थांबे -दौंड कॉर्ड लाईन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड,चाळीसगांव, पाचोरा, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा,धामणगांव, पुलगांव, वर्धा,अजनी. मुंबई-नागपूर विशेष रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते नागपूर विशेष गाडी धावणार आहे. ०१०१९ विशेष गाडी १ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून १४.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०६.१० वाजता नागपूर येथे पोहचेल. ०१०२० विशेष गाडी २ ऑक्टोबर रोजी नागपूर येथून २२.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १७.२० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहचेल. थांबे -दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड,चाळीसगांव, पाचोरा, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा,धामणगांव, पुलगांव, वर्धा,अजनी.
नागपूर अकोला विशेष गाडी ०११३२ ही गाडी २ ऑक्टोबर रोजी नागपूर येथून १८.४० वाजता सुटेल आणि अकोला येथे त्याच दिवशी २३.३० वाजता पोहोचेल. ०११३१ विशेष गाडी ३ ऑक्टोबर रोजी अकोला येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी ०४.५० वाजता पोहोचेल. थांबे: अजनी, वर्धा ,पुलगाव, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर येथे राहणार आहे.


**तहसिलदार भिवापूर तथा तालुका दंडाधिकारी, कार्यालय भिवापूर**
कार्यालय दूरध्वनी : ०७११६ - २४२००४ ई-मेल : tahsilbhiwapur@gmail.com
क्रप्रस्तु-२/तह.भिवा/काबि /२०२५ दिनांक : २९/०९/२०२५
वाचा : १. भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. २. जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड १ आणि उपखंड. ३. मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर यांचे सुधारीत आदेश क्र. अका/डी-१ जन्म-मृत्यु आदेश/काचि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार श्री/श्रीमती मधुकर किसन राऊत, रा. ता. नागपूर, जि. नागपूर यांनी जन्माची नोंद ग्रामपंचायत वासी येथे दप्तरी घेणे करीता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केली आहे.
सदरहू अर्जदार यांनी शपथपत्र सादर केले असून शपथपत्रानुसार व्यक्ती त्यांची नामे श्री/श्रीमती मधुकर किसन राऊत यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९८१ रोजी मौजा वासी, ता. भिवापूर, जि. नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार भिवापूर, उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नूसार ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तिच्या जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार भिवापूर, यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.
तहसिलदार, भिवापूर



**ADVOCATE JAYSHREE L. MENGHARE**
NAGPUR - 441106
OFFICE & RESI. : BHOJAPUR, TAH. RAMTEK
DIST. NAGPUR. Mob. : 9960766922
Date : 30/09/2025

**-: जाहीर नोटीस :-**

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार ज्योती गोपी कोल्हेपरा, रा. स्वामी विवेकानंद वार्ड, रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर यांनी किरण दयालाल चंदेल व इतर, रा. अशोक नगर, कन्हान, त. पारशिवनी, यांचा वडीलोपार्जित मालकीची संपत्ती मौजा हिवरा बेंडे, प.ह.नं. २४, तह. रामटेक, जि. नागपूर त.जि. नागपूर येथील शेत स.नं. २६/१ आराजी हे.आर. जमा २.८८ वर्ग-१ जागा खरेदी/विक्री करणेसाठी इच्छुक आहेत करीता संबंधित दर्शविलेल्या संपत्तीवर कोणत्याही संबंधीत व्यक्ती, नातेवाईक, संस्था व इतर कोणाचेही संपत्ती विक्री करणारा आक्षेप वा उजर असल्यास जाहिरात प्रसिद्धी झाल्याचा ७ दिवसाचा आत दिलेल्या जाहिरात संपर्क साधावा.
वरील मालमत्तेवर कोणताही व्यक्ती किंवा संस्थेचे कर्ज बोझे असल्यास किंवा कोणाचाही हक्क वगैरे असल्यास तसेच आक्षेप किंवा उजर असल्यास संबंधीत मालमत्तेचे सर्व कागदपत्रासह नोटीस प्रसिद्धी झाल्याचा ७ दिवसाच्या आत माझेशी संपर्क साधावा अन्यथा तसे वरील मुदतीत न केल्यास माझा पक्षकार विक्री करण्यास मोकळा राहील व कुणाचेही हरकत, आक्षेप वा उजर विचारात घेतल्या जाणार नाही व त्यास आपण स्वतः जबाबदार राहणार व कोणतीही विक्रीसंबंधी कोणतेही हरकत,आक्षेप वा उजर बंधनकारक राहणार नाही.
रामटेक :
दिनांक ३०/०९/२०२५
स्वा/-
(ॲड. जयश्री एल. मेंघरे, रामटेक)



**ADVOCATE JAYSHREE L. MENGHARE**
NAGPUR - 441106
OFFICE & RESI. : BHOJAPUR, TAH. RAMTEK
DIST. NAGPUR. Mob. : 9960766922
Date : 30/09/2025

**-: जाहीर नोटीस :-**

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार ज्योती गोपी कोल्हेपरा, रा. स्वामी विवेकानंद वार्ड, रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर यांनी शोभाताई भिमराव पाटील व इतर, रा. प्लॉट नं. ७, नारी रोड बाबादीपसिंग नगर, नागपूर यांचा वडीलोपार्जित मालकीची संपत्ती मौजा नागपूर, प.ह.नं. ३८, तह. रामटेक, जि. नागपूर त.जि. नागपूर येथील शेत स.नं. ३६ आराजी हे.आर. जमा ३.३५ वर्ग-१ जागा खरेदी/विक्री करणेसाठी इच्छुक आहेत करीता संबंधित दर्शविलेल्या संपत्तीवर कोणत्याही संबंधीत व्यक्ती, नातेवाईक, संस्था व इतर कोणाचेही संपत्ती विक्री करणारा आक्षेप वा उजर असल्यास जाहिरात प्रसिद्धी झाल्याचा ७ दिवसाचा आत दिलेल्या जाहिरात संपर्क साधावा.
वरील मालमत्तेवर कोणताही व्यक्ती किंवा संस्थेचे कर्ज बोझे असल्यास किंवा कोणाचाही हक्क वगैरे असल्यास तसेच आक्षेप किंवा उजर असल्यास संबंधीत मालमत्तेचे सर्व कागदपत्रासह नोटीस प्रसिद्धी झाल्याचा ७ दिवसाच्या आत माझेशी संपर्क साधावा अन्यथा तसे वरील मुदतीत न केल्यास माझा पक्षकार विक्री करण्यास मोकळा राहील व कुणाचेही हरकत, आक्षेप वा उजर विचारात घेतल्या जाणार नाही व त्यास आपण स्वतः जबाबदार राहणार व कोणतीही विक्रीसंबंधी कोणतेही हरकत,आक्षेप वा उजर बंधनकारक राहणार नाही.
रामटेक :
दिनांक ३०/०९/२०२५
स्वा/-
(ॲड. जयश्री एल. मेंघरे, रामटेक)



**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ASHIQUE ALI**. NOW MY NEW NAME IS **SAYYED AASHIQUE ALI.**
ADD : PLOT NO 140, YADAV NAGAR, UPPALWADI, NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **SHRUTI ABHINIT JOSHI**. NOW MY NEW NAME IS **SHRUTI ANIL BALPANDE.**
ADD : 34, ANJANEYA, WAHANE LAYOUT, RANAPRATAP NAGAR, NAGPUR 440022

MY OLD NAME WAS **SHAIKH SAMDANI SK DAUD**. NOW MY NEW NAME IS **SHEKH SAMDANI SHEKH DAUD.**
ADD : PLOT NO 149 BAHADURA ROAD MANAV SHAKTI HOUSING SOCIETY SUNDAR NAGAR NAGPUR 440034

MY OLD NAME WAS **SHAHENAJ PARVEEN KABIRUDDIN**. NOW MY NEW NAME IS **SHAHENAJ BI SHEKH SAMDANI.**
ADD : PLOT NO 149 BAHADURA ROAD MANAV SHAKTI HOUSING SOCIETY SUNDAR NAGAR NAGPUR 440034

OLD PASSPORT NO, **AA783127**, I **SUHAIL AHMAD RANA** MY SON OLD NAME, **DANIYAL RANA**. NOW NEW NAME IS **DANIYAAL SUHAIL RANA.**
ADD: 303 SURANA LAYOUT JAFAR NAGAR NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **ABEDA BEGUM TURABUDDIN**. NOW MY NEW NAME IS **ABEDA RAJJAK QURESHI.**
ADD : WARD NO.5 KUHI MANDAL NAGPUR 441210

MY OLD NAME WAS **MEENAZ BEGUM**. NOW MY NEW NAME IS **MEENAZ MOHAMMAD YUNUS SHEIKH.**
ADD : FLAT NO 4-A,4TH FLOOR,BUILDING NO 9 A-1/1 NIRMAL NAGARI ,NEAR SHITLA MATA MANDIR,UMRED ROAD- NAGPUR - 440024

MY OLD NAME WAS **RIYAZUDDIN NIZAMUDDIN**. NOW MY NEW NAME IS **RIYAZUDDIN NIZAMUDDIN SHEIKH.**
ADD : C A ROAD BEHIND SEVADAN BUILDING KHADAN HANSAPURI NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SHABANA SHEIKH HANIF**. . NOW MY NEW NAME IS **SHABANA PARVEEN SHEIKH HANIF.**
ADD : H-1128/J/754 GALI NO 1 HASAN BAG ROAD HANUMAN NAGAR, NAGPUR 440009 (MS)

MY OLD NAME WAS **NISREEN AHMED HUSAIN**. NOW MY NEW NAME IS **NASRIN AHMED HUSSAIN.**
ADD : H-NO 110 MAIMOONA MANZIL PATHRABE MOHALLA RESHAM OLI, NAGPUR 440002 (MS)


RNINo-20789/71 महासागर नागपूर पालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# विविधा...

## शेतकरी संकटात

सध्या पावसाने कहर केला आहे मराठवाड्यात आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जबर फटका शेतकऱ्यांना बसलेला आहे. निसर्ग हा शेतकऱ्यांचा मित्र आहे असे म्हटले जाते मात्र सध्याच्या घडीला या मित्रांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडलेले आहे. महाराष्ट्रातील असंख्य शेतकऱ्यांची नुकसान परतीच्या पावसाने घडवून आणले आहे. शेतकरी मायबाप सरकारकडून मदतीची पेक्षा करीत आहे.अशा परिस्थितीमध्ये सरकार शेतकऱ्यांना कशी मदत करते हा विषय भविष्यकाळात महत्त्वाचा ठरणार आहे.

-----------------

सध्याचा शेती व्यवसाय हा तोट्यात चालणारा व्यवसाय झाला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. १८ विश्व दारिद्रयात असलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसागणिक हलाखीची होत जात आहे.कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ ही परिस्थिती दरवर्षी निर्माण होत जात आहे.

अगोदरच शेतकरी कर्जाच्या ओझा खाली जीवन जगत आहे. महाराष्ट्रात रोज कुठे ना कुठे शेतक?यांच्या आत्महत्या होत आहेत. नापीकी व दुष्काळ यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळलेले असतेच यातून सावरताना त्यांच्या तोल जातो आणि त्यातून आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल शेतकरी उचलताना दिसतो .ही परिस्थिती गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

भारत हा कृषिप्रधान देश आहे जवळपास ७०% जनता ही शेतीवर अवलंबून आहे शेतकरी सुखी तर देश सुखी हे ब्रीदवाक्य आजही आपण गुणगुणत असतो. लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान असा नारा दिला होता याचा अर्थ असा की आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे शेती उद्योगावर आधारित आहे.

शेतातून पिकवलेल्या अन्नधान्यावर देशाची अर्थव्यवस्था आधारित आहे मात्र शेतकरी अस्मानी संकटात सापडला तर देशाची अर्थव्यवस्थेला खीळ बसू शकते, अशी परिस्थिती आहे. निसर्गावर आपण अजूनही विजय मिळवू शकला नाहीत. निसर्गावर विजय मिळवणे सोपे नाही.

सध्याचे युग विज्ञान व तंत्रज्ञानाचे आहे रोज नवे नवे तंत्रज्ञान विकसित केले जात आहे. विज्ञानाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणलेला आहे शेतीच्या क्षेत्रातही आजचा शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीच्या मशागतीसाठी करू लागला आहे. ग्रामीण भागात शेतीवर काम करण्यासाठी मजूर मिळेनासे झाले आहे.

कसेल त्याची शेती, जो स्वतः शेतात राबतो त्याची शेती ही आजची परिस्थिती झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने आज भरीव प्रगती केलेली जरी असली तरी मात्र शेतकरी राजा सुखी झालेला दिसून येत नाही.

निसर्गाच्या लहरीपणामुळे अनेक शेतकऱ्यांचे जीवन नष्ट झाले आहे नुस्कान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे गेले जातील शासनाने अजूनही पंचनामे कसे करायचे याचे निकष ठरवलेले नाही. पिक विम्याचे नियमही बदलणे आवश्यक आहे पीक विमा काढल्यानंतर नैसर्गिक आपत्तीनंतर ७२ तासात कृषी विभागाला माहिती द्यावी लागते.

नुकसान होऊनही शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळत नाही पिक विमा कंपन्यांनी खरोखरच ज्या शेतकऱ्यांची नुकसान झाले आहे त्या शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्याच्या संदर्भातली कार्यवाही प्रामाणिकपणे पार पाडायला हवी. शासनाने मोठा गाजावाजा करून एक रुपयात पिक विमा योजना आणली मात्र यातील निकषात म्हणावा तसा बदल केला नाही शासनाने पीक विम्याच्या निकष यात व धोरणात बदल करावा अशी सातत्याने मागणी शेतकऱ्याकडून झाली मात्र या मागणीची दखल शासनाने घेतलेली नाही.

त्यामानाने धान, कापूस सोयाबीन , यासारख्या पिकांना बाजारात भाव नाही. युरिया, डीएपी, भारतदाना, यासारख्या खतांचे भाव प्रचंड वाढलेले आहे.ऐन हंगामात युरियाचा मोठा तुटवडा सर्वत्र दिसून येतो इतर वस्तूंचा तुटवडा नसतो मग युरियाचा तुटवडा का असतो ? असा प्रश्न शेतकरी विचारात आहे . याचे उत्तर द्यायला शासनाकडे वेळ नाही .

युरिया खते मिळावे यासाठी शेतकऱ्यांच्या रांगाच्या रांगा लागल्या, मात्र युरियाच्या तुटवळ्यामुळे शेतकरी हवालदील झाला मात्र शेतकऱ्यांच्या मागणीकडे कोणीही नेता प्रश्न विचारत नाही . याचे उत्तर द्यायला शासनाकडे वेळ नाही.

शेतमालाला भाव मिळत नाही हाती आलेले पीक वाहून गेले हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत शासनाने जाहीर करावी अशी मागणी विरोधी पक्षाने केली आहे. शासन हेक्टरी ५० हजार रुपये शेतकऱ्यांना देणार का? हा खरा प्रश्न आहे, पुरात सर्वस्व वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणे ही सरकारची प्रथम प्राथमिकता आहे. गेलेले दिवस परत पुन्हा आणता येणे शक्य नाही, त्याचप्रमाणे जे घडून गेले ते परत आणता येणार नाही. मात्र नागरिकांना मदत करून त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करण्यास मात्र जरूर करता येते.

शासनाने नेहमीच जनतेच्या हिताची काळजी करायला हवी मोठ्या अपेक्षेने शेतकरी शासनाच्या मदतीची वाट पाहत आहे त्यांना तटपुंजी मदत करून बोळवण करू नये.

शेतकऱ्याचे दुःख म्हणजे संपूर्ण भारतीय लोकांचे दुःख आहे शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, त्याला सर्व स्तरातून मदत व्हायला हवी त्यांचे कुटुंब सुखात जीवन जगायला हवे या विचाराने शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

सिंचनाच्या सोयी सुविधा निर्माण झाल्या पाहिजे अशी शेतकऱ्यांची आजपर्यंतची मागणी राहिलेली आहे. गेल्या ७० वर्षाच्या काळात बऱ्यापैकी सिंचनाच्या सोयी सुविधा निर्माण झाल्या. मात्र शेतकऱ्यांचे संकट दूर झाले नाही. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू , शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी केंद्र व राज्य सरकारने घोषणा केली होती.

मागील वर्षी झालेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत एनडीए आघाडीने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू अशी जाहीर भूमिका घेतलेली होती. सत्तेत आल्यानंतर एक वर्षाचा काळ लोटला जात असताना सुद्धा शेतकऱ्यांची कर्जमाफी शासनाला करता आली नाही.

लाडकी बहीण योजना व शेतकरी कर्जमाफी या दोन घोषणावर महाराष्ट्रातील जनतेने मागील निवडणुकीमध्ये एन डी ए आघाडीला भरघोश मतदान केले होते.परिणामतः महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर कधीही कोणत्याही पक्षाला मिळाले नाही असे बहुमत एन.डी.ए आघाडीला मिळाले होते. एन.डी.ए आघाडीच्या २३४ जागा निवडून आले होत्या.सत्तेत आल्यानंतर मात्र शेतकऱ्यांची आठवण शासन विसरत आहे का ? असा प्रश्न निर्माण झाला.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय व धोरण यातही विसंगती दिसते आहे .आजही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही एका एकरात धानाचे वीस पोते उत्पन्न शेतकरी घेत होता. उत्पन्न दुप्पट करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय व धोरण यातही विसंगती दिसते आहे. आजही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही एका एकरात वीस पोते धानाच्या उत्पन्न घेणारा शेतकरी २०१४ नंतर हे वीस पोते एका एकरात उत्पन्न घेत आहे यात बदल झालेला नाही. नरेंद्र मोदींनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी बतावणी केली होती. मात्र शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकले नाही.

शेतकऱ्यावर पुरामुळे अस्मानी संकट आलेले आहे या संकटावर मात करून नव्याने जीवन जगण्याची ऊर्जा निर्माण करण्यासाठी मायबाप सरकारने ठोस व भरीव मदत करावी अशी आर्थ मागणी शेतकरी राजाची आहे. सरकार शेतकऱ्यांना भरीव मदत करेल अशी अपेक्षा ठेवूया.

# एका महात्म्याची लोकशाही!

आधुनिक भारतीय राजकारणात गांधीजींने इतर विचारवंताप्रमाणे कोणताही राजकीय सिद्धांत व राजकीय संकल्पना मांडली नाही किंवा त्यांनी तत्वज्ञानात्मक प्रमेय मांडला नाही. राजकारण आणि समाजकारणाबदल अनेक स्फुट विचार मांडले त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू स्वातंत्र्य लढ्यातील सर्वसामान्य व्यक्ति होता. त्या व्यक्तीला कार्य प्रवण करण्यांच्या हेतूनी त्यांनी आपले विचार प्रतिपादन केले. भारतीय परिस्थितीत त्यांचे विचार प्रचंड मोठ्या प्रमाणात रुजले, पिकले, पिकले नाही तर उगवून त्यांनी त्यांच्या सारख्या सम विचारांची पेरणी केली, तीच वैचारिक पेरणी म. गांधीजीचे लोकशाही तत्वज्ञान होय.

गांधीजींचा विश्वास धर्मावर होता. भारतात धर्माशिवाय राजकारणाची कल्पनाच होऊ शकत नाही, असे त्यांचे मत होते. गांधीजी नेहमीच म्हणत राजकारणाच्या मुळाशी नेहमीच नैतिक मूल्यांचे अधिष्ठान असायला हवे. गांधीच्या मते राजकारणाचे आध्यात्मीकरण म्हणजे नैतिकीकरण होय.

गांधीजी स्वतःला हिंदू म्हणवून घेत असले तरीही हिंदुत्ववादी राजकीय प्रवाहाने त्यांना आपले मानत नव्हते. विशिष्ट धर्माच्या राजकारण करणे त्यांना मुळीच मान्य नव्हते. आदर्शांच्या विसंगत एखादे कार्य कोणी करीत आहे त्याला विरोध करणे हे व्यक्तीचा हक्क आहे असे ते मानत. गांधीजीचा भारतीय लोकशाहीवर विश्वास होता. भारतीय लोकशाहीचा विचार करता हि लोकशाही एक जीवनप्रणाली झाली पाहिजेत असा त्यांचा विचार होता.

आधुनिक भारतीय राजकारणात गांधीजींनी इतर विचारवंताप्रमाणे कोणताही राजकीय सिद्धांत व राजकीय संकल्पना मांडली नाही किंवा त्यांनी तत्त्वज्ञानात्मक प्रमेय मांडला नाही. राजकारण आणि समाजकारणा बद्दल अनेक स्फुट विचार मांडले. त्यांच्या विचाराचा केंद्रबिंदू स्वातंत्र्य लढ्यातील सर्वसामान्य व्यक्ति होता. त्या व्यक्तीला कार्यप्रवण करण्याच्या हेतूंनी त्यांनी आपले विचार प्रतिपादन केले.

इथल्या परिस्थितीत त्यांचे विचार प्रचंड मोठ्या प्रमाणात रुजले, पिकले, पिकले नाही तर उगवून त्यांनी त्यांच्या सारख्या सम विचारांची पेरणी केली, तीच वैचारिक पेरणी म. गांधीजीचे लोकशाही तत्वज्ञान होय.

गांधीजींचे विचार भारतातील गरीब, मध्यम वर्गीय, विचारवंत आणि विज्ञाननिष्ठ, राजकारणी यांना आपल्या जवळ करणारे विचार वाटले. म्हणून गांधीजीच्या स्वातंत्र्य लढ्यात सारे भारतीय एकवटले. गांधीजी म्हणजे अनुयायांना बायकांना - बाई, मुलांना - मुलगा, पुरुषांना - पुरुष, विज्ञाननिष्ठाना - वैज्ञानिक, राजकारणीना - राजकीय, धर्मकारांना - धर्मानीष्ठित विचार (धर्मनिरपेक्ष विचार) वाटले. इतकी प्रचंड मोठी वैचारिक व्यापकता गांधीजींकडे होती.

त्यामुळे हा प्रचंड मोठा समूदाय भारतातलाच नव्हे, तर संपूर्ण जगच गांधीजींच्या लढ्यात सामील झाले. मुळातच गांधीच्या विचारांना भारून अनेक स्वतंत्र्य सैनानी, उद्योपती, समाजकारणी, धर्मकारणी तसेच भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू त्यांच्या विचारांशी एकमत होऊन आपल्या ऐश्वर्यसंपन्न दैदिप्यमान जीवनशैलीचा त्याग केला. इतकी प्रचंड मोठी शक्ती गांधीजीच्या वौचारिक बैठकीत होती.

एके ठिकाणी राज्यशास्त्राचे अभ्यासक भा. ल. भोळे असे म्हणतात, गांधीजी हे चाणाक्ष शेतकऱ्यांसारखे होते. तो शेतकरी विचार करत असेल असे विद्वानांना वाटत सुद्धा नसले तरी त्यांचेही एक जीवनदर्शन असते, तसे त्यांचे होते. त्यांची हार्दिक उमज, जनसंपर्कापासून दूर विद्यापीठांतील एकांत वासाच्या छायेत राहुने आपापला रेशीम कोसला आत्म संततुष्टतापूर्वक विणणा?या प्राध्यापकांच्या पद्धतशीर बुद्धीप्रधान सिद्धांतांच्या पल्याड पोचणारी होती. गांधीच्या जन सामान्यांच्या तत्त्वज्ञानांना कोणत्याही प्रकारच्या वर्गीकरणात वा चौकटीत बसणे शक्य नाही. तरी त्यांचे विचार टिकून आहेत. कारण ते जीवनाशी एकरूप झालेले विचार आहेत.ह्व सर्वसाधारणपणे गांधीजींचे विचार हे ठराविक वगार्तील समूहापुरते मर्यादित नव्हतेच. तर ते सबंध विश्वाला मार्गदर्शकच होते. ते त्यांनी आपले स्फूट विचार वैचारिक संवादातने स्पस्ट केले. गांधीजीचा लढा सत्याचा लढा होता. निश्चितच सत्याचाच विजय होणार हे निश्चितच होते. गांधीजी स्वतःच नेहमी म्हणत असत, ह्वसत्य परेशान हे लेकीन पराजीत नही !ह्व यातील परेशान होणारे सत्य म्हणजे भारतीय लढा होता, आणि त्यांच्या विचाराप्रमाणेच तो विजयी देखिल झाला, कारण त्यांचा मुळाशी लोकशाही तत्वज्ञान रुजलेले होते.



गांधीजी नंतर गांधीजी सारखे कोणतेही राजकीय विचारवंत झाला नाही. किंवा गांधीजींनी आपला कोणताही अनुयायी समोर केला नाही. हा त्यांच्या वौचारिक बांधीलकीचा मोठेपणा, समृद्धपणाच होय; पण सद्य परिस्थितीत प्रत्येक विचाराला उत्तरदायित्व येताना/देताना दिसते.

गांधीजींना चार मूले होती, बहूतेक आपल्यातील कित्येक जणांना त्यांचे नावे देखील माहित नाही; पण त्यांना पुढे आणण्याचा त्यांनी कधीच आग्रह धरला नाही. म्हणून आजचे राजकीय विचारवंत राजकारणी होतात; पण गांधीजी आद्य राजकीय सुधारकच ठरतात.

प्रा. डॉ. राजेश सुभाष चालीकवार
इंदिरा गांधी आर्ट्स कॉमर्स
महाविद्यालय, कळमेश्वर.
९६०४०८०९०१, ७९७२७५१७४५

महात्मा गांधी आणि देशाचे भविष्य घडविणाऱ्या लोकसत्ताक घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांत कितीही वैचारिक मतमत्ता तरे असले तरीही संसदीय लोकशाही शासन व्यवस्थाच या देशाचे अखंडत्व राखून सर्वांगीण विकासाचा मार्ग निर्माण करू शकेल हे निःसंदिग्धपणे मांडले आहे.

या देशातील शेवटचा माणूस सुखी होईल तेव्हाच या देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल, असे गांधीजी म्हणत असत तर त्यालाच पुढे जोडून राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक बदल झाले तरच या देशात लोकशाही नांदिल असे आंबेडकर मानत होते.

याच विचारांची साक्ष देणारी भारतीय लोकशाही हे तत्वज्ञान त्यांनी अंगीकृत केले. धर्मनिरपेक्ष शासन, प्रौढ आणि गुप्त मताधिकार, प्रादेशिक मतदारसंघ, स्वतंत्र निवडणुक आयोग, कालबद्ध निवडणुका, प्रतिनिधिक कायदेमंडळ, जबाबदार शासन पद्धती, प्रचार आणि संघटनाचे स्वतंत्र्य हि लोकशाहीची प्राणतत्वे याच वैचारिक निष्ठेमुळे भारतात शक्य झाली.

गांधीच्या मते जनता जनार्धन साध्य तर लोकशाही कार्यान्वन साधन असेच ते मानत.

गांधीजीनी साध्य आणि साधन यात फारकत न करता लोकशाहीचे कार्यान्वन करताना यात समन्वय साधुन इच्छित फलित साध्य केले.

केवळ कायदा व सुरक्षितता यांचे रक्षण करणे एवढेच शासनाचे कर्तव्य नाही. लोकशाहीत लोकांच्या सर्वांगीण कल्याणाची जबाबदारी शासनाने पत्कारली पाहिजेत असे परखड विचार मांडले. हेच तत्व आज जगात सर्वत्र मान्यता पावले आहे.

राष्ट्रसभेचे पुढारी म्हणुन गांधी निरनिराळ्या प्रांतात जेव्हा दौऱ्यावर जात तेव्हा ठिकठिकाणी नगरपालिका त्याना मानपत्रे अर्पण करीत या मानपत्रांना उत्तर देताना आपल्या हद्दीतील अस्वच्छता नाहीशी करा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे करा, दुधाचा व्यापार ताब्यात घेऊन नागरिकांना उत्तम दुध योग्य भावात पुरविण्याची तजवीज करा, भेसळप्रतिबंधक उपाययोजना करा असाच त्यांनी नगरपित्यांना सल्ला दिला आहे.

गांधीजीचा कराची अधिवेशनातील आर्थिक धोरण विषयक ठरावाचा उल्लेख नमूद करणे इथे क्रमप्राप्त ठरतो, तो म्हणजे सत्तेवर आल्यावर जमीन मालक आणि सावकार यांच्या व्यवहारावर आपण नियंत्रणे घालू आणि कुळांवरील खंड आणी व्याज यांचा भार कमी करून त्याना संरक्षण देवू असे आश्वासन शासनाने दिले होते.

तेव्हा त्यांनी ठरावात असे शब्द घातले कि, जे मंत्रिमंडळ या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी झटणार नाही त्याला दहा दिवसदेखील अधिकारावर राहण्याचा हक्क नाही असे गांधीजीनी मंत्र्यांना बजावत ती बाब करारात टाकली. त्याचाच सोबत सक्तीचे प्राथमिक शिक्षण, दारूबंदी, खादीप्रसार, तुरुंग सुधारणा, मिठावरील कर रद्द करणे हा कार्यक्रम अंमलात आणला गेला पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला.

उत्पन्नाच्या विभाजनातील विषमता कमी करणे हे शासनाच्या वित्तविषयक धोरणाचे एक महत्वाचे तत्व मानले जाते. गांधींविचारसरणीतही हेच तत्व अंतर्भूत आहे. अप्रत्यक्ष करांचे प्रमाण कमी करून प्रत्यक्ष करांचे प्रमाण वाढविण्याचे त्यांनीही शिफारस केली आहे. सर्वत्र दारूबंदी केल्यास शासनाचा अबकारी करापासून मिळणारे उत्पन्न कमी होऊन शिक्षणावरील खर्चात कपात करावी लागेल असा दारूबंदी विरोधकांचा दावा होता.

गांधीजींनी या दाव्यात आक्षेप घेतला. ज्या कराच्या बदल्यात लोकांना आवश्यक त्या सुविधा दसपट्टीने उपलब्ध होतील तोच खरा हितावह कर होय. लोकांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक अधःपतनातून मिळविला जाणारा दारुवरील कर हा अत्यंत घृणास्पद कर आहे. ज्यांची कर देण्याची ताकद कमी त्यावरच या कराचा बोजा पडतो. म्हणून अबकारी करापासून मिळणाऱ्या उत्पनाची हाव न धरता लोकांना दारूपासून वाचविण्यासाठी आपले कर्तव्य शासनाने पार पाडावे असे गांधीजींनी मंत्र्यांना बजावले होते.

शासनाला अधिक उत्पनाची गरज असेल तर भारतासारख्या दरिद्री देशातही श्रीमंतावर कराचा अधिक बोजा बसविण्यास पुष्कळ वाव आहे. कोट्यवधी लोक अर्धपोटी जगत असणाऱ्या या देशात कोणत्याही व्यक्तींनी अमाप संपत्ती जमा करणे हा गुन्हा मानला गेला पाहिजे. संपत्तीची कमाल मर्यादा ठरवून तिच्यापेक्षा अधिक असणाऱ्या संपत्तीवर कराचा कमाल बोजा बसविण्यास हरकत नाही.

इंग्लंडमध्ये अत्युच्च उत्पनावर ७०% कर आकारला जातो. भारताला तो त्यापेक्षाही जास्तठेवणे योग्यच होईल. देशांतील श्रीमंताची मालमता त्यांच्या मत्यूनंतरजेव्हा त्यांच्या वारसांकडे जाते तेव्हा राष्ट्राचे नुकसान तर होतेच पण अनर्जित उत्पन्न मिळाल्याने त्या वारसांची उद्योगशिलता नष्ट होते. म्हणून वारसा कर बसवून शासनाने मालमत्तेचा एक भाग आपल्याकडे घ्यावा. असाही अभिप्राय गांधीजींनी दिला आहे.

गांधीजींनी समाजातील श्रीमंतांना विश्वस्त म्हणून कार्य करण्यावर भर दिला. समाजात असणारी गरीब श्रीमंत दरी नष्ट करण्यासाठी श्रीमंतांना अतिरिक्त संपत्तीचे दान करावे, यातून सामाजिक भावनेतून आर्थिक लोकशाही भारतात सहज शक्य होईल असेही कल्याणकारी विचार ते मांडतात आणि त्यांची प्रचीती भूदान चळवळीतून प्रत्यक्षात येते.

भारतीय लोकशाही स्थित्यंतराच्या काळात गांधी तत्वज्ञानाचे केवळ मन्वंतर नाही तर क्रियान्वयन सुद्धा आवश्यक आहे. हा विचार आझ पौवार्त्याच नव्हे तर पाश्चात्य संस्कृतीत सुद्धा बळकावत चालला आहे. वस्तुतः लोकशाही हि एक जीवनपद्धती आहे. तो केवळ शासनाचा प्रकार नाही. ते समाजिक, आर्थिक व नैतिक व्यवस्थेचे सुद्धा एक स्वरूप आहे. गांधीजी म्हणतात,

*कामाशिवाय संपत्ती,*
*विवेकविना सुख,*
*चारीत्र्याशिवाय ज्ञान,*
*मानवताविना विज्ञान,*
*त्यागाविना धर्म,*
*तत्त्वाशिवाय राजकारण....*

हेच गांधीजींचे सिद्धांत मानवतेच्या संरक्षणासाठी आणि लोकशाहीच्या यशासाठी आपणास नेहमीच मार्गदर्शकच ठरत कार्य करतात.

लोकशाहीचा मुलापासून विचार करणारा, प्रसंगी संसदीय लोकशाहीवर कठोर टीका करत सत्तेच्या विकेंद्रीकरणाची मागणी करणारा, राजकीय लोकशाहीच्या ढाच्याला नाकारत समाजिक लोकशाही गाभ्याचा विचार करणारा, प्रत्येक मानवी कृती मंग तिओ संसदीय असो किंवा संसदबाह्य असो तिला नैतिक मूल्याच्या कसोटीवर जोखून पाहणारा थोर सिस्थप्रज्ञ विचावंत समोर येतो आणि लोकशाही महागड खेळणं आहे म्हणणारे गांधी हिंद स्वराज्य पुस्तकात संमग्र क्रांतीचा विचार देखिल लोकशाहीत मांडताना दिसतात.

# बाबासाहेबांनी दिक्षा दिली, आपण बौद्ध कधी होणार?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्म देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या जिवनात काही फरक पडला का? काही परिवर्तन झाले का? याचे उत्तर द्यायचे तर हो.. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध दिला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या जिवनामध्ये अमुलाग्र बदल झाला.

सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व वैचारिक प्रगती होऊन विज्ञानवाद रुजायला सुरुवात झाली. मान, सन्मान व स्वाभिमान मिळाला. तथागत बुद्धांच्या धम्माचे आचरण करणारा प्रत्येक व्यक्ती हा जिवनात यशस्वी होऊन आनंदी व आदर्श जिवन जगतो यात कोणतीही शंका नाही. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या एका धाडसी निर्णयामुळे येथील माणसाला सोन्याचे दिवस आले. एवढी ताकद तथागत बुद्धांच्या धम्मात आहे.

मानवाच्या कल्याणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सवोतोपरी सर्व काम करून ठेवले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कोणतेही विचार व कार्य घेतले तर ते मानवाचे व देशाचे कल्याण करणारेच आहे. फक्त मानवतेचा चष्मा डोळ्याला हवा मेंदू मध्ये विषमतेची घाण नसावी.

बाबासाहेब यांनी धम्माची दिक्षा देऊन आम्हाला नवीन संस्कृती, नवीन संस्कार तर दिलेच पण नवीन जिवन पद्धती देऊन आमची आदर्श ओळख निर्माण करून दिली. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धांचा धम्म अनुसरून जनतेचा उद्धार केलाच.


बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांची जबाबदारी पार पाडून अत्यंत बिकट परिस्थिती मध्ये जेथे विषमता नसानसात भिनलेली होती, मान सन्मान हा तर अस्पृश्यांना माहितच नव्हता अशा वेळी ओळख निर्माण करून देणे म्हणजे क्रांतीच होय.

बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिली, आमची प्रगती झाली हे खर असतांना मुख्य प्रश्न आहे की आम्ही बौद्ध कधी होणार? बरेच लोक म्हणतात आम्ही १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध झालो. पण वास्तविक पणे पाहिले तर २०२५ मध्येही आम्ही बौद्ध आहोत का? याची मिमांसा होणे गरजेचे आहे.

स्वतःला बौद्ध म्हणून घेण्यासाठी प्रत्येकाने वेगवेगळे निषक लावले आहेत. फक्त घरात बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो मुर्ती लावणारे ही म्हणतात आम्ही बौद्ध आहोत. काही लोक आम्ही विहारात जातो म्हणून स्वतःला बौद्ध समजतात. काही लोक आम्ही अंधविश्वास व थोतांड मानत नाही म्हणून स्वतःला बौद्ध समजतात, काही लोक दारू पित नाहीत म्हणून स्वतःला बौद्ध समजतात, काही लोक पुर्वी महार होतो पण आज स्वतःला बौद्ध समजतात.

खरं पाहिले तर हा निकष बौद्ध असल्याचे किंवा तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी असल्याचे सिद्ध करते का? तर मुळीच नाही. बौद्ध होण्यासाठी माणसाला जागृत असुन तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालावे लागते. फक्त बोलुन बौद्ध होता येत. बोलण्यात एक व वागण्यात एक असेल तर तो धम्म विरोधी आहे हेच सिद्ध होते.

मग बौद्ध कोणाला म्हणायचे? जो पंचशिलेचे पालन करतो तो बौद्ध. जो धम्मानुसार चालतो तो बौद्ध. जो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आदर्श मानुन त्यावर मार्गक्रमण करतो तो खरा बौद्ध. तथागत बुद्ध, कोणत्याही प्रकारचा भेद, द्वेष मान्यच करत नाहीत. तथागत बुद्ध परिवर्तनासाठी संघ अर्थात संघटना अर्थात एकी यावरच विश्वास ठेवतात. मग आज आपण पंचशीलेचे पालन करतो का?





आदर्श जिवनाचा व प्रगतीचा मार्ग म्हणजे पंचशील आहे. घरात बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लाऊन, गाडी मध्ये फोटो लाऊन तिच गाडी बार च्या समोर उभी करून मद्य प्राशन करणारा आणि स्टेज वर भाषण देणारा कधीच बौद्ध असु शकत नाही. स्वतःच्या स्वाथार्साठी इतरांना लुटणारा आणि स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहणारा कधीच बौद्ध असु शकत नाही.

तोंडात मावा, तंबाखू, गुटखा टाकून विहारात जाणारा बौद्ध असुन शकत नाही. बर बरेच लोक काही प्रमाणात पंचशीलेचे काटेकोर पण पालन करण्याचा धम्माच्या शिकवणुकी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात त्यांचे खरोखर मनापासून अभिनंदन करावे वाटते. पण समाजात वावरतांना मुला मुलीचे लग्न करतांना मुला मुलींचे गुण न बघता पैसा आणि पोटजात बघुन लग्न करणारे लोक नेमकी कोणती समता मानत असतील हा गहन प्रश्न आहे.

स्वतःला सुशिक्षित समजून हाय क्लास, मिडल क्लास, लो क्लास समजणाऱ्या लोकांना बुद्धांची समता फक्त बोलण्यातच पाहिजे का? हा बावना तो शहाना काय प्रकार आहे हा?

पोटजाती बघून श्रेष्ठत्व किंवा पोटजाती बघून प्राधान्य देणारा व्यक्ती बौद्ध असुच शकत नाही. मग घरात घरावर, गाडी मध्ये किती मोठा फोटो, मुर्ती लावू दे तो बौद्ध होऊच शकत नाही. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी समाजाचे एकसंघ असायला पाहिजे. एकजूट व एकी असायला पाहिजे.

समाज परिवर्तन करण्यासाठी तथागत बुद्धाला संघाची गरज होती. आणि आज स्वतःला बौद्ध समजणारे वेगवेगळ्या संघटना सुरू करून विखुरले गेले. स्वतःची झोळी भरण्यासाठी बुद्ध, बाबासाहेब व चळवळीचे नाव घेऊन जगण्याची वेळ आली. स्वतःच्या संघटना सुरू करून विखुरलेला समाज काहीच करू शकत नाही, स्वतःचा मान सन्मान व स्वाभिमान ही टिकवू शकत नाही.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

परंतु समाजाची एकसंघ एकजूट असेल तर समाजाची सर्वांगीण प्रगती करून प्रत्येक मानसाला सारख्या प्रमाणात लाभ मिळू शकतो हा बुद्धांचा इतिहास विसरणारे लोक बौद्ध कसे असु शकतात?

दरवर्षी विजयादशमी साजरी करण्यासाठी दिक्षाभुमीला वेगळे स्टेज, वेगवेगळे बॅनर लागतात. वेगवेगळे स्टेज आणि बॅनर लावून स्वतः स्टेजवर जाऊन संघं सरणं गच्छामी म्हणतात जिभ अडखळत का नाही. बेकी करून संघाला अर्थात बुद्धांच्या एकीला मी शरण जातो असे म्हणणे म्हणजे धम्मा सोबत केलेली गद्दारी नाही का?

बौद्ध समजून पक्ष, संघटना, झेंडे व नेते वेगवेगळे करून मनुस्मृती चे पालन करणारे आणि विचार व आचणाने गुलाम असणारे लोक बौद्ध असु शकत नाहीत. कित्येक शिकलेले लोक आजही अंधविश्वास, पाखंड व भोंदूगिरी वर विश्वास ठेवून वेगवेगळे कर्मकांड करतात, अज्ञानावर आधारित उपक्रम साजरे करतात, लग्नामध्ये हळदी पासून ते दारक दारिका असलेल्या मुलाला व मुलीला एवढे सजवतात, त्यातही अनेक प्रथा, कर्मकांड असतात की समोरचा बुद्धाचा अनुयायी आहे हे समजणेच मुर्खपणाचे ठरते.

दरवर्षी विजया दशमी एका ठिकाणी येऊन वेगवेगळ्या स्टेजवर साजरी होत असेल तर आम्ही विजय नेमका कशाचा साजरा करतोय? धम्म स्विकारण्याचा उद्देश साध्य झाला का? अपवादात्मक उदाहरणे देऊन फक्त नियम सिद्ध करता येत असतो. अपवाद म्हणजे नियम नसतो. हे ज्याला समजले तो नक्कीच विचार करेल.

आपण अजूनही बौद्ध झालो नाही. आपण स्वतःला बौद्ध समजत असु, आपण बुद्ध बाबासाहेब यांचे नाव घेत असु पण आजही वैचारिक व वर्तनाच्या पातळीवर बौद्ध होणे बाकीच आहे. जर आम्ही बौद्धच झालो नाही तर दरवर्षी विजया दशमी आम्हाला साजरा करण्याचा नैतिक अधिकार आहे का?

कारण विजया दशमी अर्थात धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा बौद्ध झालेल्या लोकांसाठी विचाराचा व आचरणाचा प्रचार प्रसारासोबतच समिक्षा करण्याचा दिवस आहे. जे धम्माला मलिन करू पाहत आहेत त्यांनी विजया दशमी साजरा करू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दुरदृष्टी ठेवून धम्माची वाट आम्हाला दिली. आम्ही धम्माच्या वाटेने न जाता भलत्याच वाटेने जाऊन धम्मा मध्ये भेसळ करण्याचा प्रयत्न करत आहोत.

कोणताही दिवस साजरा करताना त्या दिवसाचे महत्त्व समजून घेऊन त्यावर चिंतन मनन करून भविष्यात अजून काय नियोजन व परिवर्तन आवश्यक आहे यावर चर्चा व्हायला पाहिजे. पण सध्या जो तो येउन भाषण देऊन निघून जातो यामुळे ना चळवळ वाढत ना परिवर्तन होत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिक्षा जरी दिली असली तरीही अजून आपण बौद्ध झालो नाही.

बौद्ध होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करूया. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या धम्माचे महत्त्व समजून घेऊन धम्मानुसार वागण्याचा प्रयत्न करणाऱ्या, समाज संघटीत राहून स्वतः ची नाही तर समाजाची सामुहिक प्रगती व्हावी म्हणून फुल ना फुलाची पाकळी योगदान देणाऱ्या सर्वांना विजयादशमीच्या मंगलमय कामना..

## माजी मंत्री अनिल देशमुखांवर
# हल्ल्याचा पुरावाच नाही

### ग्रामीण पोलिसांनी कोर्टात सादर केली क्लोजर समरी

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १ : विधानसभा निवडणुकी दरम्यान माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली होती. पण आता हा हल्ला बनावट होता असा खळबळजनक खुलासा पोलिस तपासातून पुढे आला आहे.

पोलिसांनुसार, अनिल देशमुख यांच्यावर कुणी हल्ला केला, याचा कोणताही पुरावा सापडला नाही. त्यामुळे पोलिसांनी कोर्टामध्ये हा हल्ला खोटा असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणामुळे अनिल देशमुख यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.



**देशमुखांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता**

दिलेली तक्रार तपासात खोटी निघाली तर तक्रारदार अडचणीत येतो. आयपीसीच्या कलम १८२ आणि कलम २११ अंतर्गत तक्रारदारावर फौजदारी कारवाई केली जाऊ शकते. कोर्टात सादर बी समरी रिपोर्ट याकरिता प्रमाण मानले जाते. या कलमांनुसार, कायद्याचा गैरवापर केल्याबद्दल शिक्षा होऊ शकते. या खोट्या तक्रारीमुळे जर एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचल्यास, त्यावर मानहानीचा दावा देखील दाखल केला जाऊ शकतो.

देशमुख यांच्यावर हल्ला झाल्याचा पुरावा सापडला नसल्याचे समोर आले आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत प्रचारादरम्यान अनिल देशमुख यांच्या गाडीवर मोठा दगड फेकून जीवघेणा हल्ला झाला होता. त्यात अनिल देशमुख किरकोळ जखमी झाले होते. मात्र, हा अनिल देशमुख यांचा दावा बनावट असल्याचे पोलीस तपासात समोर आल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी निवडणूक काळात दाखल केलेली तक्रार खोटी आणि बनावट असल्याचे तपासात

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर ग्रामीण पोलिसांनी क्लोजर समरी कोर्टात सादर केली आहे. ज्यामध्ये अनिल निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पोलिसांकडून कोर्टात बी समरी रिपोर्ट दाखल करण्यात आला आहे.

**आरोपी पकडले का नाहीत?**

देशमुखांनी पोलिसांवर थेट प्रश्न उपस्थित केला. रिपोर्टमध्ये दोन लोकांनी दगडफेक केल्याचं नमूद आहे. मग त्यांची व्यवस्थित चौकशी करून त्यांना अटक का केली नाही? आरोपी सापडले नाहीत, याबाबत पोलिसांनी स्वतंत्र रिपोर्ट सादर करायला हवा होता, अशी टीका त्यांनी केली.

**मोठा दगड थेट गाडीवर फेकला**

फॉरेन्सिक तपासणीतील निष्कर्ष देशमुखांनी पत्रकार परिषदेत वाचून दाखवले. रस्त्यावर मोठं वळण असल्याने गाडीचा वेग कमी होता. त्याच वेळी 10 किलोचा मोठा दगड गाडीवर फेकण्यात आला. त्यामुळे गाडीची काच तडकली आणि माझ्या डोक्याला जखम झाली, असे ते म्हणाले.

**फॉरेन्सिक रिपोर्ट जनतेसमोर आणणार**

देशमुखांनी सांगितले की, हा फॉरेन्सिक रिपोर्ट ते लवकरच सर्वसामान्य जनतेसमोर आणतील. माझ्यावर हल्ला झालाच, हे फॉरेन्सिकने सिद्ध केलं आहे. सरकारने याकडे डोळेझाक केली. आता आम्ही यावर योग्य ती कारवाई करू, असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकीय वादळ उठण्याची चिन्हं आहेत.

## दुचाकी अपघातात दोन भाविक ठार

■ महासागर प्रतिनिधी गोंदिया, दि. १ : नवरात्री उत्सव निमित्ताने छत्तीसगड राज्यातील डोंगरगड येथे बमलेश्वरी देवीच्या दर्शनाला जात असलेल्या देवरी तालुक्यातील शिलापूर (भोयरटोला) येथील भाविकांच्या दुचाकीला अपघात होऊन दोघांचा जागीच मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना बुधवार १ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास घडली.

संजय मानकर आणि आशिष फुन अशी मृतांची नावे आहे तर श्यामकुमार भोयर असे गंभीर जखमीचे नाव आहे. तिघेही दुचाकीने नवरात्री उत्सव निमित्ताने डोंगरगड बमलेश्वरी देवीच्या दर्शनासाठी जात होते. राजनांदगाव जिल्ह्यातील छूरीया गावाजवळ त्यांच्या भरधाव दुचाकीची समोरील ट्रकला धडक बसली. त्यात दोघांचा मृत्यू झाला.

# आरएसएसचा शताब्दी दसरा उत्सव सुरू



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी विजयादशमी उत्सवाला आज गुरूवार २ ऑक्टोबर रोजी प्रारंभ होत आहे.

यावर्षी संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या विशेष विजयादशमी उत्सवात देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे.

सरसंघचालक मोहन भागवत हे मुख्य भाषण करणार आहेत. हा कार्यक्रम २ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.४० वाजता रेशीमबाग मैदानात सुरू होणार आहे.

यापूर्वी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी उपराष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे संघाच्या उत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यंदा शताब्दी वर्षामुळे मागील वर्षांच्या तुलनेत तिप्पट म्हणजे सुमारे २१ हजार स्वयंसेवक संपूर्ण गणवेशात उपस्थित राहणार आहेत.

१९९५ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव नागपूरच्या रेशीमबाग मैदानात साजरा केला जात आहे. त्यापूर्वी हा उत्सव कस्तुरचंद पार्क येथे होत असे.या कार्यक्रमासाठी घाना, थायलंड, इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आदी देशातून सुमारे ५० ते ६०प्रतिनिधी उपस्थित राहिल.

मणिपूरमधील स्वयंसेवकही मोठ्या उत्साहाने या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. यंदाच्या विजयादशमीपासून ते २०२६ च्या विजयादशमी पर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष साजरे करणार आहे. या काळात देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना नागपूरमध्ये डॉ. हेडगेवार यांच्या घरी १७ जणांच्या उपस्थितीत झाली होती. १७ एप्रिल १९२६ रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नाव निश्चित करण्यात आले. १९२६ साली पहिल्या विजयादशमी उत्सवात संघाचे पहिले पथसंचलन झाले होते.

## मयुरेश वाघमारे युपीएससीत देशात आठवा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ : सोलापूरच्या सुपुत्राने पुन्हा एकदा महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिसेस (आयईएस परीक्षेत मयुरेश भारत वाघमारे यांनी देशात आठवा क्रमांक पटकावला आहे.

**महाराष्ट्रातून एकमेव निवड**



एकूण १२ जागांसाठी देशभरातून ४ लाख ३० हजार विद्यार्थ्यांनी ही स्पर्धा परीक्षा दिली होती. या प्रचंड स्पर्धेतून मयुरेश यांनी केवळ यशच मिळवले नाही तर आठवा क्रमांक मिळवत महाराष्ट्राला एकमेव प्रतिनिधित्वही मिळवून दिले आहे. मयुरेश यांच्या या यशानंतर सोलापूरसह संपूर्ण राज्यात आनंदाचे वातावरण असून, कष्ट, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन असेल तर यश नक्की मिळते, हे त्यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.

मूळचे सोलापूरचे असलेले मयुरेश हे सध्या रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे कार्यरत असलेल्या अपर जिल्हाधिकारी भारत वाघमारे यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या घरात प्रशासकीय परंपरेचा वारसा असून, आजोबा अंगद वाघमारे हेही उपजिल्हाधिकारी होते.

सुयश विद्यालयात प्राथमिक शिक्षण, संगमेश्वर कॉलेजमधून बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी इंग्लंडला जाऊन ॲग्रीकल्चर ॲडव्हान्स्ड इकॉनॉमिक्स या विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतले. जागतिक दर्जाचे हे शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारतात परतल्यावर प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्याचा निश्चय केला.

युपीएससीच्या या स्पर्धा परीक्षेची लेखी चाचणी जूनमध्ये झाली होती. याचा निकाल ९ सप्टेंबर रोजी जाहीर झाला. १६ सप्टेंबरला उमेदवारांची वैद्यकीय परीक्षा झाली. सर्व निकषांची पूर्तता केल्यानंतर अखेर अंतिम निकाल जाहीर झाला आणि त्यात सोलापूरच्या मयुरेशने देशात आठवा क्रमांक मिळवत महाराष्ट्राला गौरव मिळवून दिला. या यशानंतर मयुरेश यांची नियुक्ती केंद्रीय वित्त मंत्रालय किंवा रिझर्व्ह बँक यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांमध्ये होऊ शकते.

मयुरेश यांच्या यशामागे घरच्यांचे प्रेरणादायी योगदान आहे. वडील भारत वाघमारे हे राज्य प्रशासनात वरिष्ठ अधिकारी असून, कामातील शिस्त, पारदर्शकता आणि जनतेशी जवळीक यामुळे त्यांनी चांगली छाप निर्माण केली आहे.

## एसटीची १०% हंगामी भाडेवाढ अखेर रद्द

### शिंदेंची सूचना आणि परिवहन मंत्री सरनाईकांची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ : राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी एसटीची १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याची घोषणा केली.

सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या एसटीने ऐन सणावारांच्या दिवसांत १० टक्के भाडेवाढ निर्णय घेतला होता. अतिवृष्टीमुळे सर्वसामान्य नागरीक हवालदिल झाला असताना ही दरवाढ झाल्यामुळे तीव्र पडसाद उमटले होते.




अखेर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरनाईकांना ही भाडेवाढ मागे घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सरनाईकांनी लगेचच ही भाडेवाढ मागे घेण्याची घोषणा केली. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य परिवहन महामंडळाने मंगळवारी दिवाळीच्या काळात म्हणजे १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत या कालावधीसाठी १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला होता. ही भाडेवाढ सरसकट सर्वच बसेसना लागू नव्हती. त्यातून वातानुकूलित शिवनेरी व शिवाई बसेस वगळण्यात आल्या होत्या.

यामुळे सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या लालपरीसह लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी अनुकूल असणाऱ्या रातराणीच्या सर्वच प्रवाशांना या भाडेवाढीचा फटका बसणार होता. त्यामुळे ही दरवाढ मागे घेतली जावी अशी मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही हंगामी दरवाढ मागे घेण्याची घोषणा केली आहे.

**शिंदेंच्या सूचनेनुसार दरवाढ मागे**

एसटीच्या दरवाढीवर सामान्य जनतेतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्री प्रताप सरनाईक यांना ही दरवाढ मागे घेण्याची सूचना केली. त्यानंतर परिवहन मंत्र्यांनी वेळ न दवडता लगेचच ही दरवाढ मागे घेण्याची घोषणा केली.

सरकारच्या या निर्णयाचा अतिवृष्टीने मेटाकुटीस आलेल्या सर्वसामान्यांसह दिवाळीला गावी जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांना फायदा होणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे गतवर्षी टॅक्सी व रिक्षा चालक संघटनांकडून भाडेवाढीचा प्रस्ताव देण्यात आला होता.

त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाकडून देण्यात आलेल्या भाडेवाढीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे नव्या वर्षात एसटीचा प्रवास महागला होता.

२४ जानेवारी २०२५ पासून एसटीची भाडेवाढ लागू करण्यात आली होती. त्यावेळी झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या (एसटीए) बैठकीत १४.९५ टक्के तिकीट दरवाढीला मान्यता दिली होती. तशी औपचारिक घोषणाही केल्यानंतर भाडेवाढ करण्यात आली होती.

## अपंग सक्षमीकरणासाठी एक प्रेरणादायी उपक्रम : पर्पल फेअर २०२५



अपंग बांधवांचा आत्मसन्मान, आत्मनिर्भरता आणि सामाजिक समावेश या मूल्यांना चालना देण्यासोबत अपंग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, त्यांच्या स्पर्धा आयोजित करणे तसेच अपंग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या उत्पादनांचे प्रदर्शन करण्या च्या उद्देशाने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात पर्पल फेअर २०२५ हा अपंग सक्षमीकरणासाठीच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**लोकजागर**

राज्यात अशा पद्धतीचा हा सर्वप्रथम उपक्रम राबवण्यात आला असून याच धरतीवर इतर जिल्ह्यांमध्ये अपंगांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या उपक्रमाचे आयोजन अली यावर जंग राष्ट्रीय वाचा आणि श्रवण दिव्यांगजन संस्था, बांद्रा मुंबई, जिल्हा परिषद पालघरच्या समाजकल्याण विभागाच्या पुढाकाराने आणि भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली करण्यात आले होते.

अली यावर जंग संस्थेचे संचालक डॉ. सुमन कुमार, माजी संचालक डॉ. राजू आराख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या फेअरमध्ये जिल्हा प्रशासन, अपंग कल्याण विभाग, सामाजिक कल्याण विभाग, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र विरार, विविध स्वयंसेवी संस्था आणि विशेष शाळांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या सदस्या तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष वैदेही वाढाण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी सुभाष बागडे, उपायुक्त तथा दिव्यांग पुनर्वसन अधिकारी नितीन ढगे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, अपंग सक्षमीकरणासाठी विशेष कार्य करणाऱ्या राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्रमिलाताई कोकड यांच्या उपस्थितीत झाले.

या फेअरमध्ये जिल्हाभरातील १८ शाळांमधील २०७ अपंग विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांमध्ये आपली कला, खेळगुण आणि आत्मविश्वास सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. सॅक रेस, ग्लास मनोरा रचना, फुगे फुगवणे, कॅरम अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

अपंग उद्योजक आणि कलाकारांसाठी १७ स्टॉल्स उभारण्यात आले होते. यामध्ये त्यांच्या उत्पादने आणि कलाकृतींचे सादरीकरण करण्यात आले. एलिम्को संस्थेमार्फत दिव्यांगांना सहाय्यक साहित्याचे वाटपही करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थितांशी बोलताना रवींद्र शिंदे म्हणाले की, आपण हा अपंग विद्यार्थ्यांचा उत्सव साजरा करीत आहोत, त्यांच्या आनंदात सहभागी होणे ही आपली जबाबदारी आहे असे सांगितले. नितीन ढगे यांनी अपंग मुलांना घरात न ठेवता समाजात घेऊन जाण्याचे आवाहन करताना, समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांचा समावेश करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

वैदेही वाढाण यांनी अली यावर जंग संस्थेच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की, शासन आणि संस्था मिळून अपंगांच्या सक्षमीकरणासाठी कटीबद्ध आहेत आणि त्यामुळे समाजात सकारात्मक विश्वास निर्माण होत आहे.

पर्पल फेअर २०२५ या उपक्रमाच्या माध्यमातून अपंग बांधवांसाठी रोजगार, कला, क्रीडा, सहाय्यक साधने आणि शासकीय योजनांची माहिती या सर्व क्षेत्रात एकाच ठिकाणी संधी उपलब्ध करून देण्यात आली.

या भव्य उपक्रमाची सुरुवात भारत सरकारने पालघर जिल्ह्यातून केली असून, हा उपक्रम भविष्यातही अपंगांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद पालघरचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी, अपंगांच्या शाळांचे प्रतिनिधी पालक तसेच अपंग विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

■ ■ ■

## ही तर ढोंगी भूमिका..

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ : आज शेतकरी संकटात आहे. त्याला निकषांपुढे जाऊन, सरसकट व भरीव मदत देणे ही सरकारची जबाबदारी आहे. देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षनेते असताना ओला दुष्काळ ही संकल्पना होती, आणि सत्तेत आल्यानंतर ती संकल्पना नष्ट होते का? शब्दांचा खेळ करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये, वर अशी पोस्ट करत कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी तत्कालीन विरोधी पक्षनेते आणि सध्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर दुटप्पीपणाचा आरोप केला आहे.

ओला दुष्काळ जाहीर करून लाखो शेतकऱ्यांना मदतीचा ठोस निर्णय मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत होईल. अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात तसे झाले नाही. बैठकीनंतर फडणवीस म्हणाले की, सरकारी मॅन्युअलमध्येच ओला दुष्काळ नावाचा शब्दच नाही. आजपर्यंत कुठेही, कधीही ओला दुष्काळ जाहीर झालेलाच नाही. त्यांच्या वक्तव्यावर वडेट्टीवार यांनी हल्लाबोल केला.

वडेट्टीवार म्हणाले की, तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करत पत्र लिहिले होते.आज त्यापेक्षा दहा पटीने गंभीर परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे,म्हणून आम्ही जेव्हा ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करतो, तेव्हा मुख्यमंत्री फडणवीस सांगतात ओला दुष्काळ ही संकल्पना नाही, नियमावलीत असा शब्द नाही, ओला दुष्काळ कधीच जाहीर केलेला नाही, असे सांगतात. ही त्यांची भूमिका ढोंगीपणा असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.

## एसटी आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या

■ छ. संभाजीनगर, दि. १ : धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गात आरक्षण देण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका तरुणाने आत्महत्या केली. सदर तरुणाने आपल्या सुसाईड नोटमध्ये मुख्यमंत्र्यांना आपले बलिदान वाया जाऊ न देण्याची विनंती केली आहे.

गोपीनाथ रघुनाथ दांगोडे (३८) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. तो छत्रपती संभाजीनगरच्या फुलंब्री तालुक्यातील खामगाव गोरक्ष येथील अल्पभूधारक शेतकरी होता. त्याच्या पश्चात पत्नी व ४ मुली असा परिवार आहे.

जालना शहरात धनगर आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. पण सरकारने अद्याप त्याची योग्य ती दखल घेतली नाही. यामुळे त्याने आत्महत्या केली.

## ॲड. प्रकाश आंबेडकर करणार
## राहुल गांधींसोबत आघाडी

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार उलथवून टाकण्यासाठी कॉंग्रेससोबत आघाडी करण्यात आम्हाला काहीच अडचण नाही, असा पुनरुच्चार वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.



केवळ मतचोरीच नव्हे, तर सर्वच मुद्यांवर आमची राहुल गांधींसोबत एकत्र येण्यास हरकत नाही, असे ते म्हणालेत. प्रकाश आंबेडकरांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी राज्यातील ओला दुष्काळ, मराठा ओबीसी आरक्षण वाद, सध्याचा राजकीय घटनाक्रम आदी विविध मुद्यांवर विस्तृत प्रकाश टाकला. वंचितची कॉंग्रेससोबत आघाडी करण्यास काहीही हरकत नसल्याचेही पुन्हा एकदा स्पष्ट केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप वगळता इतर कोणत्याही पक्षाशी आघाडी करण्याचे अधिकार आम्ही आमच्या स्थानिक नेतृत्वाला दिलेत. आम्ही चाचपणी करीत आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## यशोगाथा सेंद्रिय शेतीची

भावेश पुरोहित तरुण शेतकरी उद्योजकाने सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अनोखा पुढाकार घेतला. त्याने 2017 मध्ये 'धेनू प्रसाद' नावाची कंपनी सुरु केली. ही कंपनी गोमूत्रापासून नैसर्गिक खते बनवते. आज ही कंपनी वार्षिक 70 लाख रुपये इतका टर्नओव्हर करत आहे.



सध्याच्या घडीला राज्यासह देशभरात अनेक सुशिक्षित तरुण शेती तसेच शेती आधारित उद्योगांमध्ये आपले नशीब आजमावत आहे. विशेष म्हणजे या तरुणांना आपल्या ज्ञान आणि शिक्षणाच्या जोरावर यात मोठे यश देखील मिळत आहे. आज आपण अशाच एका तरुण शेतकरी उद्योजकाची यशोगाथा पाहणार आहोत. ज्याने सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून आपली प्रगती साधली आहे. त्याने सेंद्रिय शेतीआधारीत कंपनी स्थापन केली असून, तो त्या माध्यमातून वार्षिक ७० लाख रुपये इतकी कमाई करत आहे.

भावेश पुरोहित असे या शेतकरी उद्योजकाचे नाव असून, तो गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील रहिवासी आहे. आपले शिक्षण पुर्ण झाल्यानंतर भावेश याने शेतीमध्ये काहीतरी नवीन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्याने शेतीमध्ये सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अनोखा पुढाकार घेतला. त्याने 2017 मध्ये धेनू प्रसाद नावाची कंपनी सुरू केली.

ही कंपनी गोमूत्रापासून नैसर्गिक खते बनवते. आज ही कंपनी वार्षिक 70 लाख रुपये इतका टर्नओव्हर करत आहे.सुरुवातीला भावेश याने बनासकांठा जिल्ह्यातील भाभर येथे धेनू प्रसाद नावाने रासायनिक कीटकनाशकांऐवजी गोमूत्रापासून बनवलेल्या नैसर्गिक खते व किटकनाशकांचा प्रचार सुरु केला.

भावेश पुरोहित यांनी 2017 मध्ये ही कंपनी सुरू केली. तो याच जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्याने बायोटेक्नॉलॉजीमध्ये पदवी घेतली आहे. तो निराधार गायींना सांभाळत हा व्यवसाय करत आहे. निराधार गायी सांभाळत शेतक ?यांना त्यांचा फायदा व्हावा, अशी त्यांची इच्छा होती. त्यातून त्याच्या गोमूत्राचे 100 टक्के नैसर्गिक खतामध्ये रूपांतर करण्याची कल्पना धेनू प्रसादच्या माध्यमातून त्याच्या मनात आली.

जवळपास तीन वर्ष संशोधन केल्यानंतर, भावेशने आपले स्टार्टअप गोमूत्र खत उद्योग यशस्वीपणे सुरू केला. भावेश पुरोहित याने तयार केलेले सेंद्रिय खते ही दररोज आजूबाजूच्या गावात आणि शेतात जात असत. मात्र, त्यांना फारशी मागणी मिळत नसे. ज्यामुळे त्याने गोमूत्र खताच्या फायद्यांविषयी जागरूक करण्यासाठी शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या. ज्यामुळे शेतकऱ्यांना गोमूत्र खताबाबत माहिती मिळण्यास मदत झाली. भावेशच्या याच प्रयत्नातून आज धेनू प्रसाद ही गोमूत्र डेअरी म्हणून उद्याला आली आहे. त्यांच्या कंपनीच्या माध्यामातून 500 हून अधिक शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्यास मदत होत आहे.

कंपनी दरमहा ४५,००० लिटर गोमूत्रावर प्रक्रिया करते. ही खते नैसर्गिक कीटकनाशक आणि खते म्हणून उपलब्ध आहे. 2023-24 या आर्थिक वर्षात कंपनीचा महसूल 70 लाख रुपये इतका होता. सध्या कंपनी आपल्या कायार्चा विस्तार करण्याचा विचार करत आहे. आगामी काळात दररोज 10,000 लिटर्सवर प्रक्रिया करून, उत्पादनांचा विस्तार करण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## लाडकी बहीण योजनेवर सरकारचा कडक लगाम

### महिलांसोबत पती किंवा वडिलांचा आधार क्रमांक नोंदवावा लागणार : ई-केवायसीसाठी दोन महिन्यांची मुदत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ : लाडकी बहीण योजनेत लाभार्थी महिलांच्या नावावर फारसं उत्पन्न नसल्याने, जवळपास सर्वच अर्ज पात्र ठरत होते. अनेक महिला गृहिणी असल्याने त्यांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी किंवा शून्य असल्याचे नोंदीत दिसत होते. परंतु या महिलांचे पती किंवा वडील उच्च उत्पन्नाचे असल्याचे लक्षात आल्यानंतर लाभ घेणाऱ्या महिलांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे.

यामध्ये महिलांसोबत त्यांचे पती किंवा वडिलांचीही माहिती मागवली जाणार आहे. जर पती अथवा वडिलांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त असल्यास संबंधित महिला थेट अपात्र ठरणार आहे. मोठ्या प्रमाणावर अपात्र लाभार्थ्यांची छाननी होऊन योजना फक्त खरी पात्र असणाऱ्यांपुरतीच मर्यादित राहणार आहे.




राज्यातील महिलांना आर्थिक मदतीचा हात देण्यासाठी लागू करण्यात आलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरुवातीपासूनच चर्चेत राहिली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी या योजनेची घोषणा करण्यात आली होती. १५०० रुपयांची थेट आर्थिक मदत मिळत असल्याने लाखो महिलांनी या योजनेत नोंदणी केली.

सुरुवातीला योजनेचे निकष शिथिल ठेवण्यात आले होते. त्यामुळे पात्रझअपात्र असे मिश्र स्वरूपात अनेकांनी अर्ज केले. राज्य सरकारच्या तिजोरीवर यामुळे प्रचंड आर्थिक भार पडत असल्याचे लवकरच स्पष्ट झाले. आता सरकारनेच योजनेच्या अंमलबजावणीत काटेकोरपणा आणला असून, मोठ्या प्रमाणात बोगस लाभार्थ्यांची छाननी केली जात आहे.

ई-केवायसी प्रक्रियेसाठी लाभार्थ्यांना निर्धारीत संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी लागणार आहे. मुखपृष्ठावरील ई-केवायसी बॅनरवर क्लिक करून फॉर्म भरावा लागतो. सर्वप्रथम स्वतःचा आधार क्रमांक टाकून ओटीपीद्वारे पडताळणी करावी लागते. जर लाभार्थी पात्र यादीत असेल, तर पुढील टप्प्यात पती किंवा वडिलांचा आधार क्रमांक नोंदवावा लागतो. त्यानंतर पुन्हा ओटीपीद्वारे प्रमाणीकरण पूर्ण होते.

जात प्रवर्ग, कुटुंबातील शासकीय सेवेत कार्यरत सदस्य नसल्याची खात्री, तसेच एका कुटुंबातील फक्त एक विवाहित आणि एक अविवाहित महिला लाभ घेते आहे, याची नोंद करून सबमिट करावे लागते. शेवटी ह्राई-केवायसी यशस्वीपणे पूर्ण झाली, असा संदेश दिसतो आणि लाभार्थ्यांचे नाव अंतिम यादीत नोंदवले जाते.

या कठोर छाननीमुळे लाडकी बहीण योजनेतील लाखो अपात्र लाभार्थ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला जाण्याची शक्यता आहे. आता आर्थिक भार असह्य झाल्याने सरकारने नवे नियम आणले आहेत.

नागपूर
महासागर
वृत्तसागर
गुरुवार, दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५



# नवीन जीएसटी सुधारणा विधेयक सर्वसामान्यांना मोठा दिलासा देणारा

## पामकोर्ट लॉन येथे पत्रकार परिषद मनोहर कुंभारे यांचा विश्वास

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १ :

केंद्र सरकारने नुकतेच नवीन जीएसटी सुधारणा विधेयक मंजूर केले. खऱ्याअर्थाने हि देशाच्या अर्थव्यवस्थेला व सर्वसामान्यांना दिलासा देणारा क्रांतिकारी निर्णय ठरणार आहे. असे मत मनोहर कुंभारे भाजप जिल्हाध्यक्ष काटोल यांनी सावनेर येथील पाम कोर्ट लॉन येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी धनरामजी देवके (मुख्य संघटक), आदर्श पटले, जिल्हा महामंत्री भाजप जिल्हा उपाध्यक्ष रामराव मोवाडे, दिनेश ठाकरे, जिल्हा सरचिटणीस आणि जिल्हा समन्वयक, उज्वला बोढारे, जिल्हा अध्यक्ष आघाडी, भाजप महिला आढखड नेत्या ज्योती कांबळे,मंदार मंगळे सावनेर मंडळ अध्यक्ष, आयुषी धपके, सोनु नवधिंगे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख तसेच सहसंयोजक जीएसटी, प्रतिक कोल्हे मंडळ अध्यक्ष कळमेश्वर, राजू घुगल, मनीष खंगारे रवींद्र ठाकूर तुषार उमाटे, राजू भुजाडे, महेश चकोल, पिंटू सातपुते, तनय मोवाडे



ईत्यादींची उपस्थिती होती. कुंभारे म्हणाले की, २०१७ मध्ये केंद्र सरकारने जीएसटी कर प्रणाली देशात लागू केली होती. त्यावेळी जीएसटी मध्ये ५ १२ १८ आणि २८ टक्के असे ४ स्लॅब ठेवण्यात आले होते. सरकारने वस्तू व सेवा कर (जीएसटी) च्या स्लॅब मधील १२ आणि २८ टक्के हे स्लॅब कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. आता अधिकांश वस्तूंसाठी केवळ ५ आणि १८ टक्के अशा दोन स्लॅब ठेवण्यात आले आहे. आता नवीन करप्रणाली मुळे वस्तू व सेवांमध्ये वर्गीकरण करणे सोपे होणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. २०१७ मध्ये लागू झालेला जीएसटी हा धाडसी पण गुंतागुंतीचा टप्पा होता. या दुसऱ्या टप्प्यातील सुधारणा ही आवश्यक कोर्स करेक्शन ठरेल हे निश्चित, जो भारताच्या अर्थव्यवस्थेला नव्या उंचीवर नेईल. ही सुधारणा केवळ कर सुलभीकरणापुरती मर्यादित न राहता भारताची जागतिक स्पर्धात्मकता वाढविणारी ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंजूर केलेल्या नवीन जीएसटी सुधारणांच्या अनुषंगाने होणारे परिणाम हे सर्वसामान्यांना आर्थिक संजीवनीच ठरणार आहे. नवीन जीएसटी सुधारणा शेतकऱ्यांसाठी आणि सर्वसामान्य जनतेसाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरणार आहेत. दैनंदिन जीवनात लागणाऱ्या अनेक वस्तूंवरील करदर कमी झाल्यामुळे स्वयंपाक घरातील खर्च कमी होईल. तूप, पनीर, दुध पदार्थ, साबण, शॅम्पू यांसारख्या आवश्यक वस्तू आता अधिक स्वस्त मिळणार असल्याने सर्वसामान्यांच्या जगण्याचा भार हलका होईल. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या काही साहित्य व उपकरणांवरील जीएसटी कमी झाल्यामुळे त्यांचा खर्च कमी होईल. यामुळे त्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन नफा वाढण्याची संधी उपलब्ध होईल. वस्तू स्वस्त झाल्यामुळे बाजारात मागणी वाढेल आणि विक्रीत वाढ होऊन शेतीमालालाही चांगली किंमत मिळण्याची शक्यता आहे. या सुधारणा ग्रामीण तसेच शहरी भागातील लोकांच्या खिशाला दिलासा देणाऱ्या ठरत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर व मध्यमवर्गीय लोकांचे अर्थमंत्री निर्मला सीतारमण, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्र सरकार वर विश्वास अजून ठाम झाला असल्याचे ते म्हणाले. पत्रकार परिषद आटोपल्यानंतर पाम कोर्ट लॉन येथे पं. दिनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## धम्म बांधवांच्या स्वागतासाठी मनपा सज्ज

### दीक्षाभूमीवरील सुविधांची आयुक्तांनी केली पाहणी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ : नागपूर महानगरपालिकेतर्फे ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर दाखल होणाऱ्या लाखो अनुयायासाठी दीक्षाभूमी परिसरामध्ये स्वच्छतेसह इतर नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. या व्यवस्थेची मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी संयुक्तपणे बुधवारी (ता.०१) पाहणी केली. दीक्षाभूमीवर आलेल्या धम्म बांधवांच्या स्वागतासाठी मनपा पूर्णतः तयार आहे. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी., मुख्य अभियंता श्री. मनोज तालेवार, उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, उपायुक्त श्री. राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता सर्वश्री रवींद्र बुंधाडे, श्रीकांत वाईकर, राजेंद्र राठोड, यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर महानगरपालिकाद्वारे आयटीआय, मध्यवर्ती कारागृह परिसर आणि डॉ. आंबेडकर महाविद्यालय येथे तयार करण्यात आलेले प्रसाधनगृह, स्वच्छतागृह, स्नानगृह आणि निवारा केंद्र इत्यादी व्यवस्थेची पाहणी केली. याशिवाय दीक्षाभूमी मैदानावर उभारण्यात आलेल्या पोलिस नियंत्रण कक्ष, मनपाच्या अग्निशमन नियंत्रण कक्षाला भेट देत सीसीटीव्ही आणि अग्निशमन यंत्र, जनरेटरची स्थिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना दीक्षाभूमी परिसरात उभारण्यात आलेल्या मंडपात दुकानदारांकडून गॅस, शेगडी सारख्या उपकरणाचा वापर होता कामा नये याकरिता उपद्रव शोध पथक आणि अग्निशमन विभागाद्वारे सतत नजर ठेवावी, आवश्यकता भासल्यास सामान जप्त करण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्यांनी दीक्षाभूमी परिसरात गवत कापणीचे काम त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला केल्या.



## महाविद्यालयाला युनिसेफ व महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १ :

युनिसेफ आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील महाविद्यालयांत ग्रीन क्लब ची स्थापना करण्यात आली आहे. त्याअंतर्गत जागतिक जल दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये रिल मेकिंग स्पर्धेत भिवापूर महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला होता. या स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून ग्रीन क्लबच्या समन्वयक सहाय्यक प्राध्यापिका दर्शना धामदर यांना मा. चंद्रकांत दादा पाटील (मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य) तसेच शैलेंद्र देवळणकर (संचालक, उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी सहभागी सर्व विद्यार्थी, समन्वयक तसेच संबंधित प्राध्यापकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. भिवापूर महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

## दुर्गाउत्सव मंडळाची पूरग्रस्तांना ५१ हजाराची मदत

### मुख्यमंत्री सहायता निधी नावाने धनादेश आमदारांकडे सुपूर्द

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १ :

राज्यातील काही जिल्ह्यात पूरपरिस्थिती मुळे उद्धवलेल्या संकटात तेथील शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून डिगडोह परिसरातील सीता नगर आणि वैशाली नगर येथील नवदुर्गा उत्सव मंडळाने संयुक्तपणे ५१ हजार रुपयांचा धनादेश आमदार समीर मेघे यांच्या कडे मुख्यमंत्री सहायता निधीला दिला. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात मागील काही दिवसात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे घरे, गुरे व शेतातील पिके खरडून वाहून गेली. अशा परिस्थितीत त्या



भागातील शेतकरी संकटात सापडला असून त्यांना मदतीचे आवाहन आमदार समीर मेघे यांनी केले होते. सीता नगर व वैशाली नगर या भागातील नवदुर्गा मंडळाचे आयोजक व माजी ग्राम पंचायत सदस्य विनोद ठाकरे यांच्या मार्गदर्शनात काही अनावश्यक खर्चाला कात्री लावून ५१ हजार रुपयांचा निधी उभारण्यात आला. मंगळवारी आमदार समीर मेघे यांनी डिगडोह व परिसरातील दुर्गाउत्सव मंडळांना भेटी दिल्या. ते सीता नगर येथे पोहचल्यानंतर विनोद ठाकरे व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी हा धनादेश आमदार मेघे यांच्याकडे दिला. यावेळी माजी जि प सदस्य अंबादास उके, माजी उपसभापती सुरेश काळबांडे,माजी उपसरपंच कैलाश गिरी, महेश लोखंडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी राजेश बारई,इनेश श्रीवासव,किशोर झाडे,गोलू हारोडे,मनोज क्षीरसागर,गोविन्द कोल्हे,श्रीकृष्ण वैद्य,सतिश कन्हेरकर,प्रीतमलाल कटरे,रणजीत वाल्मीक,रोहन झाडे,महेश उपाध्ये,हरी झाडे,मोनू शर्मा,मंगेश गवई,नरेश हरीनखेडे,राजू मोहीतकर,महेश पटले,बंदी डोंगरे,अविनाश वाल्मिक,बंटी सिरसाम,ज्ञानेश्वर उकले,रवींद्र राजनकर, रमेश भांगे,आकाश वानवे उपस्थित होते

## ऑपरेशन सिंदूर थीमवर ७४ वा दसरा महोत्सव आज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ : धर्मादाय संस्था सनातन धर्म युवक सभा , २ ऑक्टोबर रोजी ऐतिहासिक कस्तुरचंद पार्क येथे ७४ व्या दसरा महोत्सवाचाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि नवीन सादरीकरणे दसऱ्याची शोभा वाढवणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ४ वाजता रावण, कुंभकर्ण आणि मेघनाथ यांच्या महाकाय प्रतिमेच्या पूजनाने होईल. त्यानंतर ढोल ताशा, पंजाबी गटका आणि धार्मिक रॉकसह सांस्कृतिक कार्यक्रमांची मालिका होईल.

कुंभकर्णाच्या वधाचे चित्रण करणारे लाईट अँड साउंड शोचे नृत्यनाट्य हा एक आकर्षण ठरेल. ट्रान्सजेंडर ग्रुप मुद्रा यांचे विशेष सादरीकरण, 'महामाया', अद्वितीय असेल. रावण दहन करण्यापूर्वी, करवतकर बंधूंनी सादर केलेले खुल्या हवेत आतषबाजीचे प्रदर्शन मनमोहक असेल. ऑपरेशन सिंदूर नंतरच्या थीमवर रावण दहन केले जाईल. संस्थेचे नरेंद्र सतीजा यांनी प्रकाशित केलेले 'सनातन समाचार' हे मासिक प्रकाशित केले जाईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार नितीन राऊत विशेष उपस्थिती लावणार आहेत. सूरज अग्रवाल हे पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्ष प्राणनाथ साहनी, दसरा समितीचे अध्यक्ष कपिल साहनी, संरक्षक योगराज साहनी, सरचिटणीस प्रशांत साहनी, खजिनदार विनय ओबेरॉय, माजी अध्यक्ष विजय खेर, उपाध्यक्ष गोपाल साहनी, मिलन साहनी, निर्मल दुदानी, हेमंत साहनी, बलराज साहनी, आशिष साहनी, आशिष साहनी, सुरेंद्र साहनी, विनय ओबेरॉय आदी उपस्थित होते.

## नेशनल टॅलेंट सर्चप्रादेशिक फेरीचे यशस्वी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

द वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिल ऑफ आयसीएआय आणि वेस्टर्न इंडिया चार्टर्ड अकाउंटंट्स स्टुडंट्स असोसिएशन यांनी २८ सप्टेंबर २०२५ रोजी आयसीएआय बीकेसी, मुंबई येथे नेशनल टॅलेंट सर्च च्या प्रादेशिक फेरीचे यशस्वी आयोजन केले. या स्पर्धेत आयसीएआयच्या पश्चिम भारतातील शाखांमधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा येथून उत्साहाने सहभाग घेतला. प्रादेशिक विजेते आता राष्ट्रीय स्तरावर आपल्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतील. स्पर्धांमध्ये स्केचिंग, बुद्धिबळ, नाट्य आणि वाद्य संगीत यांचा समावेश होता, ज्यातून भावी चार्टर्ड अकाउंटंट्सची सर्जनशीलता, प्रतिभा आणि बहुमुखी कौशल्ये प्रकट झाली. कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला मान्यवर पाहुण्यांची



उपस्थिती होती: कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सहाय्यक आयुक्त, बीएमसी मृदुला आंडे, विशिष्ट अतिथी प्रो. सीए डॉ.महादेव साहेबराव जाधव, सदस्य, बोर्ड ऑफ स्टडीज (अकॅडेमिक), आयसीएआय व प्रॅक्टिसिंग चार्टर्ड अकाउंटंट सीए केतन सैया, अध्यक्ष, ऑफ आयसीएआय ,सीए जितेंद्र सागलानी, अध्यक्ष, मुख्य अतिथी मृदुला आंडे यांनी आपल्या भाषणात सहशालेय उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी किती महत्त्वाचे आहेत हे अधोरेखित केले. विशिष्ट अतिथी प्रो. सीए डॉ. महादेव साहेबराव जाधव यांनी आयसीएआयच्या या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण प्रतिभेला चालना मिळते असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने उत्कृष्टतेच्या शुभेच्छा दिल्या व स्वतःवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. अध्यक्ष सीए केतन सैया यांनी अशा व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होतात असे सांगितले. अध्यक्ष सीए जितेंद्र सागलानी यांनीही स्पर्धकांना प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचा समारोप विजेत्यांच्या घोषणेसह झाला, जे आता राष्ट्रीय स्तरावर पुढे जाण्यास सज्ज झाले आहेत. या उपक्रमातून पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले की आयसीएआय आपल्या विद्यार्थ्यांमध्ये केवळ शैक्षणिक उत्कृष्टताच नव्हे तर सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासालाही प्रोत्साहन देण्यास कटिबद्ध आहे.




## सप्तमीला पारंपरिक वेशभूषेत स्त्रियांची उत्स्फूर्त सहभागिता

हिंगणा तालुक्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत नवरात्री उत्सव साजरा करताना सप्तमीच्या निमित्ताने महिलांनी जांभळ्या रंगाची पारंपरिक साड्या परिधान करून विशेष आकर्षण निर्माण केले. श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक जतनाचा संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला. महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय व मंगलमय झाले.

## वागदरा येथे वृक्षारोपण उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १ :

सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वागदरा येथील सार्वजनिक क्रीडा व सांस्कृतिक बहुद्देशीय मंडळ व ग्रामपंचायत वागदरा यांच्या सहकार्याने यंदाच्या नवरात्री महोत्सवात एक आगळावेगळा उपक्रम हाती घेतला. पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच मंडळाने भव्य वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला. कार्यक्रमात ग्रामपंचायत वागदरा सरपंच शोभाताई माहुरे, ग्रा.वि. अधिकारी राजीव ठाकरे, मंडळाचे माजी अध्यक्ष विजय ढवळे, सेवानिवृत्त शिक्षक अशोक ढोमणे, मंडळाचे सचिव रामकृष्ण हेडाऊ, राजीव माहुरे, देवानंद घोडे, सुनील पडवे, एकनाथ गंडे, पत्रकार नामदेवराव आमनेरकर, सहसचिव निरंजन चामाटे, आदित्य ढोले, निलेश आमनेरकर, चंद्रशेखर हुलके, दिलीप सहभागी झाले. मंडळाचे यावर्षीचे ३९ वे नवरात्री वर्ष विशेष ठरले आहे. बदलत्या हवामानामुळे वाढत चाललेले दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा यांसारख्या समस्यांचा विचार करून मंडळाने वृक्षारोपणाचा मार्ग निवडला. गाव परिसरात विविध छायादार व फळझाडे लावण्यात आली. भविष्यात या वृक्षांची देखभाल करण्यासाठी मंडळातील कार्यकर्त्यांनी जबाबदारी स्वीकारली.

कार्यक्रमात बोलताना सरपंच शोभाताई माहुरे म्हणाल्या की, आजची पिढी जर पर्यावरण संवर्धनाकडे गांभीर्याने लक्ष देईल तर उद्याच्या पिढ्यांना स्वच्छ हवा, पाणी व हिरवाई मिळेल.

तर मंडळाचे सचिव रामकृष्ण हेडाऊ यांनी वृक्षारोपण ही फक्त औपचारिकता नसून प्रत्येक झाडाची निगा राखणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगितले. नवरात्री महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गावातील तरुणाई व नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल सकारात्मक संदेश पोहोचला असून आगामी काळात वागदरा गाव 'हरित वागदरा' या उपक्रमाद्वारे ओळखले जाईल, अशी अपेक्षा ग्रा.वि. अधिकारी राजीव ठाकरे यांनी व्यक्त केली.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सामुहिक बुध्द वंदना

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १ :

युवक जागृती मंडळ व सुधाकर बागडे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त गुरुवार दिनांक २ आक्टोबर २०२५ रोज सकाळी दहा वाजता सावनेर बसस्थानक जवळील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा येथे भंते शिलरक्षीत महाथेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत सामुहिक बुध्द वंदना व माल्यार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी भाजप नेते रामराव मोवाडे राहतील यावेळी माजी सिव्हिल सर्जन डॉ चंदकांत मानकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बाबाराव पाटील माजी नगराध्यक्ष अँड अरविंद लोधी, उपस्थित राहतील उपरोक्त मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक सुधाकर बागडे यांनी केले आहे.

## धापेवाडा येथे नवरात्र उत्सव साजरा

**कळमेश्वर :** धापेवाडा येथे विदर्भ पंढरी म्हणुन ओळख असलेल्या धापेवाडा येथे तरूण उत्साही दुर्गा मंडळ धापेवाडा (खुर्द) येथे ७५ वर्ष नवरात्री उत्सवाला प्रारंभ झाला.२२ सप्टेंबर घट स्थापना झाली. मंडळाचे ७५ वे वर्ष असल्यामुळे विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्या जात आहे रोज संध्याकाळी ७ ला आरती नंतर महिला, युवक , युवती, गरबा व दांडिया खेळत असल्यामुळे धापेवाडा खुर्द येथे भक्तिमय वातावरण निर्माण निर्माण झाले आहे. मंगळवार (ता ३०)अष्टमीला अभिषेक, हवन सायंकाळी ६ वाजता महाआरती झाल्यानंतर लगेच महाप्रसाद कार्यक्रम आणि रात्री ७ ते १० पर्यंत जसचा कार्यक्रम आयोजीत केला आहे.

विसर्जन मिरवणूक शुक्रवारी (ता.३) सांध्यकाळी ६ वाजता करण्यात येईल.

## आज सावनेर येथे भव्य दसरा मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १ :

आमदार डॉ आशिषराव देशमुख यांची भूमिका व मनोगतावर सर्वांचे लक्ष. भारतीय संस्कृतीत प्राक्रमाचे प्रतिकपर्व असलेल्या विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाला भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी, महाराष्ट्रद्वारे आमदार डॉ आशिषराव देशमुख यांच्या नेतृत्वात गुरुवार, दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नगर परिषद ग्राउंड, सावनेर येथे भव्य दसरा मेळावा आयोजित करण्यात येत आहे.

सध्याची राजकीय परिस्थिती, राज्यातील घडामोडी, नागपूर जिल्ह्यातील राजकारणाची दिशा, सावनेर नवनिर्माण, सावनेर-कळमेश्वर क्षेत्राचा विकास अशा अनेक विषयांवर आमदार डॉ



आशिषराव देशमुख आपले प्रखर विचार मांडतील. विकासाचे राजकारण केल्यास सर्व समाजाचे भले होणार, अशी त्यांची भूमिका आहे.

जनतेने डॉ आशिषराव देशमुख यांना भरघोस मतांनी निवडून दिले. आतापर्यंत त्यांची कामगिरी दमदार असल्याची पावती जनतेनी दिली आहे. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ न देता त्यांनी विकासाचा झपाटा लावला आहे. त्यामुळे, आमदार डॉ आशिषराव देशमुख याप्रसंगी काय भूमिका, विचार मांडतील यावर सर्वांचं लक्ष लागले आहे.

याप्रसंगी डॉ राजीव पोतदार (भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य), मनोहरजी कुंभारे (जिल्हाध्यक्ष, काटोल, नागपूर), रामराव मोवाडे (जिल्हा उपाध्यक्ष भाजपा), मंदार मंगळे (सावनेर शहर मंडळ अध्यक्ष), तेजस्विनी लाड (सावनेर शहर महामंत्री), रितेश सूर्यवंशी (महामंत्री, सावनेर शहर) यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

तरी नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने या भव्य दसरा मेळाव्यास उपस्थित राहून या सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# वाडीतील स्मृती नगरात मॉ भगवती जागरण सोहळा

## आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत महाआरती

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १ :** येथील स्मृती नगरातील स्मृती दुर्गा उत्सव मंडळातर्फे घटस्थापनेपासून विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असुन आमदार समीर मेघे , माजी नगराध्यक्ष प्रेमनाथ झाडे,यांच्या हस्ते माजी नगरसेविका सरीता यादव यांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष हिम्मत घडेकर,उपाध्यक्ष अतुल सुरकर, सहसचिव राजु वागंद्रे,



विक्की भुडे,सुभाष भोयर, स्वप्निल काळे,किशोर किनेकर, महेश चौधरी ,अनिल डोंगरे, वैभव भुडे, आशिष चौधरी, प्रणय खराबे, निकेतन मालोदे, महेश वड्डे, निखील पारिसे, निशांत भुसारी, अंकुश वंजारी, आदित्य उमाळे, प्रफुल राऊत, मुकूल राऊत, अक्षय मालोदे, अक्षय पांडे, पंकज खाडे, पवन खाडे, अक्षय ठाकरे, निलेश लाडे आरती समिती आयोजक कमलाकर बारस्कर, आकाश ब्रम्हे, भिमा पवार, राजेश रावंधे, साहेबराव रावंधे, गोपाल रावंधे, योगेश झरबडे, अनिकेत बारस्कर , राजीव मुंगारे , भुषण रोकडे आदी प्रयत्नशील आहे.

# नवेगाव खैरी येथे इको क्लब द्वारा जनजागृती रॅली



■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १ :** राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ट कला महाविद्यालय नवेगाव खैरी द्वारा संचालित इको क्लब व वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय (सामाजिक वनीकरण व प्रादेशिक) पारशिवनी यांचे संयुक्त विद्यमाने नवेगाव खैरी परिसरात वन्यजीव सप्ताहांतर्गत १ ऑक्टोबरला वन्यजीव जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी इको क्लबच्या निसर्गदुतांनी पायदळ व सायकल रॅलीच्या माध्यमातून परिसरात जनजागृती केली. रॅली दरम्यान वन्यजीवांना मारू नका, वाघाची हत्या करू नका, कावळा करतो काव काव, एक तरी झाड लाव, वन्यजीवांना वाचवा, पृथ्वीचे रक्षण कराङ्क अशा पर्यावरणपूरक घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला. वाघ आणि अस्वलाच्या वेशातील मुलांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक राजू बर्वे, प्रमुख पाहुणे वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर कैलुके, क्षेत्र सहाय्यक उदय मोरे (प्रादेशिक), इको क्लब समन्वयक शिक्षक साक्षोधन कडबे यांनी आपल्या मार्गदर्शनातून उपस्थितांना अन्नसाखळीतील वन्यजीवांचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमाला गस्तीपथक वनपाल जगदीश चवरे (प्रादेशिक), वनपाल अनिल राठोड (सामा. वनी.), शाळेचे प्रा. अरविंद दुनेदार, अनिल कोल्हे, दिलीप पवार, प्रशांत पोकळे, सतीश जुननकर, रितेश मैंद, साक्षी सहारे, वनरक्षक कांचन गजभिये, वन कर्मचारी सूरज चोपडा, मनोहर शेंडे, बाळकृष्ण ढोके, गजानन ढोंगे, शालेय कर्मचारी गोविंद कोठेकर, लिलाधर तांदूळकर, मोरेश्वर दुनेदार, राशिद शेख यांनी सहकार्य केले. वृक्षदिंडीमध्ये इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# तिडके महाविद्यालयात फिरते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १ :** रामटेक येथील श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालय विभाग आणि भारत सरकारच्या नॅशनल बुक ट्रस्ट तथा झिरो माइल युवा प्रतिष्ठान द्वारा राष्ट्रीय स्तरावर आयोजित नागपूर पुस्तक महोत्सव २०२५ अभियानांतर्गत दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी एका विशेष बस द्वारे महाविद्यालयातील प्रांगणात फिरते ग्रंथप्रदर्शन उपक्रम राबविण्यात आले. यावेळी प्रदर्शनाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे यांच्या शुभहस्ते फीत कापून रीतसर उद्घाटन प्रामुख्याने डॉ. मनोज तेलरांधे, डॉ. दिलीप कुमार जेना, डॉ. श्रीकांत भोवते, प्रा.सुनील कठाणे, प्रा.अमरीश ठाकरे, प्रा. गजानन रेवतकर, डॉ. स्वप्निल मनघे,प्रा.रुपेश हाताग्रे, प्रा.कल्याणी टक्कामोरे, प्रा.अश्विनी डाखोरे, प्रा.आकाश मोहबिया आदींच्या उपस्थितीत पार पडले. या उपक्रमाचे संयोजक म्हणून ईश्वर व अन्य मंडळीने काम पाहिले.सूत्रसंचालन तथा आभार प्रा. संतोष जाधव यांनी केले. यामध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यांना अनेक प्रकारचं उत्तम पुस्तकं पाहण्याची संधी मिळाली. या प्रदर्शनात पाचशेपेक्षा अधिक विविध प्रकारचे बालसाहित्य, कला, साहित्य, विज्ञान, शैक्षणिक, ऐतिहासिक,चरित्र आत्मचरित्र व प्रेरणादायी वैचारिक पुस्तकांची उत्सुकतेने पाहणी करून आवडीच्या पुस्तकांची निवड करून खरेदी केली. यावेळी नागपूर पुस्तक महोत्सव २०२५ बॅनरचे प्राचार्य व उपस्थित प्राध्यापक यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.उपक्रमामुळे वाचनाची आवड प्रबळ झाली असून भविष्यात ग्रंथप्रदर्शनचे आयोजन करण्यात येईल असे आश्वासन महाविद्यालयाकडून देण्यात आले.

# माऊली नगरमध्ये होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १ :** येथील माऊली नगर युवा मंचाच्या वतीने रविवार२८ सप्टेंबर रोजी दुर्गा माता मंदिर प्रांगणात होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेत जया सोनवणे ,अश्विनी साहू, पुष्पा कोरे ,प्रतिभा कोरे,कृतिशा भिवगडे,रुद्र रंगारी,शिवानी गुप्ता, अनु शर्मा , युगांधरा देकापुरवार, रुपाली चरडे , नेहा रबडे यांनी विजेता घोषीत करुन त्यांना बक्षिस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रावनीत कौर यांनी केले. या उपक्रमाचे आयोजन श्री कृष्णा फाउंडेशनच्या सौजन्याने पार पडले. कार्यक्रमाला शिवनारायण पवार, गणपत सरोदे, गणेश इंगळे, अरुण अंबरते, उत्तम बोबडे, दामोधर जोध, अनिल कोरडे, राहुल कोरे उपस्थित होते. आयोजनासाठी श्री कृष्णा फाउंडेशनचे राजेश गिरी, मदन गोहणे, विकी पाठक,राहुल ठाकरे यांनी सहकार्य केले.

# आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
**भिवापूर, दि. १ :** भिवापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र नांद अंतर्गत ऍलोपॅथिक डिस्पेंसरी बेसूर येथे आरोग्य तपासणी व रक्त दान शिबिराचे आयोजन ३० सप्टेंबरला करण्यात आले होते. या शिबिरात २३२ रुग्णांची विविध बाबींसाठी तपासणी करण्यात आली, शिबिरात गरोदर पीसी-सी माता, यांना समुपदेशन करण्यात आले, लहान मुलांची



अशक्तपणा, कुपोषण तपासणी करण्यात आली. दंत तपासणी, केअर हॉस्पिटल नागपूरच्या हृदयरोग पथकाने रुग्णांची तपासणी केली व ईसीजी घेण्यात आले,सिकलसेल, थॅलेसेमियासाठी विशेष तपासणी करण्यात आली, याशिवाय मधुमेह, उच्च रक्तदाब, तोंडाचा कर्करोग, गर्भाशय कर्करोग आणि स्तनचा कर्करोग, टीबी इत्यादी अनेक तपासण्या शिबिरात करण्यात आल्या. तर मेडीकल कॉलेज नागपूर रक्तपेठी ने रक्त संकलन केले . शिबिराचे उदघाटन सरपंच रवींद्र राऊत, उपसरपंच तेजराम सेलोटे, ग्रामपंचायत अधिकारी सुरेश भुरे हस्ते करण्यात आले.

शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. संकेत काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका वाघमारे(बेसूर) , डॉ. अश्विनी पवार , हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अल्फाहाद केअर हास्पिटल नागपूर, डॉ गौरव उपासे दंतवैद्य उमरेड, यांनी तपासणी केली. तर नागपूर मेडीकल कॉलेज नागपूर रक्तपेठी ने रक्त संकलन केले.

# ५४२ रुग्णांनी घेतला नि:शुल्क शिबिराचा लाभ

## २०० गरजूंना व्यक्तींना चष्मे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
**सावनेर, दि. १ :** नवरात्रीचा पावन पर्वावर स्थनिक श्री संत सीताराम महाराज देवस्थान येथे इंडियन मेडिकल असोसिएशन, निमा असोसिएशन, होमियोप्याथी असोसिएशन, व केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन सावनेर यांचा संयुक्त विद्यमाने एक दिवसिय नि:शुल्क रोगनिदान शिबिराचे आयोजन श्री संत सीताराम महाराज मंड व नवरात्र उत्सव मंडळ यांच्या वतीने करण्यात आले. या शिबिरात शुगर तपासणी, ईसीजी, दमाची तपासणी तसेच छातीचा ऐक्सरे करून ५४२ रुगांनी शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाची सुरवात उपस्थित मान्यवरांचा हस्ते दिप प्रजवलन करून श्री संत सीताराम महाराज देवस्थान कमिटीचे उपाध्यक्ष स्व. भालचंद्रजी पाटील यांना श्रद्धांजली देऊन सुरवात झाली. या प्रसंगी, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोक घटे, प्रमुख पाहुणे इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष परेश झोपे उपाध्यक्ष डॉ अमित बाहेती,सचिव डॉ. प्रवीण चव्हाण, कोशाध्यक्ष डॉ. शिवम पुण्याणी, निमा असोसिएशनचे अध्यक्ष छत्रपती मानापुरे, होमियोप्याप्याथी



असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.राहुल दाते , डॉ.निनाने, डॉ. संजय दोरखंडे, डॉ.लाकडे,डॉ. काळे, डॉ. काळे मॅडम, डॉ. भगत,केमिस्ट ड्रगिस्टचे अध्यक्ष रविकांत पाटील, सीताराम महाराज देवस्थान कमिटीचे अध्यक्ष मनोहर फाये, सचिव शंकरभाऊ आगलावे, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष मदन पाटील, पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दिपक कटारे, व तालुका शिवसेना प्रमुख उत्तम कापसे, महात्मा फुले पथसंस्थेचे अध्यक्ष किशोर चांदूरकर सर, प्रामुख्याने उपस्थित होते. शिबिराचा सुरवातीपासूनच रुणाची गर्दी उसलून आली. शिबिरात डॉ अशोकराव घटे, डॉ.अमित बाहेती, डॉ.शिवम पुण्यानी तसेच केमिस्ट ड्रगीस्टचे अध्यक्ष रविकांत पाटील, जयंत पाटील यांनी संपूर्ण औषधी उपलब्ध करून ,,योगेश इंगळे, विक्रम आचार्य, बिलास उमाटे, कमल चौधरी, स्वप्नील चांदुरकर, रितेश मोहतुरे, सतीश बनकर, कृनाल धपके,रवी बोंडे, मोनू जैन, नितेश आलोंकर, जनकराम जुनघरे, किशोर वाकोडे, नाना मेटकर यांनी औषधी बाटपात मदत केली.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सामुहिक बुध्द वंदनेचे आयोजन

**सावनेर :** युवक जागृती मंडळ व सुधाकर बागडे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त गुरुवार दिनांक २ आक्टोबर २०२५ रोज सकाळी दहा वाजता सावनेर बसस्थानक जवळील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा येथे भंते शिलरक्षीत महाथेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत सामुहिक बुध्द वंदना व माल्यार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी भाजप नेते रामराव मोवाडे राहतील
यावेळी माजी सिव्हिल सर्जन डॉ चंदकांत मानकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बाबाराव पाटील माजी नगराध्यक्ष अँड अरविंद लोधी, उपस्थित राहतील उपरोक्त मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक सुधाकर बागडे यांनी केले आहे.

# भिवापूर महाविद्यालयातर्फे औद्योगिक सहलीचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी
**भिवापूर, दि. १ :** भिवापूर महाविद्यालय, वतीने प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी नागपूर बुटीबोरी औद्योगिक वसाहतीमधिल विविध उद्योगांना भेट देण्यासाठी एक दिवसिय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आलेले होते. या सहलीमध्ये महाविद्यालयातील सांस्कृतिक समिती, अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य विभाग, इतिहास विभाग, भौतिकशास्त्र विभाग आणि क्रीडा विभागाने सहभाग घेतला होता. या सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना उद्योग प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याचा आणि औद्योगिक ज्ञान मिळवण्यासोबतच उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण, विपणन व कामगार व्यवस्थापन याबाबत सविस्तर माहिती प्राप्त करण्याचा होता.

यासंगी औद्योगिक वसाहतीमधिल व्यवस्थापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कंपनिचे उत्पादन, प्रक्रीया, वितरण व मार्केटींग प्रक्रीया यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी सुध्दा उत्साहाने प्रश्न विचारले आणि औद्योगिक क्षेत्रातील वास्तव अनुभवले. ही औद्योगिक सहल विद्यार्थ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी व माहितीपूर्ण ठरली. त्यांना प्रत्यक्ष उद्योजगतातील प्रक्रिया समजल्या आणि भविष्यातील करिअरसाठी दिशा मिळाली. सहलीमध्ये डॉ. सुनिल शिंदे, डॉ. मोतिराज चव्हाण, डॉ. राजेश बहुरुपी, डॉ. आदित्य सारवे, डॉ. योगेश मोरे आणि ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. सहलीच्या यशस्वीततेसाठी गोपाल कुडेवाले, निखिल वावरे, आदित्य शेंडे, अभिशेख चांभारे यांनी सहकार्य केले.



# नवदुर्गा महिला मंडळाचा नवरात्रोत्सव उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १ :** दत्तवाडीतील मंगलधाम सोसायटी ,रामकृष्णनगरमधील नवदुर्गा महिला मंडळाचा नवरात्रोत्सव उत्साहात सुरु आहे. आयोजनासाठी सुमारी भगत, सुषमा गौर,शिला अहिरवार, विजया तिजारे, प्रतिभा नानोटकर ,सुनिता मुडेले , संगीता फ्रान्सिस,संगीता निंबर्ते, सिमा कनोजे, वंदना धकाते,वंदना भंगोडे, अर्चना कोसे, ममता राऊत , शितल पिल्ले, ज्योत्सना सोनवने, माधुरी नाकाडे, स्नेहा मस्के, प्रिया अन्नपुर्णे प्रयत्नरत आहे. यावेळी कमल कनोजे, नरेंद्र नानोटकर ,योगेश राऊत ,प्रशांत मस्के , सुबोध शर्मा, नितिन अन्नपुर्णे निलेश पारधी , अशोक तिवारी ,विक्रम तिजारे,बबलू सिंह,जेम्स फ्रान्सिस ,अशोक धकाते,संजय कोसे,सागर बर्मा,धिरज पिल्ले,पंकज सोनवने, राजु पहुरकर ,सुनिल रोकडे,देवा खाटीक ,निलेश उघडे ,अरुण घोटे,अस्थाण, सुशील अहिरवार,मोनु नायकवाड रमेश लांडे उपस्थित होते.

# डॉ. अंशुजा किंमतकर व लक्ष्मी म्हात्रे यांचा भारत भ्रमणाला शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १ :** सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असलेल्या डॉ. अंशुजा किंमतकर व सौ. लक्ष्मी म्हात्रे या दोघींनी दि.१ ऑक्टोबर २०२५ ला सकाळी ८ वाजता रामटेक येथील गांधी चौकातून दोन महिन्यांच्या भारत भ्रमणासाठी प्रस्थान केले.

या प्रसंगी महाराष्ट्राचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल व सौ. पल्लवी जयस्वाल यांनी डॉ.अंशुजा किंमतकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत हिरवी झेंडी दाखवून या प्रवासाला शुभारंभ केला.

कार्यक्रमाला परमात्मा एक आनंदधाम चे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मणराव (बाबूजी) मेहर, माजी नगराध्यक्ष नलिनीताई चौधरी,सृष्टी सौंदर्य बहुद्देशीय संस्था चे अध्यक्ष ऋषीकेश किंमतकर,माजी सभापती बिकेंद्र महाजन,माजी नगरसेवक अनिल वाघमारे, विश्वास पाटील, शिवसेना तालुका महिला आघाडी प्रमुख रश्मीताई काठीकर, शारदा इंदोरकर,युवासेना शहर प्रमुख सौरभ सिंगनजुडे, दिपक गिरधर, राजु कापसे, राहुल गुंधरे, ज्योती पडोळे, लता कामडे, शोभा अडामे, सुरेखा माकडे, राहुल शर्मा, सृष्टी सौंदर्य बहुद्देशीय संस्था, मातृका फाउंडेशन यांचे सदस्य सह रामटेक येथील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. किंमतकर व म्हात्रे यांच्या या प्रवासामुळे सामाजिक जाणीवा अधिक बळकट होतील आणि 'भारत दर्शन' च्या माध्यमातून विविध संस्कृती, परंपरा व समाजकार्यातील अनुभव त्यांना लाभतील, असा विश्वास राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यावेळी व्यक्त केले.

# 'लोकरंग कलाश्रृंगार गृह, सावनेर' यांच्या वतीन नवरात्रीनिमित्त लोकरंग गरबा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
**सावनेर, दि. १ :** 'लोकरंग कलाश्रृंगार गृह, सावनेर' यांच्या वतीने नवरात्रीनिमित्त लोकरंग गरबा महोत्सव २०२५ चे ८ वे पर्व तसेच समूह गरबा स्पर्धा बालाजी लॉन, सावनेर येथे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमात खुल्या गरबा स्पर्धा आणि समूह गरबा स्पर्धांचा समावेश होता, ज्यात महिला, बालक आणि पुरुष कलाकारांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमासाठी भाजपा जि.ग्रा. सचिव रामराव मोवाडे, माजी नगरसेवक राजु घुगल, विद्या प्रसारक मंडळाचे संचालक यशपाल डाहाके व्हॉईस ऑफ मीडियाचे नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे, व्हॉईस ऑफ मीडिया जिल्हाकार्यकारिणी सदस्य व पत्रकार राहुल सावजी, तसेच सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सावनेरवाला वरुण खुरसुंगे आणि ट्रेंडिंग सावजी यांची विशेष उपस्थिती लाभली. विविध कलाकारांनी या महोत्सवात आपल्या कलेचे प्रदर्शन केले. तसेच खुला गरबा आणि समूह गरबा स्पर्धांमध्ये अनेक कलाकारांनी उत्कृष्ट गरबा सादर केला. याप्रसंगी विशेष प्रस्तुती म्हणून 'नृत्यअरंगम सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स'च्या परिनीता ठाकरे, आरोही जांगडे, केशवी पांडे, गार्गी पिसे, शामिली



जांगडे,कार्तिकी धोटे, व पोर्णिमा वायकोले यांनी भरतनाट्यम शास्त्रीय नृत्यशैलीत अम्बा स्तुती सादर केली.

प्रसिद्ध कथ्थक नृत्य कलाकार गुरु कुशल भट्टाचार्य यांनी कथ्थक नृत्य प्रकारात जगत जननी स्तुती आणि झपताल सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'लोकरंग महिला कला मंच'च्या नमिता इलमकर, संगीता डोंगरे, पायल सूर्यवंशी,कविता सूर्यवंशी, कामीनी माडेकर, ममता पवार,भारती जांगडे,वैष्णवी परिहार यांनी तमिळनाडू राज्यातील 'कुम्मीअट्टम' लोकनृत्य सादर केले. यासोबतच 'शिवार लोककला सामाजिक व सांस्कृतिक संस्था'च्या कलाकारांनी गोवा राज्यातील पारंपरिक 'दीवली' लोकनृत्याची मनमोहक प्रस्तुती दिली. समूह गरबा स्पर्धांमध्ये 'डान्सिंग मिस्ट डब्लू.सी.एल गरबा ग्रुप', 'जगदंब गरबा ग्रुप' व 'प्रारंभ गरबा ग्रुप' यांनी सहभाग घेऊन उत्तम सादरीकरण केले. या वर्षीच्या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते 'लोकरंग कलाभूषण नृत्य आचार्य सन्मान २०२५' पुरस्कार. या पुरस्काराने कोलकाता येथील प्रसिद्ध कथ्थक नृत्य कलाकार गुरु कुशल भट्टाचार्य आणि शिवार लोककला सामाजिक व सांस्कृतिक संस्था, नागपूरचे संचालक सचिन श्यामराव दाभनेकर यांना 'लोकरंग कलाश्रृंगार गृह' टीम आणि मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला परीक्षक म्हणून 'नृत्यअरंगम सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स'चे संचालक ऋषिकेश पोहनकर आणि पाश्चात्त्य नृत्य कलाकार व गरबा प्रशिक्षक रजत सोनुले यांची उपस्थिती लाभली. तसेच विशेष प्रस्तुतिकार म्हणून प्रसिद्ध कथ्थक नृत्य कलाकार गुरु कुशल भट्टाचार्य 'शिवार लोककला सामाजिक व सांस्कृतिक संस्था'चे प्रसिद्ध लोकनृत्य व लोककला कलाकार सचिन दाभनेकर, रविंद्र राजुरकर, सतीश भूरसे यांची उपस्थिती होती. सर्व सहभागी आणि उत्तम प्रदर्शन करणाऱ्या कलाकारांना प्रमाणपत्र व आकर्षक बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. यामध्ये बेस्ट ट्रेडिशनल वेशभूषा, बेस्ट दांडिया प्लेयर, बेस्ट एनर्जी टिक गरबा प्लेयर, बेस्ट युनिक ट्रेडिशनल लूक अशा विविध श्रेणींचा समावेश होता. विशेष प्रस्तुतीकारांना प्रमाणपत्र, भेटवस्तू व रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन पत्रकार एकता भेलोंडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन लोकरंग कलाश्रृंगार गृहच्या मीनाक्षी गजभिये, योगिता घोरमारे,सुवर्णा भगत, आकाश बरवड यांनी केले. या आयोजनासाठी नमिता इलमकर, संगीता डोंगरे, पायल सूर्यवंशी,कामिनी माडेकर, ममता पवार, भारती जांगडे यांच्यासह नंदराज डेकोरेशन, राजु वैद्य, ए.आर फोटो स्टुडिओ, दीपक राजगिरे, वैष्णवी परिहार, पूर्वा चौहान, अनिकेत ढाले, जनार्दन बरवड व चंदन बरवड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## नागपुरात येताच माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद पोहचले

# आरएसएस संस्थापक हेडगेवारांच्या घरी






*माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी हेडगेवार यांच्या घरी पाळण्यावर बसण्याचा आनंद घेतला. दीक्षाभूमी येथे भेट देत त्यांनी बुद्धांच्या प्रतिमेसमोर माल्यार्पण करीत अभिवादन केले.*

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

२ ऑक्टोबर रोजी संघाचा विजयादशमी उत्सव रेशीमबाग मैदानावर होणार आहे. त्या उत्सवापासून २०२६ च्या विजयादशमी उत्सवापर्यंत संघाचे शताब्दी वर्षानिमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. या पार्श्वभूमीवर यंदाचा उत्सव संघाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मुख्य म्हणजे आजवरचा इतिहास पाहता विजयादशमी उत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणारे रामनाथ कोविंद हे पहिलेच माजी राष्ट्रपती आहेत.

बुधवारी सायंकाळी त्यांचे नागपूर मध्ये आगमन झाले असून त्यानंतर रामनाथ कोविंद यांनी संघाचे पहिले सरसंचालक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांच्या महाल परिसरातील घराला भेट दिली. या ऐतिहासिक वास्तूचे दर्शन घेत त्यांनी येथे असलेल्या झोपाळ्यावरही बसण्याचा आनंद घेतला.

संघाच्या रचनेमध्ये विजयादशमी उत्सवाला महत्त्वाचे स्थान आहे. या दिवशी रेशीमबागहून सरसंघचालक काय बोलतात याकडे संपूर्ण जगाचे लक्ष असते. गेल्या काही वर्षांमध्ये सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या भाषणातून अनेक ज्वलंत मुद्यांना हात घातला आहे. संघाचे शताब्दी वर्ष पाहता सरसंघचालक भागवत कोणत्या मुद्यांना स्पर्श करणार याबाबत उत्सुकता आहे.

संघाने शताब्दी पंच परिवर्तनावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये स्वबोध, पर्यावरण, सामाजिक समरसता, नागरिक शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन यांचा समावेश आहे. वर्षभर या पाच मुद्यांवर प्रबोधनपर कार्यक्रम होणार आहेत.

संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी दिलेल्या सामाजिक समरसतेचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यावर शताब्दी वर्षात विशेष भर राहणार आहे. यासाठी खंडस्तरावर सामाजिक सद्भाव बैठका होणार आहेत. संघ हा काही विशिष्ट जातींपुरता मर्यादित असल्याची टीका वारंवार झाली आहे.

त्याला प्रत्युत्तर म्हणून संघ सर्वसमावेशक तसेच सामाजिक समरसता मानणारा असल्याचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात येत आहे. त्याच श्रृंखलेत आता सामाजिक सद्भाव बैठका घेऊन समरसतेचा संदेश सर्वांपर्यंत पोहचविण्यात येणार आहे. अशात कोविंद यांना बोलावून प्रत्यक्ष कृतीतून संघाने समरसतेचा संदेश दिल्याची चर्चा आहे.

## हिंदू रिसर्च फाउंडेशनतर्फे ५ ला

# अनेक मान्यवरांचा सत्कार



**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १ :**
विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना हिंदू रिसर्च फाउंडेशनच्यावतिने एका विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणार आहे . कवी कुलगुरू, कालिदास सभागृह, परसिस्टन्स आय.टी पार्क, नागपूर, येथे रविवार ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होईल.

या कार्यक्रमालो मुख्य अतिथी म्हणून श्रीमहर्षी रिसर्च इन्स्टिट्यूट ऑफ वैदिक टेक्नॉलॉजी गुंटूर आंध्र प्रदेशचे संस्थापक व संचालक वेदश्री. ए. बी. एस. शास्त्री, माजी कुलगुरू डॉ. वेद प्रकाश मिश्रा यांच्यासह इतर मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

एक लाख रुपये रोख, सन्मान पत्र, सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप असून, सात सत्कारमूर्तींना सन्मान पूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती हिंदू रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त अशोक एस, शिंदे, जे. बी. पाटील, प्रमोद नांदगावकर, ज्ञानदीप पाटील, तुषार भाल, योगेश गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हिंदू रिसर्च फाउंडेशनच्या वतीने आतापर्यंत ७५ विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवणारे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर, मंगळावर गेलेल्या मंगळयान इंजिनाचे निर्माते पद्मभूषण श्री एस. नंबीनारायण, रेल मॅन पद्मविभूषण डॉ. इ. श्रीधरण, भारतरत्न डॉ. सी.एन.आर.राव, पद्मविभूषण डॉ. के. कस्तुरीरंजन, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, पद्मभूषण डॉ. विजय भाटकर, पद्मभूषण डॉ.एस.एल. भैरप्पा, पद्मश्री डॉ. गणपती यादव, डॉ. अनमोल सोनवणे, महाकवी सुधाकर गायधनी, पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर, पद्मश्री एस अरुण, अयोध्या राम मंदिरसारख्या अनेक मंदीराचे निर्माति सी बी सोमपुरा, आकाशतज्ञ मोहित जोशी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत . या उपक्रमांना रेड स्वस्तिक सोसायटी, विश्व मांगल्य सभा, मैत्री परिवार संस्था यांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचे आयोजकांनी पत्रपरिषदेत सांगितले.

## तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी...






**■ नागपूर :** जगभरातील बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असलेली नागपूरची दीक्षाभूमी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त फुलून गेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्धाच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होत येथे येणारे अनुयायी सोबत घेवून जातात ते सर्वांना समान अधिकार बहाल करणारे या देशाचे संविधान.

### आरएसएसच्या कार्यक्रमामुळे

## वाहतूक व्यवस्थेत बदल

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर,दि.१ :**
२ ऑक्टोबर २०२४ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) विजयादशमी आणि शताब्दी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत.

रेशीमबाग मैदानावर होणाऱ्या या कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांसह स्वयंसेवक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे, नागपूर वाहतूक पोलिसांनी सकाळी ६ वाजतापासून कार्यक्रम संपेपर्यंत वाहतूक मार्गांमध्ये तात्पुरते बदल जाहीर केले आहेत.

२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजतापासून कार्यक्रम संपेपर्यंत वाहतुकीचे मार्ग बदलण्यात आले आहेत. वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भंडारा रोडने जगनाडे चौकातून येणारी वाहतूक ग्रेट नाग रोड, अप्सरा चौक, वैद्यनाथ चौक, तुकडोजी पुतळा चौक, मेडिकल चौकमार्गे वळविण्यात येईल. उमरेड रोडने सक्करदरा चौक, अशोक चौकातून येणारी वाहतूक भांडे प्लॉट चौक, छोटा ताजबाग, तुकडोजी पुतळा चौक, मेडिकल चौकमार्गे वळविण्यात येईल.

तसेच सरदार पटेल चौकातून बैद्यनाथ चौक, अशोक चौकातून जगनाडे आणि उमरेड रोडने जाणारी वाहतूक बैद्यनाथ चौक ते मेडिकल चौक, तुकडोजी पुतळा चौक, छोटा ताज बाग, भांडे प्लॉट चौक आणि जगनाडे चौकमार्गे जाईल. वाहतूक पोलिसांकडून सर्व वाहन मालकांना गैरसोय टाळण्याचे आणि पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सावनेर मतदारसंघात अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे नुकसान

# आ. डॉ. आशिष देशमुखांकडून पाहणी



**■ महासागर प्रतिनिधी**
**सावनेर, दि. १ :**
सावनेर, कळमेश्वर तालुक्यातील तिडंगी, तेलगाव, दाढेरा, माळेगाव, नांदागोमुख, सालई यासारख्या अनेक गावात अतिवृष्टीमुळे कापूस, तूर, सोयाबीन यासह फळबागांचे मोठे नुकसान झाले. संत्र्याची अनेक झाडे पडली, भाजीपाल्याचे नुकसान झाले.

आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी महसुल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन भर पावसात या आसमानी संकटाची पाहणी केली. स्वतः आमदार डॉ. आशिष देशमुख शेतकऱ्यांच्या बांधावर गेले व सर्व पिकांची पाहणी केली. तसेच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना धीर देत सर्व शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसानीचे व्यवस्थित पंचनामे करावे जेणेकरून कपाशी, तूर, संत्रा, भाजीपाला तसेच सर्व पिकांचे नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळण्यासाठी मदत होईल, अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

शासन दरबारी पाठपुरावा करून जास्तीतजास्त नुकसान भरपाई करून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. राजीव पोतदार, भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, रामराव मोवाडे, दिगंबर सुरतकर, उपविभागीय दंडाधिकारी संपत खलाटे, खंडविकास अधिकारी अंशुजा गराटे, तहसीलदार विकास बिक्कड, अक्षय पोयम, कृषी अधिकारी दीपाली कुंभारे, रचना चौहान, मोनाली कुंभारे उपस्थित होते.

## सदर पोलिसांची डाऊन टाऊन हुक्का पार्लरवर धाड

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
सदर पोलिसांच्या गस्ती पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर ठाण्यांतर्गत सुरू असलेल्या अवैध हुक्का पार्लरवर धाड टाकली. ३,३४० रुपयांचे साहित्य जप्त करून व्यवस्थापकाला अटक केली. गौरव बोकडे (३२) रा. मानेवाडा रोड असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

माऊंट रोडवर निखिल खुशाल खुमेरीया (३१) रा. इतवारी याचे डाऊन टाऊन नावाने हुक्का पार्लर आहे. या पार्लरमध्ये अटकेतील आरोपी गौरव हा व्यवस्थापक आहे. सदर पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते.

या दरम्यान माऊंट रोडवर डाऊन टाऊन नावाने अवैध हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी हुक्का पार्लरवर धाड टाकली. आरोपी गौरव ग्राहकांना प्रतिबंधित तंबाखूजन्य विविध फ्लेव्हरचा हुक्का उपलब्ध करताना प्रत्यक्ष मिळून आला. तपासात उघड झाले की व्यवस्थापक व मालक दोघेही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैधरीत्या पार्लर चालवत होते. पोलिसांनी घटनास्थळावरून हुक्का पॉट्स, फ्लेवर्ड तंबाखू व अन्य साहित्य जप्त केले. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तरुणाला डंपरने चिरडले

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
मोटारसायकलने जात असलेल्या दोन तरुणांना भरधाव असलेल्या डंपरच्या चालकाने जबर धडक दिली. यात डंपरच्या चाकाखाली येऊन एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. ही घटना यशोधरानगर ठाण्यांतर्गत घडली. बादल भक्तराज राऊत रा. गजानननगर, हुडकेश्वर असे मृताचे नाव आहे. जखमी मित्र संदीप शेषराव धारपुरे (रा. पारडी) याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रात्री १२ वाजताच्या सुमारास बादल आणि संदीप कोराडी मंदिरात दर्शनासाठी जात होते. राजीव गांधी पूल ते विटाभट्टी चौकादरम्यान गिट्टीने भरलेल्या डंपरने त्यांच्या मोटारसायकलला जबर धडक दिली. डंपरच्या मागच्या चाकाखाली आल्याने बादलचा घटनास्थळीच मृत्यू झाला. यशोधरानगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. जखमी संदीपला तत्काळ उपचारार्थ मेयो रुग्णालयात रवाना करण्यात आले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

## वाहन लुटणारा गजाआड

**नागपूर :** चाकूच्या धाकावर एका व्यक्तीची दुचाकी पळविणाऱ्या आरोपीला पाचपावली पोलिसांनी अटक केली आहे. कीतीर्राज जयराम (१९) रा. आनंदनगर एनआयटी क्वॉर्टर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फैजुल्ला खान हफीजुल्ला खान (४८) हे कमाल चौकातून घरी जात होते. रस्त्यात ते लघुशंका करण्यासाठी थांबले. या दरम्यान आरोपी कीतीर्राज तेथे आला. चाकूचा धाक दाखवून फैजुल्ला यांना जिवे मारण्याची धमकी देत जबरीने दुचाकी पळवून नेली. फैजुल्ला यांच्या तक्रारीवरून पाचपावली पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता.




## अश्लिल संदेश पाठविणाऱ्यावर कारवाई करा : सेवकांची मागणी

**■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १ :**
परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूरचे संस्थापक महानत्यागी बाबा जुमदेवजी यांचेविषयी अपशब्द आणि अश्लील शिवीगाळ केल्याबद्दल कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन मंडळाचे संचालक तापेश्वर वैद्य व सेवक यांनी नागपूर व भंडारा येथील पोलीस अधीक्षकांना सादर केले.

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील ब्राम्हणी गावातील मुकेश प्रकाश सावरबांधे याने स्वतःच्या मोबाईलवरील व्हॉट्सअॅप वर बाबा जुमदेवजी यांचा फोटो ठेऊन अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच प्रसार केला. या व्यक्तीवर तात्काळ कारवाई करावी अन्यथा भव्य आंदोलन करण्यात येईल असा इशारा संचालक तापेश्वर वैद्य यांनी दिला.

मौदा पोलीस स्टेशन येथे नागपूर अधीक्षक डॉ. हर्ष पोद्दार यांना निवेदन देण्यात आले.



त्याचप्रमाणे भंडारा येथील पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांना निवेदन देण्यात आले. पवनी पोलीस स्टेशनकडून याप्रकरणी कारवाई केली जात असून, आरोपीचा रिमांड घेण्याची सूचना केल्याचे हसन यांनी सांगितले.

निवेदन देताना पांडुरंग शेंडे, मंगेश तिघरे, पुरुषोत्तम डोरले, मोरेश्वर राजगिरे, नत्थू ठोंबरे, क्रिष्णा वंजारी, प्रकाश अतिलकर, देवा लारोकर, गजानन झाडे, संतोष आंबीलडुके, राजू बारई, मंगेश कडू, प्रकाश कावळे, मयूर सावरकर, लक्ष्मण शहारे दिलीप वनकर सेवक उपस्थित होते.

